CMYK

सोलापूर

SOLAPUR TARUN BHARAT

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

■ dainiktarunbharat.com ■ epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर | शनिवार, ७ डिसेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ३१ | पाने १२ | किंमत रु. ६/-

# सिंघवी यांच्या आसनाखाली सापडले ५० हजार रुपये



अध्यक्ष जगदीप धनकड यांनी दिला चौकशीचा आदेश

राज्यसभेत प्रचंड गोंधळ, आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी



नोटा सापडल्यानंतर राज्यसभेत प्रचंड गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती

◆ **नवी दिल्ली, ६ डिसेंबर**

राज्यसभेत विरोधी बाजूच्या एका आसनाखाली ५०० रुपयांच्या नोटांचे एक बंडल सापडल्यामुळे खळबळ उडाली. या मुद्यावरून दोन्ही बाजूने आरोप-प्रत्यारोप करण्यात आले, त्यामुळे गोंधळ उडाला. अध्यक्ष जगदीप धनकड यांनी या घटनेच्या चौकशीचा आदेश दिला.

आज राज्यसभेच्या कामकाजाला प्रारंभ होताच सभापती जगदीप धनकड यांनी सभागृहाला या घटनेची माहिती दिली. तेलंगणातून निवडून आलेले काँग्रेसचे खासदार अभिषेक मनू सिंघवी यांच्या आसनाखाली पैशाचे हे बंडल सापडले. ५०० रुपयांच्या नोटांच्या या बंडलात ५० हजार रुपये होते. राज्यसभेचे कामकाज सुरू होण्याआधी तसेच संपल्यानंतर दररोज सभागृहाची सुरक्षा तपासणी केली जाते. यावेळी अनेकदा चष्मा, मोबाईल, डायरी आदी वस्तू सापडतात. या वस्तू राज्यसभेच्या 'हरवले-सापडले' कक्षात जमा केल्या जातात, असे धनकड म्हणाले. पण, गुरुवारी सायंकाळी करण्यात आलेल्या चौकशीत आसन क्रमांक २२२ खाली पाचशे रुपयांची नोटांची एक गड्डी सापडली.

सुरक्षा अधिकाऱ्यांनी याबाबतची माहिती मला दिल्यामुळे सभागृहाला माहिती देण्याची माझी जबाबदारी आहे. नियमित प्रक्रियेनुसार या घटनेच्या चौकशीचा आदेश देण्यात आला. सापडलेल्या नोटा असली की नकली, हे अजून स्पष्ट झाले नाही.

या नोटांवर कोणी दावा करेल, असे मला वाटत होते; पण आतापर्यंत कोणीही या नोटांवर दावा केला नाही. त्यामुळे याच्या चौकशीचा आदेश देण्यात आला. इतक्या मोठ्या नोटांचे बंडल कोणी कसे विसरू शकतो, असेही ते म्हणाले.

धनकड यांनी चौकशी न करताच अभिषेक मनू सिंघवी यांचे नाव घेतल्यामुळे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांनी आक्षेप घेतला. चौकशी पूर्ण होण्याआधी कोणत्याही सदस्याचे नाव घ्यायला नको होते, असे ते म्हणाले. काँग्रेस सदस्य उभे होत यावर आक्षेप घेत होते, भाजपाचे सदस्यही त्याला प्रत्युत्तर देत होते. त्यामुळे गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

(तभा वृत्तसेवा)

## हा असाधारण प्रकार : नड्डा

हा असाधारण असा प्रकार आहे, त्यामुळे यात सत्ताधारी पक्ष तसेच विरोधी पक्ष असा भेदभाव करण्याचे कारण नाही. हा सभागृहाच्या प्रतिष्ठेचा मुद्दा आहे, असे सत्तापक्षनेते जे. पी. नड्डा म्हणाले. विरोधी पक्ष काही मुद्यांवर आक्रमक होतो, काही मुद्यांवर मौन बाळगतो, असा आरोप नड्डा यांनी केला. हे प्रकरण दडपण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे तर नड्डा यांना म्हणायचे नाही, अशी विचारणा करीत खडगे म्हणाले की, ती तुमची सवय आहे, आमची नाही.

## यात आक्षेप घेण्यासारखे काय : किरेन रिजिजू



नाव घेण्यात आक्षेप घेण्यासारखे काय आहे, अध्यक्षांनी कोणत्या क्रमांकाच्या आसनाखाली पैसे सापडले आणि ते आसन कोणाचे आहे, एवढेच म्हटले, असे संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू म्हणाले. सभागृहात एवढे पैसे घेऊन येणे योग्य नाही, त्यामुळे या प्रकरणाची गंभीरपणे चौकशी झाली पाहिजे, असे ते म्हणाले.

हे अतिशय गंभीर असे प्रकरण आहे, त्या बाजूला आणखी काय-काय सापडू शकते, याची कल्पना नाही, असा टोला वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी लगावला. धादांत खोट्या गोष्टीचा प्रचार करीत संसदेचे कामकाज ठप्प पाडण्याचा विरोधकांचा प्रयत्न असल्याचा आरोप गोयल यांनी केला. सभागृहाच्या कामकाजात कोणत्याच मुद्यावरून अडथळा आणला जाऊ नये, असा नियम बनवला पाहिजे, असे गोयल म्हणाले.






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्त्वाचे

### ख्रिस्तियन मिशेलच्या याचिकेवर सुप्रीम कोर्टाची सीबीआयला नोटीस

**नवी दिल्ली :** अतिमहत्त्वपूर्ण व्यक्तींसाठी ऑगस्टा वेस्टलॅण्ड कंपनीकडून हेलिकॉप्टर्स खरेदीच्या व्यवहारात सुमारे ३६०० कोटी रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी आरोपी असलेल्या ख्रिस्तियन मिशेल जेम्सच्या जामीन याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी सीबीआयला नोटीस जारी केली. न्या. विक्रम नाथ आणि न्या. पी. बी. वराळे यांच्या दोन सदस्यीय न्यायासनाने या नोटीसवर सीबीआयला चार आठवड्यांच्या उत्तर सादर करण्यास सांगितले आहे. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संपुआ सरकारच्या काळात देशातील अतिमहत्त्वपूर्ण व्यक्तींसाठी १२ हेलिकॉप्टर्स खरेदी करण्यासाठी ऑगस्टा वेस्टलॅण्ड कंपनीसोबत करण्यात आला आहे. यात मध्यस्थ म्हणून काम करणाऱ्या ख्रिस्तियन मिशेलने भारतातील काही बड्या सरकारी अधिकाऱ्यांना कोट्यवधी रुपयांची लाच दिल्याचे सीबीआयच्या तपासातून समोर आले होते. मिशेलचे या प्रकरणी सीबीआयच्या विनंतीवरून डिसेंबर २०१८ मध्ये दुबईहून भारतात प्रत्यार्पण करण्यात आले होते. याच वर्षी २५ सप्टेंबर रोजी त्याचा जामीन अर्ज दिल्ली उच्च न्यायालयाने फेटाळला होता. त्याने या विरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

### रोहिणीमध्ये टिल्लू टोळीच्या दोन शूटर्सना अटक

**नवी दिल्ली :** दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने रोहिणी परिसरात झालेल्या गोळीबारानंतर टिल्लू ताजपुरिया टोळीच्या दोन हरयाणास्थित नेमबाजांना अटक केली, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. दोन्ही शूटर्सच्या पायात गोळ्या लागल्या असून, त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांना पकडण्यासाठी पथके तयार करण्यात आली होती. त्यांना आत्मसर्मपण करण्यास सांगण्यात आले, तेव्हा त्यांनी गोळीबार केला. प्रत्युत्तर म्हणून पोलिसांनीही गोळीबार केला. यात दोघांच्या पायात गोळ्या लागल्या.

### काश्मीर खोऱ्यात वाढला थंडीचा कडाका

**श्रीनगर :** काश्मीरमध्ये थंडीने पकड अधिकच घट्ट केली. किमान तापमान गोठणबिंदूच्या खाली अनेक अंशांनी घसरले, त्यामुळे खोऱ्यातील बहुतेक भागांमध्ये ही हंगामातील सर्वांत थंड रात्र ठरली. दक्षिण काश्मीरमधील खोऱ्याचे प्रवेशद्वार असलेल्या काझीगुंडमध्येही हंगामातील सर्वांत कमी तापमान उणे ४.४ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. गुलमर्ग, प्रसिद्ध स्की रिसॉर्ट येथे उणे ४.३ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले, तर कुपवाडा येथे उणे ३.४ अंश आणि कोकरनाग येथे उणे २.४ अंश सेल्सिअस तापमान होते.

### अल्लू अर्जुनविरुद्ध खटला दाखल

**हैदराबाद :** 'पुष्पा-२' प्रदर्शित झाला असताना अल्लू अर्जुनवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वास्तविक अल्लू अर्जुन बुधवारी रात्री हैदराबादमधील एका स्थानिक संध्या थिएटरमध्ये पोहोचला होता. त्याला पाहण्यासाठी गर्दी जमली. अचानक चेंगराचेंगरी झाली, त्यात एका महिलेचा मृत्यू झाला असून तीन जण जखमी झाले. अल्लू अर्जुन आणि संध्या थिएटरवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अल्लू अर्जुन कोणतीही माहिती न देता तेथे पोहोचल्याचे सांगितले जात आहे. तसेच संध्या थिएटरने कार्यक्रमाचे योग्य व्यवस्थापन केले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| **सेन्सेक्स** | ८१,७०९.१२ (-५६.७४) |
| **निफ्टी** | २४,६७२.५५ (-३५.८५) |

### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | ७७,६२० रु. |
| **चांदी** (प्रतिकिलो) | ९२,००० रु. |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३४.७ | २३.६ |
| अमरावती | ३२.० | २०.९ |
| भंडारा | ३४.२ | २०.० |
| बुलडाणा | २५.० | २१.२ |
| चंद्रपूर | ३१.२ | १७.२ |
| गडचिरोली | ३१.० | १८.० |
| गोंदिया | ३०.५ | १८.२ |
| नागपूर | ३१.६ | २०.६ |
| वर्धा | ३२.० | २१.० |
| वाशीम | ३१.६ | १९.६ |
| यवतमाळ | ३१.५ | -.- |



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी संसदभवन परिसरात भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त आदरांजली वाहिली

# लोकसभेत गोंधळ, कामकाज स्थगित

**♦ नवी दिल्ली, ६ डिसेंबर**

विविध मुद्यांवरून झालेल्या गोंधळामुळे लोकसभेचे कामकाज आज दिवसभरासाठी स्थगित करण्यात आले.

लोकसभेच्या कामकाजाला प्रारंभ होताच सभापती ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला. सदस्य प्रश्न विचारत आणि मंत्री उत्तर देत असतानाच काँग्रेस आणि विरोधी पक्षांच्या सदस्यांनी घोषणा सुरू केल्या. यामुळे सभागृहात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. सभागृहाचे काम सुरळीत चालू द्यावे, प्रश्नोत्तराचा तास होऊ द्यावा, असे आवाहन बिर्ला करीत होते, पण सदस्य ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते.विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षावर भाजपाच्या सदस्यांनी सभागृहात आणि सभागृहाबाहेर केलेल्या अपमानस्पद आरोपामुळे काँग्रेस सदस्य भडकले होते. या भाजपा सदस्याच्या विरोधात काँग्रेसने सभापतींकडे विशेषाधिकार भंगाची सूचनाही दिली होती. आज त्याच भाजपा सदस्याला ओम बिर्ला यांनी बोलण्याची परवानगी दिल्यामुळे काँग्रेस सदस्य संतापले आणि त्यांनी घोषणाबाजी सुरू केली.

विरोधी पक्षांविरुद्ध सरकारची भूमिका दडपशाहीची आहे. सभापती सरकारच्या दबावाखाली वागत असल्याचा आरोप काँग्रेसचे के. सी. वेणुगोपाल यांनी केला. अदानी मुद्यावर चर्चा करायला सरकार घाबरत आहे, सभागृहाचे कामकाज चालू नये, अशी सरकारची भूमिका असल्याचा आरोप काँग्रेसचे गौरव गोगोई यांनी केला. आम्ही भाजपा सदस्य निशिकांत दुबे आणि संबित पात्रा यांच्या विरोधात विशेषाधिकार भंगाचा प्रस्ताव दिला. त्यावर सभापतींच्या निर्णयाची आम्हाला प्रतिक्षा असताना, त्याच सदस्यांना आज पुन्हा बोलण्याची संधी देण्यात आली, असे गोगोई म्हणाले. बिर्ला वारंवार सदस्यांना शांत राहण्याचे आवाहन करीत होते. पण, सदस्य प्रतिसाद देत नसल्यामुळे बिर्ला यांनी कामकाज आधी १२ वाजपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित केले. *(तभा वृत्तसेवा)*



### काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांची निदर्शने

अदानी मुद्यावरून काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या सदस्यांनी आज दुसऱ्या दिवशीही संसदभवन परिसरात निदर्शने केली. काँग्रेस सदस्य तोंडाला काळा मास्क लावून आले होते. या मास्कवर मोदी-अदानी भाईभाई असा मजकूर होता. विरोधी पक्ष नेते राहुल गांधी आणि प्रियांका वढेरा हातात संविधानाची प्रत घेत फिरत होते.

# वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी प्लेट बसवा

### ३१ मार्चपर्यंत अंतिम मुदत
### अन्यथा होणार कारवाई

**♦ मुंबई, ६ डिसेंबर**

एप्रिल २०१९ पूर्वी महाराष्ट्रात नोंदणी झालेल्या दोन कोटींहून अधिक वाहनांना त्यांच्या मालकांवर दंड आकारला जाऊ नये म्हणून पुढील चार महिन्यांत उच्च सुरक्षा नोंदणी प्लेट्स (एचएसआरपी) बसवाव्या लागणार आहेत. वाहनांना एचएसआरपी स्थापित करण्यासाठी महाराष्ट्र परिवहन आयुक्त कार्यालयाने ३१ मार्च २०२५ ही अंतिम मुदत निश्चित केली आहे. हे काम पार पाडण्यासाठी दीर्घकाळ काढलेल्या निविदा प्रक्रियेनंतर तीन एजन्सी नेमल्या आहेत.

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात नवीन सरकारचा शपथविधी होण्याच्या एक दिवस आधी प्राधिकरणांनी नवीन नोंदणी प्लेट्ससाठी मानक कार्यप्रणालीने (एसओपी) जारी केल्या.

वाहन चोरीवर आळा घालण्यासाठी आणि वाहनांच्या ओळख चिन्हांमध्ये एकसमानता आणण्यासाठी महाराष्ट्र राज्यात एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी केलेल्या वाहनांसाठी या नंबर प्लेट्सची फिटिंग अनिवार्य करण्यात आली होती आणि त्या बसविण्याची जबाबदारी उत्पादकांवर होती.

दुर्मिळ ॲल्युमिनियम मिश्रधातूपासून बनवलेल्या एचएसआरपीमध्ये 'इंडिया' या पडताळणी शिलालेखासह एक रेट्रो-रिफ्लेक्टिव्ह फिल्म, क्रोमियम-आधारित अशोक चक्र होलोग्राम, निळ्या रंगात हॉट-स्टॅम्प अक्षर इंड (आयएनडी) आणि एक अद्वितीय १०-अंकी लेसर-ब्रँडिंग अनुक्रमांक आहे. हा अनुक्रमांक कोणत्याही प्रकारची छेडछाड करू शकणार नाही, अशा पद्धतीने तयार करण्यात आला आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंत एचएसआरपी व तिसरे नोंदणी चिन्ह स्टिकर स्थापित करणे ही वाहन मालकाची जबाबदारी आहे, असे एसओपीमध्ये म्हटले आहे. क्षेत्रीय अंमलबजावणी प्राधिकरणांना (प्रादेशिक परिवहन कार्यालये आणि पोलिस) मार्च २०२५ ची अंतिम मुदत संपल्यानंतर मोटार वाहन कायद्याच्या कलम १७७ चे पालन न केल्यास कायदेशीर कारवाई करण्यासाठी आणि दंड आकारण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. *(वृत्तसंस्था)*



खरं तर 'वासुदेव' ही महाराष्ट्रातील एक प्राचीन परंपरा. वारकरी पंथातील कृष्णवंशातील कृष्णाचे भक्त म्हणवून घेणारी जमात म्हणजे 'वासुदेव'. कलेला सोबत घेऊन लोकांना संगीतातून जागृत करण्याचे कार्य हा वासुदेव करीत असे. कृष्णाचे प्रतीक म्हणून कपाळावर गंध, मोरपिसांचा उंच टोप, घेरेदार झगा, सुरवार किंवा धोतर, खांद्यावर उपरणं, गळ्यात झोळी, कमरेला छोटी बासरी अशा रूपात हा वासुदेव गावागावांत भिक्षा मागत फिरायचा. आजच्या टच स्क्रीनच्या जमान्यात ही संस्कृती लुप्त होत चालली आहे. मात्र, आजही काही वासुदेव घराण्याचा वारसा म्हणून चिकाटीने ही कला जपताना दिसतात. यवतमाळच्या शिवाजीनगरात हरिनाम गात-गात मार्गस्थ झालेल्या अशाच एका वासुदेवाचे प्रसाद नायगावकर यांनी टिपलेले छायाचित्र

# तीन वर्षांचा अंगद ओळखतो ५० देशांचे ध्वज

### इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्‌सने घेतली दखल

**♦ यवतमाळ, ६ डिसेंबर**

येथील विधिज्ञ ॲड. जीवन व ॲड. सुप्रिया पाटील यांचा नातू व नागपूरचे ॲड. तेजस व ॲड. रोहिणी पाटील यांचा मुलगा अंगद तेजस पाटील आपली प्रतिभा आणि स्मरणशक्तीच्या जोरावर ५० वेगवेगळ्या देशांची राजधानी व त्यांच्या ध्वजांची ओळख सहज सांगतो.

तीन वर्षांचा चिमुकला अंगदने २४ ऑक्टोबर रोजी हा अविश्वसनीय पराक्रम केला असून, त्याची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्‌सने घेतली आहे. त्याने २ मिनिट ५३ सेकंदात ५० देशांचे ध्वज ओळखले आणि त्यांच्या राजधान्याही सांगितल्या. या रेकॉर्डमुळे अंगद चर्चेत आला आहे.

अंगदची अफाट बुद्धिमत्ता आणि स्मरणशक्तीमुळे त्याचे पालकच नाही तर नातेवाईक आणि शेजारीही अवाक्‌ झाले आहेत. अंगदचा जन्म १ जुलै २०२१ चा आहे. त्याच्या आई-वडिलांनी अंगदची बुद्धिमत्ता ओळखून त्याच्यावर आणखी संस्कार केले. त्याची कल्पनाशक्ती विकसित करण्याचा प्रयत्न केला.

अंगदला विविध देशांचे ध्वज दाखवून त्या देशांची माहिती ते त्याला देऊ लागले. विविध देशांचे ध्वज आणि त्या देशांच्या राजधान्यांबद्दलची माहिती तो मुखोद्‌गत करू लागला. मिहानमधील दिल्ली पब्लिक स्कूलचा विद्यार्थी असलेला अंगद पाटील खेळता खेळता आज ५० देशांचे ध्वज व त्यांच्या राजधानी सहज सांगतो. त्याच्या बुद्धिमत्तेचे शाळेलाही कौतुक आहे. *(तभा वृत्तसेवा)*



इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्‌सच्या पदकासह अंगद पाटील

### गुजरातमध्ये ७० हजार रुपयांना पदवी देणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

**♦ सुरत, ६ डिसेंबर**

गुजरात पोलिसांनी सुरतमधून बनावट वैद्यकीय पदवी देणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. ही टोळी गेली ३२ वर्षे अल्पशिक्षित बेरोजगारांना ७० हजार रुपयांमध्ये बनावट पदवी देण्याचे काम करीत होती. नोंदणीचे नूतनीकरण करण्यासाठी ५ हजार रुपये शुल्कही आकारायचे.

त्यातला एक आठवी पास होता. यात एक बनावट डॉक्टर शमीम अन्सारी सामील आहे, ज्याच्या चुकीच्या उपचारामुळे काही दिवसांपूर्वी एका मुलीचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी आतापर्यंत १३ जणांना अटक करण्यात आली आहे.

या टोळीतील दोन मुख्य आरोपी डॉ. रमेश गुजराती आणि बी. के. रावत यांचे शेकडो अर्ज आणि प्रमाणपत्रे पोलिसांना मिळाली आहेत. आतापर्यंत या टोळीने १२०० जणांना बनावट वैद्यकीय प्रमाणपत्र दिली होती. याची माहिती मिळताच पोलिसांनी पांडेसरा येथील तीन दवाखान्यांवर छापा टाकला. त्यांच्याकडे बॅचलर ऑफ इलेक्ट्रो होमिओपॅथी मेडिसिन आणि सर्जरीचे प्रमाणपत्र सापडले, जे सुरतच्या दोन डॉक्टरांनी जारी केले होते. *(वृत्तसंस्था)*

# नरसिंहराव ते मनमोहनसिंग सरकारपर्यंत संसदेत कधी-कधी सापडली कॅश?

## एका नेत्याला झाला होता तुरुंगवास





संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला गेल्या आठवड्यात सुरुवात झाली. शुक्रवारी राज्यसभेतून एक धक्कादायक प्रकार समोर आला, ज्यामुळे देशातील राजकारण ढवळून निघाले. राज्यसभेचे कामकाज सुरू असताना काँग्रेसचे खासदार अभिषेक मनु सिंघवी यांच्या आसनापाशी नोटांचे बंडल सापडले. या सर्व प्रकरणावर स्पष्टीकरण देताना अभिषेक सिंघवी यांनी सांगितले की, ते संसदेत जाताना पाचशे रुपयांपेक्षा जास्त पैसे घेऊन जात नाहीत.

या सर्व प्रकरणामुळे राज्यसभेत गदारोळ सुरू झाल्यानंतर अध्यक्ष जगदीप धनकड यांनी याची चौकशी करणार असल्याचे म्हटले आहे. पण, संसद सभागृहात पैसे सापडण्याचा हा प्रकार पहिल्यांदा घडला नसून, यापूर्वीही संसदेत अनेकवेळा असे प्रकार घडले आहेत.

### काही कारवाई होऊ शकते का?

संसदेत नोटा आणाव्या की आणू नये, असा काही नियम नाही. कोणताही खासदार किती चलन आत घेऊन जाऊ शकतो, यावर मर्यादा नाही. असे अनेक खासदार आहेत, जे डिजिटल पेमेंटचा वापर करीत नाहीत, ते संसदेच्या आतील बँकेच्या शाखेतून पैसे काढतात आणि चेंबरमध्ये घेऊन जातात. सीटजवळील नोटांचे हे बंडल कुठून आले, याची चौकशी केली जाईल. अभिषेक मनू सिंघवी यांनी फक्त ५०० रुपयांची नोट घेऊन सभागृहात जात असल्याचा दावा केला आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू करण्यात आली आहे. मात्र, आता हे सर्व राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनकड यांच्यावर अवलंबून आहे की, ते दिल्ली पोलिसांकडे तपास सोपवतात की अन्य संस्थांकडे देतात.

### १९९३ मध्ये संसदेत पहिल्यांदा सापडले पैसे

१९९३ साली केंद्रात नरसिंहराव यांचे सरकार होते. त्यांच्याकडे स्पष्ट बहुमत नव्हते. अयोध्येतील वादग्रस्त ढाचा पाडल्यानंतर पक्षातील नेते राव यांच्या विरोधात गेले होते तसेच नरसिंह राव आणि अर्जुनसिंह यांच्यातील मतभेदही वाढल्याच्या बातम्या सातत्याने वर्तमानपत्रात येत होत्या. अशातच भाजपाने नरसिंहराव सरकारच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव आणला.

नरसिंहराव यांच्याकडे त्यावेळी २४४ खासदार होते, पण अविश्वास प्रस्तावावर मतदान झाल्यावर त्यांना २६५ मते मिळाली आणि त्यांचे सरकार वाचले. दरम्यान, १९९६ मध्ये झारखंड मुक्ती मोर्चाचे सूरज मंडल यांनी दावा केला होता की, १९९३ मध्ये पैसे वाटल्यामुळे नरसिंहराव यांचे सरकार वाचले होते. त्यांच्या मते, प्रत्येक खासदाराला ४० लाख रुपये देण्यात आले होते. हे प्रकरण पुढे सर्वोच्च न्यायालयात गेले होते, पण सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली होती.



### अणुकरारनंतर काय घडले होते?

मनमोहनसिंग सरकारच्या पहिल्या कार्यकाळात २००८ मध्येही असाच प्रकार समोर आला होता. त्यावेळी संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने अमेरिकेसोबत अणुकरार केला होता. यानंतर माकपने मनमोहनसिंग सरकारचा पाठिंबा काढून घेतला. अशातच भाजपाने सरकारविरोधात अविश्वास प्रस्ताव आणला. त्यावेळी या अविश्वास प्रस्तावावर संसदेत बरीच चर्चा झाली. मात्र, मतदानाची वेळ आली असता तत्कालीन लोकसभा अध्यक्ष सोमनाथ चॅटर्जी यांच्या टेबलावर भाजपाचे खासदार अशोक अरगल, फगन कुलस्ते आणि महावीर यांनी नोटा ठेवल्या.

भाजपाच्या या तिन्ही खासदारांनी हे पैसे त्यांना समाजवादी पक्षाचे नेते अमरसिंह यांनी क्रॉस व्होटिंग करण्यासाठी दिल्याचा आरोप केला होता. त्यावेळी सरकारला २६८ मते मिळाली, तर विरोधी पक्षांना २६३ मते मिळाली होती. या प्रकरणी अमरसिंह यांना तुरुंगवासही झाला होता. पण, त्यांच्यावर कोणतीही कठोर कारवाई झाली नाही.

# भावांतरच्या अपेक्षेने शेतकऱ्यांचा मोर्चा नाफेडकडे

**नरेंद्र सुरकार**

**♦ सिंदी (रेल्वे), ६ डिसेंबर**

राज्य सरकारने यंदा सोयाबीन उत्पादकांना भावांतर योजनेंतर्गत फरकाची रक्कम देण्याची घोषणा केली. त्यामुळे शेतकऱ्यांनी सोयाबीन विकण्यासाठी नाफेडची निवड केल्याचे दिसून येत आहे.

विधानसभा निवडणुकीपूर्वी उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी कापूस आणि सोयाबीन उत्पादकांना भावांतर फरकाची रक्कम देण्याचे जाहीर केले होते. खुल्या बाजारात सध्या सोयाबीनला २६०० ते ४३२५ रुपये भाव मिळत आहे. शासनाने सोयाबीनला ६ हजार रुपये भाव देऊ आणि फरकाची रक्कम देण्याची घोषणा केली. परिणामी, आज सोयाबीनला ४८९२ रुपये सरकारी भाव मिळत आहे आणि भविष्यात फरकाचे १००८ रुपये उशिरा का होईना मिळतील, या अपेक्षेने शेतकऱ्यांनी शासनास शेतमाल विकण्याला पसंती दिली आहे.



सध्या महाराष्ट्र राज्य पणन महासंघ आणि विदर्भ मार्केटिंग फेडरेशनतर्फे सोयाबीनची खरेदी सुरू आहे. येथील खरेदी-विक्री सहकारी संस्थेच्या दोन्ही शाखांकडे ११३२ शेतकऱ्यांनी आपली नावे नोंदविली आहेत. येथील केंद्रावर गुरुवार ५ डिसेंबरपर्यंत ४२३ शेतकऱ्यांनी १२०६ क्विंटल सोयाबीन विकले आहे. सेलूच्या केंद्रावरून २६१३ क्विंटल सोयाबीन नाफेडला विकण्यात आल्याचे समजते. दरवर्षीप्रमाणे शेतमालाचे मूल्य एक महिन्यात मिळते. पण, भावांतराच्या अपेक्षेने शेतकरी शासनाला सोयाबीन विकण्यास पसंती देताना दिसत आहे.

CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, ७ डिसेंबर २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक ३१ ।


| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

▮ dainiktarunbharat.com
▮ epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### आरबीआयच्या निर्णयामुळे बाजारात घसरण



**मुंबई** : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा (आरबीआय) निर्णय शेअर बाजाराला फारसा रुचला नसून, शुक्रवारच्या कारभारात याचे पडसाद उमटले. आरबीआयने रेपो दर न वाढविण्याचा निर्णय घेताच देशांतर्गत बाजारात घसरण झाली. बाजार बंद होताना निर्देशांक ५७ अंकांनी खाली आला तर निफ्टीही ३१ अंकांनी घसरला. व्यवहारात मुंबई बाजारातील ३० पैकी १७ कंपन्यांचे शेअर्स घसरले. सर्वाधिक घसरण अदानी पोर्ट्सच्या शेअर्समध्ये दिसून आली. याउलट, टाटा मोटर्सचे शेअर्स तब्बल तीन टक्क्यांनी वधारले.



### नवीन वर्षापासून मारुतीच्या कार महागणार

**मुंबई** : ह्युंदई मोटार इंडियानंतर, भारतातील सर्वांत मोठी कार निर्माता कंपनी मारुती सुझुकीनेदेखील पुढील महिन्यापासून कारच्या किमती वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. ही वाढ कंपनीच्या लाईनअपच्या सर्व मॉडेल्सवर ४ टक्क्यांपर्यंत असेल. वाढलेले दर १ जानेवारी २०२५ पासून लागू होतील. सुझुकीने शुक्रवारी एका एक्सचेंज फाईलिंगमध्ये ही माहिती दिली. एक दिवस आधी गुरुवारी ह्युंदईने देखील नवीन वर्षापासून आपल्या सर्व मॉडेल्सच्या किमती २५,००० रुपयांनी वाढवण्याची घोषणा केली होती. दोन्ही भारतीय कंपन्यांव्यतिरिक्त, मर्सिडीझ-बेंझ, बीएमडब्ल्यू आणि भारतात व्यवसाय करत असलेल्या ऑडीनेही नवीन वर्षापासून किमती वाढवण्याची घोषणा केली आहे. सर्व कंपन्यांनी किमती वाढवण्यामागे एकच कारण दिले आहे. इनपुट कॉस्ट आणि लॉजिस्टिक्समध्ये वाढ झाल्यामुळे कंपन्यांनी असा निर्णय घेतला आहे.

### बंडखोरांकडून सीरियातील दोन मोठी शहरे ताब्यात

**दमास्कस** : सीरियातील हमाला हे आणखी एक मोठे शहर हयात तहरीर अल शाम (एचटीएस) या बंडखोर गटाने ताब्यात घेतले आहे. एचटीएसचे लढाऊ आता सीरियातील महत्त्वाच्या होम्स शहराकडे कूच करत आहेत. त्यांनी होम्सचा काही भागही ताब्यात घेतला आहे. होम्स ताब्यात घेतल्यानंतर ते राजधानी दमास्कसच्या दिशेने जातील. बंडखोरांना रोखण्यासाठी सीरियन लष्कराने होम्स आणि हमाला जोडणारा महामार्ग उद्ध्वस्त केला आहे. होम्स शहर हामापासून अवघ्या ४० किमी अंतरावर आहे. हमाला ताब्यात घेतल्यानंतर होम्स शहरात शिया समुदायाचे लोक शहर सोडून पळून जाऊ लागले आहेत.

# आजपासून विधानसभेचे तीन दिवसीय विशेष अधिवेशन

◆ **मुंबई, ६ डिसेंबर**

देवेंद्र फडणवीस यांनी सत्ता स्थापनेचा दावा करून, गुरुवारी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर, विधानसभेचे तीन दिवसीय विशेष अधिवेशन बोलविण्यात आले आहे.

शपथविधी आटोपल्यानंतर लगेच मुख्यमंत्र्यांनी दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसोबत मंत्रिमंडळाची बैठक घेतली. यात तीन दिवसांचं विशेष अधिवेश बोलविण्याबाबत निर्णय घेतला आणि त्याबाबतचा प्रस्ताव राज्यपालांकडे पाठविण्यात आला होता. मंत्रिमंडळाच्या शिफारशीनुसार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् यांनी संविधानातील अधिकारांचा वापर करून, शनिवारी सकाळी ११ वाजता महाराष्ट्र विधानसभेचे अधिवेशन मुंबई येथील विधानभवनात बोलावले आहे. हे अधिवेशन ९ डिसेंबरपर्यंत चालणार असून, यावेळी विधानसभाध्यक्षांची निवड आणि नवनिर्वाचित आमदारांना शपथ दिली जाणार आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र विधान परिषदेची बैठक सोमवारी दुपारी चार वाजता आयोजित करण्यात आली असल्याचे विधानमंडळ सचिवालयामार्फत कळविण्यात आले. ◂(तभा वृत्तसेवा)



कालिदास कोळंबकर यांना विधानसभेचे हंगामी अध्यक्ष म्हणून शपथ देताना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन्

## कालिदास कोळंबकर हंगामी अध्यक्ष

◆ **मुंबई, ६ डिसेंबर**

विधानसभेचे ज्येष्ठ सदस्य कालिदास सुलोचना निळकंठ कोळंबकर यांना शुक्रवारी विधानसभेच्या हंगामी अध्यक्षपदी नियुक्त करण्यात आले. ही नियुक्ती राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् यांनी केली.

राजभवन येथे झालेल्या एका छोटेखानी शपथविधी सोहळ्यात राज्यपाल राधाकृष्णन् यांनी कोळंबकर यांना हंगामी अध्यक्षपदाची शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, मुख्य सचिव सुजाता सौनिक, विधानमंडळ सचिव (कार्यभार) राजेंद्र भागवत आदी उपस्थित होते.

कालिदास कोळंबकर हे विधानसभा निवडणुकीत मुंबईतील वडाळा मतदारसंघातून भाजपाच्या चिन्हावर विजयी झाले आहेत. महत्त्वाचे म्हणजे, सलग ९ वेळा या क्षेत्रातून विजयी होण्याचा विक्रम त्यांनी स्वतःच्या नावावर केला आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

# 'ते' पैसे माझे नाहीत : सिंघवी

◆ **नवी दिल्ली, ६ डिसेंबर**



माझ्या आसनाखाली सापडलेले पैसे माझे नाही, असा दावा करीत, हे माझ्यासाठी गंभीर आणि हास्यास्पद असे प्रकरण असल्याचा खुलासा अभिषेक मनू सिंघवी यांनी केला.

सभागृहात येताना मी फक्त पाचशे रुपयांची एक नोट घेऊन येतो. गुरुवारी मी फक्त तीन मिनिटांसाठी सभागृहात आलो होतो. मी १२ वाजून ५७ मिनिटांनी सभागृहात आलो आणि दुपारी १ वाजता भोजनावकाश झाला. दुपारी दीड वाजता संसदेच्या भोजनकक्षात अयोध्याप्रसाद रेड्डी यांच्यासोबत मी भोजन केले. संसदभवनात मी फक्त अर्धा तास होतो. नंतर एक प्रकरण असल्यामुळे मी सर्वोच्च न्यायालयात गेलो, असे सिंघवी म्हणाले.

अशाही गोष्टीचे राजकारण केले जाते, याचे मला आश्चर्य वाटते. ही गंभीर अशी सुरक्षाविषयक त्रुटी असून, याची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी करीत सिंघवी म्हणाले की, सभागृहात कोणी काही ठेवत असेल, तर त्याची चौकशी झाली पाहिजे. प्रत्येक सदस्याच्या आसनाभोवती काचेचे एक पार्टिशन असायला पाहिजे आणि ते लॉक करता आले पाहिजे. त्यामुळे सदस्य आपल्याच जागेवर बसू शकेल. आता संसदभवनही धोकादायक झाले असल्याचे ते म्हणाले. ◂(तभा वृत्तसेवा)

### दुसऱ्यांदा संसदेत आली नोटांची थप्पी

संसदेत नोटांची थप्पी सापडण्याची ही दुसरी घटना आहे. संपुआ शासनकाळात अणुकराराच्या मुद्यावरून माकपने पाठिंबा काढल्यानंतर सरकारने सभागृहात विश्वासमत प्रस्ताव मांडला होता. त्यावेळी भाजपा सदस्यांनी सभागृहात नोटांची थप्पी दाखवली होती. विश्वासमत प्रस्तावावरील मतदानाच्या वेळी अनुपस्थित राहण्यासाठी आम्हाला देण्यात आलेल्या लाचेची ही रक्कम असल्याचा आरोप भाजपाच्या सदस्यांनी केला होता. तत्कालीन सभापती सोमनाथ चटर्जी यांनी तेव्हा समिती स्थापन करीत, या घटनेच्या चौकशीचा आदेश दिला होता.

## लाडकी बहीण योजनेतील वाढीव मानधनासाठी अर्थसंकल्पात तरतूद करणार : फडणवीस

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ६ डिसेंबर :**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना यापुढे कायम राहणार असून जाहीरनाम्यात दिलेल्या आश्वासनाप्रमाणे २१०० मानधन दिले जाणार आहे. अर्थसंकल्पात त्याबाबतची तरतूद केली जाईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारने विक्रमी बहुमत मिळवल्यानंतर गुरुवारी देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदी तर एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाचे शपथ घेतली त्यानंतर पत्रकारांची बोलताना फडणवीस यांना निवडणुकीतील आश्वासनाबाबत अंमलबजावणी कधी करणार? अशी विचारणा केली असता ते म्हणाले की,आम्ही मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरूच ठेवणार आहेत. तसेच महिलांना मिळणारा लाभ २१०० रुपये करणार आहोत. आता अर्थसंकल्पाच्या वेळी आम्ही त्याचा विचार करू. शेवटी आपले आर्थिक योग्य प्रकारे चॅनेलाईज झाल्यानंतरच आपल्याला ते करता येईल,

लाडकी बहीण योजनेत काही महिला निकषाच्या बाहेर असतील तर त्याचा पुनर्विचार होईल. या योजनेचा सरसकट पुनर्विचार करण्याचा कोणताही विचार नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## नक्षलविरोधी चकमकीत तीन जवान जखमी

◆ **बिजापूर, ६ डिसेंबर**

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात गुरुवारी रात्री नक्षलवाद्यांसोबत झडलेल्या चकमकीत सुरक्षा दलाचे तीन जवान जखमी झाले.

पामेड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका गावाजवळ नव्यानेच स्थापन करण्यात आलेल्या चौकीवर तैनात असलेल्या जवानांवर नक्षलवाद्यांनी गोळीबार केला. प्रत्युत्तरात जवानांनीही गोळीबार केला. गुरुवारी रात्री साडेआठच्या सुमारास ही चकमक झडली, अशी माहिती वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने दिली. सुमारे अर्धा तास ही चकमक सुरू होती. नक्षल्यांनी ग्रेनेड लॉन्चरच्या माध्यमातून हल्ला केला. त्यातील छर्रे लागल्याने तीन जवान किरकोळ जखमी झाले. त्यांच्यावर चौकीतच प्राथमिक उपचार करण्यात आले. जवानांची अतिरिक्त कुमक घटनास्थळी दाखल होण्याआधीच नक्षल्यांनी पळ काढला. ◂(वृत्तसंस्था)

# कर्जावरील व्याज दर 'जैसे थे'

### जीडीपी ६.६ टक्के राहणार

◆ **मुंबई, ६ डिसेंबर**

भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी शुक्रवारी पतधोरणाचा आढावा अहवाल जाहीर केला. यात कर्जावरील व्याजदरात कोणताही बदल करण्यात आला नाही. व्याज दर 'जैसे थे' ठेवण्याची ही सलग अकरावी वेळ आहे. त्याचवेळी, दास यांनी चालू आर्थिक वर्षात आर्थिक विकासाचा दर ६.६ टक्के राहण्याची शक्यता वर्तवली. यापूर्वीच्या आढावा अहवालात हा दर ७.२ टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता.

जुलै ते सप्टेंबर या तिमाहीत जीडीपीचा दर ७ टक्क्यांपेक्षा खाली असतानाही रिझर्व्ह बँकेने प्रमुख कर्जावरील व्याजदरात कुठलाही बदल न करण्याचा निर्णय घेतला. अलिकडेच संपलेल्या तिमाहीत जीडीपीचा दर ७ टक्के राहील, असा अंदाज असतानाही तो केवळ ५.४ टक्केच राहिला होता. दरम्यान, तिसऱ्या तिमाहीत जीडीपी विकास दर चांगला राहील, असा अंदाजही दास यांनी व्यक्त केला. चालू आर्थिक वर्षाकरिता पाचवा द्विमासिक पतधोरण आढावा अहवाल पत्रपरिषदेत जाहीर करताना शक्तिकांत दास म्हणाले की, सध्या रेपो दर ६.५ टक्के इतकाच कायम ठेवण्यात आला आहे, सीआरआरचा दर ४.५ टक्क्यांवरून ४ टक्क्यांवर आणण्यात आला आहे. वाढत्या महागाईवर आमचे लक्ष आहे. ती आमच्या अपेक्षित स्तरावर आल्यानंतर आम्ही भविष्यातील रणनीती तयार करू. ◂(वृत्तसंस्था)

# भाजपाचे ज्येष्ठ नेते मधुकर पिचड यांचे निधन

### सलग सात वेळा राहिले आमदार

◆ **नाशिक, ६ डिसेंबर**

भाजपाचे ज्येष्ठ नेते मधुकर पिचड यांचे निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. मागील दीड महिन्यांपासून नाशिक येथील रुग्णालयात पिचड यांच्यावर उपचार सुरू होते. त्यातच पिचड यांची प्रकृती आणखी खालावली. ब्रेनस्ट्रोक आल्याने त्यांना नाशिक येथील नाईन पल्स रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

पिचड यांचा जन्म १ जून १९४१ रोजी राजूर येथे झाला. त्यांनी पुण्यातील फर्ग्युसन कॉलेज येथून बीए एलएलबीचे शिक्षण घेतले. विद्यार्थी दशेत त्यांनी राजकारणात प्रवेश केला. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पिचड यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची साथ सोडून आपल्या मुलासह देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केला होता. पण, २०१९ च्या निवडणुकीत वैभव पिचड यांचा पराभव झाला. दरम्यान, काही दिवसांपूर्वी त्यांनी शरद पवार यांची भेट घेतली होती. अशातच मधुकर पिचड यांची प्रकृती खालावली.



मधुकर पिचड यांचे आदिवासी भागात मोठे काम होते. ते माजी आदिवासी विकास मंत्री होते. ते अहमदनगरच्या अकोले विधानसभा मतदारसंघातून तब्बल सातवेळा आमदार म्हणून निवडून आले होते. अकोले मतदारसंघातूनच त्यांच्या राजकारणाची सुरुवात झाली. सुरुवातीला ते १९७२ मध्ये अकोले पंचायत समितीवर सदस्य म्हणून निवडून आले. त्यानंतर १९७२ ते १९८० पर्यंत पंचायत समितीचे सभापती होते. पुढे १९८० पासून २००९ पर्यंत सलग ७ वेळा आमदार म्हणून निवडून आले, त्यांनी विधानसभेत विरोधी पक्षनेतेपदाची धुरा सांभाळली होती.

मार्च १९९५ ते जुलै १९९९ या काळात ते विधानसभेचे विरोधी पक्षनेदेखील होते. मधुकर पिचड यांनी १९९३ मध्ये अगस्ती सहकारी साखर कारखाना स्थापन केला. त्यांनी आदिवासी विकास, भटक्या जमाती आणि इतर मागासवर्गीय कल्याण अशा विविध खात्यांची जबाबदारी पार पाडली. ◂(वृत्तसंस्था)

# ९५ विधानसभा मतदारसंघातील ईव्हीएम मशीनबद्दल संशय !

## १०४ उमेदवारांनी केली व्हीव्हीपॅट मोजणीसाठी मागणी

**तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी**
**मुंबई,दि.६ डिसेंबर -**

राज्यातील ३१ जिल्हयांतील एकूण ९५ विधानसभा मतदारसंघात ईव्हीएम-व्हीव्हीपॅट मशिन्सच्या बर्न्ट मेमरी आणि मायक्रोकंट्रोलरच्या तपासणी आणि पडताळणीसंदर्भात एकूण १०४ अर्ज प्राप्त झालेले आहेत. या१०४ अर्जांमधून महाराष्ट्र राज्यातील १००४८६ मतदानकेंद्रापैकी ७५५ मतदानकेंद्रावरील ईव्हीएम संचाची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

भारत निवडणूक आयोगाने १ जून २०२४, १६ जुलै, व ३० जुलै, रोजीच्या पत्रांन्वये ईव्हीएम-व्हीव्हीपॅट मशिन्सच्या बर्न्ट मेमरी आणि मायक्रोकंट्रोलरच्या तपासणी आणि पडताळणीसंदर्भात करावयाच्या कार्यपध्दतीबाबत सूचना दिलेल्या आहेत. ईव्हीएम-व्हीव्हीपॅट मशिन्सच्या बर्न्ट मेमरी आणि मायक्रोकंट्रोलरच्या तपासणी आणि पडताळणीदरम्यान निवडणूक याचिका दाखल नसलेल्या प्रकरणी प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी पार पडलेली प्रक्रिया पुनःश्च पार पाडली जाते. त्यानुसार, ईव्हीएम-व्हीव्हीपॅटच्या संचातील प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशीचा डेटा क्लियर करण्यात येऊन अभिरुप मतदान (मॉकपोल) घेण्यात येते. अंतिमतः सीयु मधील डेटा व व्हीव्हीपॅट मशिन्स मधील स्लीप्स यांच्या आकडेवारीमध्ये तफावतीबाबत निरीक्षण करण्यात येऊन संबंधित संचातील ईव्हीएमचे कामकाज व्यवस्थित असल्याची खात्री करण्यात येते.

३० जुलैच्या पत्रान्वये ईव्हीएम-व्हीव्हीपॅट मशिन्सच्या बर्न्ट मेमरी आणि मायक्रोकंट्रोलरच्या तपासणी आणि पडताळणीसंदर्भात उत्पादक कंपनीकडून तपासणीच्या तारखेआधी ३ दिवस पर्यंत अर्जदार त्यांचा तपासणीचा अर्ज कोणत्याही वेळी मागे घेऊ शकतो. त्यानुसार संबंधित अर्जदारास त्याने जमा केलेले शुल्क त्यांना परत करण्याची तरतूद आहे, असे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने कळविले आहे.

### ५ जिल्ह्यात एकही तक्रार नाही

राज्यातील ३१ जिल्ह्यातून तक्रारी आल्या आहेत .तर उर्वरित सिंधुदुर्ग, नंदुरबार, अमरावती, वर्धा व गडचिरोली या ५ जिल्हयात ईव्हीएम-व्हीव्हीपॅट मशिन्सच्या बर्न्ट मेमरी आणि मायक्रोकंट्रोलरच्या तपासणी आणि पडताळणीसंदर्भातील एकही अर्ज दाखल झालेला नाही

# आंदोलक शेतकऱ्यांवर अश्रुधुराचा मारा

### शंभू सीमेवर पोलिसांची कारवाई

◆ **शंभू, ६ डिसेंबर**

पंजाब आणि हरयाणा शंभू सीमेवर उभारण्यात आलेल्या बहुस्तरीय बॅरिकेड्सजवळ पोहोचलेल्या आंदोलक शेतकऱ्यांना पांगवण्यासाठी हरयाणाच्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या.

१०१ शेतकऱ्यांनी त्यांच्या शंभू निषेध स्थळापासून दिल्लीच्या दिशेने पायी कूच सुरू केली. आंदोलक शेतकऱ्यांवर अश्रुधुराच्या अनेक नळकांड्या सोडण्यात आल्या आणि त्यांना परत जाण्यास भाग पाडले. यात काही शेतकरी जखमी झाले आणि त्यांना रुग्णवाहिकेतून रुग्णालयात नेण्यात आले, असा आंदोलकांनी सांगितले.

भारतीय नागरी सुरक्षा संहितेच्या कलम १६३ अंतर्गत लागू केलेल्या प्रतिबंधात्मक आदेशांचा हवाला देऊन हरयाणा पोलिस अधिकाऱ्यांनी आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांना पुढे जाऊ नये, असे सांगितले.

काही शेतकरी रस्त्याचे खिळे आणि काटेरी तार काढताना दिसले. त्यांनी अश्रुधुराचा मारा टाळण्यासाठी ओल्या तागाच्या पिशव्यांनी तोंड झाकून घेतले होते. हरयाणाच्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी शांततेने पुढे जाऊ इच्छिणाऱ्या निदर्शकांवर अश्रुधुराचा मारा केला, असा आरोप शेतकऱ्यांनी केला.

जिल्ह्यात कोणत्याही बेकायदेशीरपणे पाच किंवा अधिक लोकांच्या एकत्र येण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत, असे अंबाला जिल्हा प्रशासनाने यापूर्वीच भारतीय नागरी सुरक्षा संहितेच्या कलम १६३ अन्वये आदेश जारी केला आहे. ◂(वृत्तसंस्था)



आंदोलक शेतकऱ्यांवर अश्रुधुराचा मारा करताना सुरक्षा जवान व पोलिस

### मोर्चा दिवसभर स्थगित

पंजाब-हरयाणा सीमेवर अश्रुधुराच्या माऱ्याने काही आंदोलक जखमी झाल्याने हमी भावाच्या कायदेशीर हमीसह विविध मागण्यांसाठी दिल्लीकडे निघणारा मोर्चा शुक्रवारी दिवसभरासाठी स्थगित करण्यात आला. शेतकरी बॅरिकेड्सजवळ पोहोचले, तेव्हा सुरक्षा कर्मचाऱ्यांनी आंदोलक शेतकऱ्यांना पांगवण्यासाठी अश्रुधुराच्या अनेक नळकांड्या फोडल्या.

# चैत्यभूमीवर लोटला भीमसागर!

### महापरिनिर्वाण दिनानिमित्य अभिवादन

**तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि .६ डिसेंबर :**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी लाखो दलित बांधव दादरच्या चैत्यभूमीवर हजेरी लावित महामहानवास वंदन केले. त्यांच्या अलोट गर्दीमुळे पुर्ण परिसराला भीमसागराचे स्वरूप प्राप्त झाले होते.

अनुयायांनी शिस्तबद्धपणे ज्ञान सूर्याला अभिवादन करत सुरळीतपणे सोहळा पाडला. चैत्यभूमीवर मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आज महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्रतीक वर्षाप्रमाणे यंदाही बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी जणू जनसागर चैत्यभूमीवर लोटला होता . देशभरातून येणाऱ्या अनुयायाची गैरसोय होऊ नये यासाठी महापालिकेने गेल्या आठवड्याभरापासून सर्व खबरदारी घेतली होती.



राज्य शासनाच्या वतीने राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चैत्यभूमीवर उपस्थित राहत महामानवाच्या स्मृतींना अभिवादन केले. त्यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर त्यांनीही हजेरी लावत वंदन केले.

राज्यभरातून येणाऱ्या लाखो अनुयायांसाठी लोकमान्य टिळक टर्मिनस येथे महापालिका आणि सामाजिक संस्थेच्यावतीने वैद्यकीय सेवा, पिण्याचे पाणी आणि मोफत जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

## अग्रलेख...

# न्यायालयातील प्रलंबित खटले

देशातील विविध पातळ्यांवरील न्यायालयात प्रलंबित असलेल्या खटल्यांबाबत नेहमीच चिंता व्यक्त केली जाते आणि ती स्वाभाविकही म्हटली पाहिजे. देशभरातील सर्व पातळ्यांवरील न्यायालयातील प्रलंबित खटल्यांची संख्या ५ कोटींच्या घरात आहे. शहाण्या माणसाने न्यायालयाची पायरी चढू नये, असा एक वाक्प्रचार आहे, पण माणूस शहाणा असो की नसो, आयुष्यात कधी न कधी त्याला न्यायालयाची पायरी चढावीच लागते. त्याला इलाज नसतो. कधी स्वतःला न्याय मागण्यासाठी तर कधी दुसऱ्याने केलेल्या अन्यायाच्या विरोधात. संसद, कार्यपालिका आणि न्यायपालिका असे लोकशाहीचे तीन प्रमुख स्तंभ आहेत. माध्यमांना लोकशाहीचा चौथा स्तंभ मानले जाते, पण ते अधिकृत नाही तर अनधिकृतपणे. माणसं न्यायालयात न्याय मागण्यांसाठी जात असली तरी न्यायालयातून मिळतो, तो न्याय असतोच असे नाही. न्याय नुसता देऊन चालत नाही तर तो मिळाला, अशी भावनाही निर्माण होणे आवश्यक असते, असे म्हणतात. न्याय मिळायला होणारा विलंब हा आपल्या देशात सर्वांत मोठी चिंतेची बाब म्हणावी लागेल. अनेक वेळा तर एखाद्या व्यक्तीने न्यायालयात दाखल केलेल्या खटल्याचा निकाल आणायला त्याच्या नातवाला जावे लागते. याबाबतचा एक किस्सा खरा की खोटा माहीत नाही, पण अतिशय मार्मिक असा आहे. न्यायव्यवस्थेत होणाऱ्या दिरंगाईचे दर्शन घडवणारा आहे. एका वृद्ध व्यक्तीविरुद्ध छेडखानीचा खटला न्यायालयात सुरू असतो. न्यायाधीश म्हणतात, तुमच्यासारख्या वृद्ध व्यक्तीने छेडखानी करावी, याचे आश्चर्य वाटते, एखाद्या तरुणाने तसे केले असते, तर ते समजण्यासारखे होते. त्यावर ती वृद्ध व्यक्ती न्यायाधीशांना म्हणते, जेव्हा माझ्याविरुद्ध हा खटला दाखल केला तेव्हा मी सुद्धा तरुणच होतो. ज्या महिलेची मी छेडखानी केली, असा आरोप आहे, ती आपल्या नातवासह न्यायालयात आली आहे. यातील विनोद सोडला तर आपल्या न्यायव्यवस्थेतील ही वस्तुस्थिती आहे.

न्यायव्यवस्थेबद्दल पूर्ण आदर बाळगून असे म्हणावेसे वाटते की, न्यायालयातून आपल्याला जलदगतीने न्याय मिळत नाही. त्याची कारणे कोणतीही असली तरी त्यामुळे सर्वसामान्य माणसावर अन्याय होतो, हे आपल्याला नाकारता येणार नाही. न्यायाला होणारा विलंब म्हणजे सुद्धा एक प्रकारचा अन्यायच असतो. काही वेळा लोक स्वतःला न्याय मिळण्यासाठी न्यायालयात जातात, तर काही वेळा दुसऱ्यावर अन्याय करण्यासाठी. त्यातूनच बहुधा शहाण्या माणसाने न्यायालयाची पायरी चढू नये, ही म्हण रूढ झाली असावी. जिल्हा पातळीवरील न्यायालयापासून उच्च न्यायालय तसेच सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या खटल्यांची संख्या पाहिली तर त्याची खात्री पटते. ही संख्या काही लाखात आहे. सर्वोच्च न्यायालयात डिसेंबर २०२३ पर्यंत ८० हजार खटले प्रलंबित आहे, तर देशातील विविध उच्च न्यायालयांतील प्रलंबित खटल्यांची संख्या ही ५८ लाखांच्या वर आहे. यातील दिवाणी खटल्यांची संख्या ४२ लाख तर फौजदारी खटल्यांची संख्या १६ लाखांच्या वर आहे. देशातील २५ उच्च न्यायालयांत ५८ लाख ५९ हजार खटले प्रलंबित आहेत. यातील ६२ हजारे खटले ३० वर्षांपासून, तर ३ खटले ७२ वर्षांपासून रेंगाळले आहे. देशात सर्वांत जास्त प्रलंबित खटल्याची संख्या उत्तरप्रदेशात आहे, त्या खालोखाल दुसऱ्या स्थानावर महाराष्ट्र आहे. लोकसभा सदस्यांच्या संख्येतही देशात उत्तर प्रदेश पहिल्या तर महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर आहे. महाराष्ट्रासारख्या देशातील पुरोगामी आणि प्रगतिशील राज्याला ही बाब शोभणारी नाही. न्यायालयातील प्रलंबित खटले, लवकरात लवकर कसे निकालात काढावे, हा सर्वांच्या दृष्टीनेच चिंतेचा विषय म्हटला पाहिजे. गेल्या दहा वर्षांत जिल्हा पातळीवरील तसेच उच्च न्यायालयातील प्रलंबित खटल्याची संख्या वाढल्याचे आधीचे विधि व न्याय मंत्री किरेन रिजिजू यांनी राज्यसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले होते. जिल्हा पातळीवरील न्यायालयांतील गेल्या दहा वर्षांतील प्रलंबित खटल्यांची संख्या ३४ लाखावर तर उच्च न्यायालयांतील प्रलंबित खटल्यांची संख्या १२.५० लाखांवर होती. याला न्यायव्यवस्थेतील न्यायाधीशांची अपुरी संख्या हे एक महत्त्वाचे कारण आहे. विधि व न्याय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) अर्जुनराम मेघवाल यांनी नुकतेच राज्यसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले की, देशातील विविध उच्च न्यायालयांत न्यायमूर्तींची ११२२ पदे मंजूर आहेत, यापैकी ३५० पदे रिक्त आहेत. याचाच अर्थ उच्च न्यायालयांतील जवळपास ३५ टक्के न्यायमूर्तींची पदे रिक्त आहे. अशीच स्थिती जिल्हा पातळीवरील न्यायालयातही असू शकते. सुदैवाने सर्वोच्च न्यायालयात सध्या न्यायमूर्तींची पदे रिक्त नाही. निवृत्त झाल्यामुळे, सर्वोच्च न्यायालयात पदोन्नत झाल्यामुळे तसेच काही कारणांनी राजीनामा दिल्यामुळे उच्च न्यायालयातील न्यायमूर्तींची संख्या कमी झाल्याचे मेघवाल यांनी सांगितले. न्यायमूर्तींचे निवृत्तीचे वय वाढवण्याचा सरकारचा सध्या कोणताच विचार नसल्याचेही मेघवाल यांनी स्पष्ट केले होते. सध्या सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तींचे निवृत्तीचे वय ६५ आहे, तर उच्च न्यायालयांतील न्यायमूर्तींच्या निवृत्तीचे वय ६२ आहे. जिल्हा पातळीवरील न्यायमूर्तींच्या निवृत्तीचे वय ५८ ते ६० वर्ष आहे. आपल्या देशातील जनतेचा न्यायव्यवस्थेवर अढळ विश्वास आहे. कुठेही आपल्यावर अन्याय झाला, अगदी सरकारने अन्याय केला तरी न्यायालये आपल्याला न्याय मिळवून देतील, हा जनमानसातील विश्वास हा हे आपल्या लोकशाहीचे मोठे यश म्हटले पाहिजे. ज्या दिवशी आपल्या देशातील जनतेचा न्यायव्यवस्थेवरचा विश्वास उडेल, त्या दिवशी देशात अराजक माजल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे देशातील सर्वसामान्य जनतेचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास कायम राहील, ही जबाबदारी न्यायव्यवस्थेसोबत सरकारचीही आहे.

आपल्या शेजारी देशांच्या तुलनेत आपल्या देशातील न्यायव्यवस्था अतिशय आदर्श आणि निःष्पक्षपाती म्हटली पाहिजे. आपल्या देशाच्या न्यायव्यवस्थेला उज्ज्वल परंपरा लाभली आहे. पेशव्यांच्या काळातील न्यायाधीश रामशास्त्री यांचे नाव आजही आदराने घेतले जाते. आपल्या देशातील न्यायव्यवस्थेने अनेकवेळा चुकीच्या वागणुकीमुळे सत्ताधारी पक्षालाही आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. धडा शिकवला आहे, याची एक नाही तर अनेक उदाहरणे देता येतील. काही वेळा न्यायव्यवस्थेतील एखाद्या घटकाच्या चुकीच्या वागणुकीमुळे संपूर्ण न्यायव्यवस्थेला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे राहावे लागते, पण उडदामाजी काळेगोरे समाजाच्या सर्वच क्षेत्रांत असतात. एखादा माणूस चुकीचा वागला म्हणून संपूर्ण यंत्रणेला दोष देणे वा आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे योग्य नसते. दररोज देशभरातील सर्व पातळ्यांवरील न्यायालयात हजारोंच्या संख्येत नवे खटले दाखल होत असतात. त्यामुळे प्रलंबित खटल्यांची संख्या आणखी वाढत असते. न्यायालयातील प्रलंबित खटले निकालात कसे काढायचे याबाबत सर्वोच्च न्यायालय आणि सरकारला गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. यासाठी कालबद्ध कार्यक्रम तयार करावा लागणार आहे. देशात न्यायालयांची आणि न्यायाधीशांची संख्या वाढवावी लागेल. दोन पाळ्यांत न्यायालये चालवता येतील का, याचाही विचार करावा लागेल. काही वर्षांपूर्वी असा प्रस्ताव आला होता. मात्र तो व्यावहारिकदृष्ट्या योग्य नसल्याचे लक्षात आल्यानंतर त्याची अंमलबजावणी होऊ शकली नसती. पण आपल्याला प्रलंबित खटले निकालात काढण्यासाठी लवकरात लवकर एखादी व्यवस्था विकसित करावीच लागणार आहे. आम्ही आज यावर लक्ष दिले नाही तर, पुढील काही वर्षांत देशातील प्रलंबित खटल्यांची संख्या १ कोटीच्या वर गेल्याशिवाय राहणार नाही. त्यावेळी या परिस्थितीतून मार्ग काढणे आम्हाला कठीण नसले तरी अशक्य होणार आहे. त्यामुळे प्रलंबित खटल्यांची संख्या कमी कशी करता येईल, याचा आम्हाला गांभीर्याने विचार करावा लागणार आहे, वकिलांच्या संघटनांनीही याबाबत सरकारला सल्ला दिला पाहिजे, मार्ग दाखवला पाहिजे. यात आम्ही आज केलेली दिरंगाई आम्हाला भविष्यात महागात पडल्याशिवाय राहणार नाही.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# उबाठा गटाचा जीव पालिकेत!



आघाडीमध्ये सामील झाल्यावर हिंदुत्वाचा त्याग केल्यामुळे उबाठा गटाचे हिंदुत्ववादी मतदार दुरावले आहेत. लोकसभा २०२४ च्या निवडणुकीत मुस्लिम मतांमुळे सावरलेला उबाठा गट विधानसभा २०२४ निवडणुकीत कोसळला. मुसलमान मतांच्या आधारावर सत्तेत येऊ शकत नाही याची जाणीव आता उद्धव ठाकरे यांना झाली आहे. त्यामुळे ते आता पुन्हा हिंदू जनतेला आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र उबाठा एवढे गोंधळेले महाराष्ट्रात दुसरे कुणी नसावे अशी शंका कोणाच्याही मनात येऊ शकते. एकीकडे हिंदूंना आकर्षित करण्यासाठी बांगलादेशातील हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध उबाठा गटाने छोटुसं-नानुसं आंदोलन केलं. या आंदोलनाची व्याप्ती म्हणजे जेवण वाढल्यानंतर पानावर किंचितसं मीठ वाढावं इतकीच होती. आपण अजूनही हिंदुत्व सोडलेलं नाही हे दाखवण्याचा हा अट्टहास होता. मात्र दुसरीकडे ट्विटरवर लोकमान्य टिळक, स्वा. सावरकर, बाजीराव अशा दिव्य पुरुषांना शिव्या घालणाऱ्यांना पाठीशी घालण्यासाठी सामनामध्ये अग्रलेख लिहिला जातो. काय तर म्हणे ती व्यक्ती मराठी आहे आणि त्या व्यक्तीला विरोध करणारा भाजपाचा नेता अमराठी आहे. म्हणून हे मराठी माणसाच्या बाजूने उभे राहिलेत. मग प्रियांका चतुर्वेदी कोण आहेत? मग टिळक, सावरकर काय मराठी नाहीत काय? ते नुसतेच मराठी नाहीत तर या महापुरुषांमुळेच आज आपण मोकळा श्वास घेतोय आणि अशा महापुरुषांवर गलिच्छ टीका करणाऱ्यांना पाठीशी घालणारा उबाठा गट हिंदुत्ववादी काय, देशप्रेमी तरी असू शकतो काय?

आज यांना मराठीचा पुळका आला आहे. मग यांच्या सरकारवर टीका करणाऱ्या मराठी माणसांना या लोकांनी किती त्रास दिला? तेव्हा सामान्य मराठी माणूस आठवला नाही का? त्यामुळे केवळ मतांसाठी हिंदू व मराठी मतदारांना कुरवळाण्याचं कारस्थान आता उघडं पडलं आहे. आता मराठी आणि हिंदू मतदार अशा भुलथापांना बळी पडणार नाही. हा गट दोन दगडांवर पाय ठेवून उभा आहे. पुरोगामित्व आणि हिंदुत्व या दोन्ही गोष्टी एकत्र येऊ शकत नाहीत. मात्र उबाठा गटाने विधानसभेच्या निकालातून काहीही शिकवण घेतली नसली तरी त्यांचा गट बिथरला नक्कीच आहे. आघाडीसोबत राहून आपण सत्तेपर्यंत पोहोचू शकत नाही याची किमान जाणीव त्यांना झाली असावी. त्यात उबाठा यांचा जीव पालिकेत अडकला आहे. मुंबई महानगरपालिका उबाठांना हवीच आहे. त्यासाठी त्यांनी आतापासून तयारी सुरू केली आहे. हिंदूंसाठी तोंडी लावण्यापुरतं आंदोलन हे केवळ ट्रेलर होतं. आता आपणच मोठे हिंदुत्ववादी आणि मराठीचे कैवारी असं दाखवण्याचा प्रयत्न यापुढे होऊ शकतो. जनतेने या महानाट्याचा प्रयोग पाहण्यासाठी तयार राहावे.

२०१७ च्या मुंबई पालिकेच्या निवडणुकीत शिवसेनेला ८४, भाजपाला ८२ जागा मिळाल्या होत्या. भाजपाने मनात आणले असते तर स्वतःचा महापौर बसवू शकले असते. पण भाजपा हा दूरदृष्टी असलेला पक्ष आहे. आता मलई चाखायला मिळतेय या हव्यासापेक्षा कामधेनूचे रक्षण महत्त्वाचे आहे. मात्र हीच चूक उद्धव ठाकरे यांनी २०१९ ला केली. मुख्यमंत्री होण्याच्या हव्यासापोटी त्यांनी आपला पक्ष गमावला. त्यांच्या आमदारांची संख्या लक्षणीयरीत्या कमी झाली. मात्र सामनातील अग्रलेख आणि वक्तव्ये पाहता त्यांनी यातून धडा घेतलेला दिसत नाही. कुटुंबवादी पक्षांची हीच अडचण असते. त्यांच्या आजोबांनी, वडिलांनी विश्व निर्माण केलेलं असतं. ते यांना वारसाहक्कात मिळतं. कोणतेही कष्ट घ्यावे लागत नाही. त्यामुळे शून्यातून विश्व निर्माण करण्याची, पूर्वजांनी घेतलेल्या कष्टाची जाणीव नसते. हा न्याय भारतातील सर्वच कुटुंबवादी पक्षांना लागू पडतो. साम्राज्य उद्ध्वस्त होतं पण अहंकार जात नाही. सचिन पिळगावकर यांनी दिग्दर्शित केलेल्या 'नवरी मिळे नवऱ्याला' या चित्रपटात दया डोंगरे यांनी साकारलेली मांसाहेब ही भूमिका आठवतेय का? वैभव नष्ट झालेलं असतं पण राजेशाही थाट काही जात नाही अशीच गत या सर्व कुटुंबवादी पक्षांची झालेली आहे. मात्र राजकारणात लवचीकपणा दाखवावाच लागतो. स्वतःला पारखावं लागतं. त्यानुसार रणनीती आखावी लागते. जीभेवर नियंत्रण ठेवावे लागते. नाहीतर पुढील वाटचाल कठीण होऊन जाते. देवेंद्र फडणवीस याचं जिवंत उदाहरण आहे. ते एक गुणसंपन्न नेते आहेत. त्यांना सत्तेपासून दूर केलं असलं तरी फडणवीसांनी भाजपाला पुन्हा एकदा १०० पार नेऊन दाखवलं आणि महायुतीला स्वबळावर, कोणतीही चारसोबिशी न करता प्रामाणिकपणे मोठा विजय मिळवून दिला व सन्मानाने पुन्हा मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीवर विराजमान झाले. ठाकरेंनी मात्र इथे चूक केली. शरद पवारांच्या नादी लागून पवारांच्याच पद्धतीने मुख्यमंत्रिपदाची खुर्ची बळकावली. पण आता तो जुना काळ राहिला नाही. पवार काहीही करू शकतात, ते तेल लावलेले पैलवान आहेत, भाकरी फिरवू शकतात ही अंधश्रद्धा यानिमित्ताने दूर झाली.

आता मात्र उद्धव ठाकरेंना काहीही करून पालिकेवर सत्ता मिळवायची आहे. ते हिंदुत्व आणि मराठीचं कार्ड खेळू शकतात. मात्र ही त्यांच्यासाठी मोठी परीक्षा ठरणार आहे. कारण त्यांचं अस्तित्व मुंबई पालिकेवर टिकून आहे. या निवडणुकीत त्यांचा दारुण पराभव झाला तर ते त्यांच्या स्वभावानुसार राजकारणात फारसे सक्रिय राहणार नाहीत. पालिका निवडणुकीला तसा वेळ आहे. पण उद्धव ठाकरे आतापासूनच पृष्ठभूमी तयार करायला लागलेले आहेत. पण ते या गोष्टीपासून अनभिज्ञ आहेत की भाजपाने ३ वर्षांपूर्वीच पालिकेच्या निवडणुकीची तयारी सुरू केली होती.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**हेमंत सालोडकर**

# असा असावा शिष्योत्तम

जीवनात संस्काराचे खूप महत्त्व आहे. संस्काराशिवाय जीवन शून्य असते. संस्कारच मनुष्याला श्रेष्ठ बनवितात, उत्तम आकार देतात. यशस्वी जीवनाचा पाया उत्तम संस्कारांवरच अवलंबून असतो. संस्कारासाठी आपल्याला गुरूही चांगला लाभला पाहिजे. चांगले विचार असणारा गुरूच उत्तम गुण आपल्या शिष्यामध्ये प्रवाहित करतो. मग त्यासाठी शिष्यही सर्वोत्तम असावा लागतो. आपल्याकडे गुरुकुल पद्धती होती. त्यात शिष्य गुरूकडे विद्या प्राप्त करीत असत. आधुनिक युगातही गुरू-शिष्य पद्धती सुरू आहे. पण अलिकडे नाव घेता येईल अशी गुरू-शिष्य जोडी म्हणजे क्रिकेटचे महान प्रशिक्षक रमाकांत आचरेकर आणि सर्वोत्तम शिष्य सचिन तेंडुलकर होय. अगदी लहान वयापासून सचिन रमाकांत आचरेकरांकडे क्रिकेटचे धडे गिरवू लागला. त्यासाठी पहाटे उठण्यापासून दिवसभराचे वेळापत्रक ठरलेले असायचे. त्यानुसार सराव करून सचिनने क्रिकेट जगतात आपले आणि देशाचेही नाव उंचावले. यासाठी आचरेकरांसारखे गुरू लाभावे लागतात हे खरे असले, तरी सचिनसारखा सर्वोत्तम शिष्यही गुरुचरणी लीन होणे आवश्यक असते. हे सर्व संस्कारांमुळेच शक्य आहे.

रमाकांत आचरेकरांकडे सचिनसोबतच विनोद कांबळीही क्रिकेटचे धडे घेत होता. दोघेही एकाच प्रशिक्षकाकडून क्रिकेटचे संस्कार अर्थात धडे घेत असतानाच सचिनने जागतिक कीर्ती मिळवली तर विनोद कांबळी आज जवळपास विस्मरणात गेला आहे. काही दिवसांपूर्वी रमाकांत आचरेकर यांच्या स्मारकाचे उद्घाटन मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी आचरेकरांचे सचिन आणि विनोद हे दोन्ही शिष्य व्यासपीठावर उपस्थित होते. दोन्ही शिष्य असले तरी सचिनला तेथे मध्यभागी मानाचे स्थान मिळाले होते, तर विनोद कांबळीला अगदी कोपऱ्यात ठेवण्यात आले होते. ही स्थिती का निर्माण झाली याचा विचार विनोद कांबळीने करणे गरजेचे होते. आपल्याच सोबत असलेल्या सचिनला मानाचे स्थान मिळाले असताना माझ्यावर ही स्थिती का ओढवली, यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. यासाठी गुरू जरी चांगला असला, तरी शिष्यही त्याच तोडीचा असणे आवश्यक आहे. सचिनने आपल्या संस्कारांनी आज क्रिकेट जगतात आणि इतरही क्षेत्रांत नाव कमावले आहे. त्याने धावांचा पाऊस तर पाडलाच; पण आपल्या संस्कारांनी आणि वागणुकीने लोकांनी त्याच्यावर प्रेमाचा वर्षावही केला आहे. तो दिवसेंदिवस वाढतच आहे.


सचिनच्या यशाचे रहस्य त्याच्या संस्कारात आहे, असेच म्हणावे लागेल. एक चांगला माणूस व आदर्श नागरिक बनण्याची सुरुवात घरापासूनच व्हायला हवी. चांगल्या सवयीचे आणि चांगल्या संस्काराचे महत्त्व पटवून द्यायला पाहिजे. संस्कार म्हणजे गुणांचे वर्धन आणि दोषांचे निर्दालन करणे होय. महाभारतात कर्णही शिष्योत्तम होता. तोही पांडवच होता. पराक्रमी होता. पण अधर्मी दुर्योधनाच्या नादी लागल्याने त्याचा निःपात झाला. दुर्योधनाच्या प्रत्येक पापामध्ये त्याने साथ दिली आणि स्वतःचा विनाश करून घेतला. तसेच विनोद कांबळीचेही झाले. क्रिकेटमध्ये लहान वयात अनेक विक्रम आपल्या नावावर करूनसुद्धा त्याला यश पचवता आले नाही. यशामुळे मिळणारी प्रसिद्धी आणि त्यातून मिळणारा पैसा यामुळे तो नको त्या भानगडीत पडला आणि क्रिकेटकडे दुर्लक्ष झाले. यशोशिखरावरून थेट जमिनीवर आदळला तो कायमचाच. दुसरीकडे सचिन तेंडुलकर हळूहळू यशाची शिखरे पादाक्रांत करत होता. तो परिपक्व होत असतानाच तेवढाच विनम्र झाला. त्याचा फायदा त्याला क्रिकेट आणि त्याच्या आयुष्यातही झाला आणि तो क्रिकेट रसिकांचा रमाकांत आचरेकरांचा शिष्योत्तम ठरला. याच शिष्याने आपल्या गुरूला आदरांजली म्हणून दादर येथील शिवाजी महाराज पार्क मैदानातील गेट क्रमांक ५ येथे स्मारक उभारले. एका शिष्याने आपल्या गुरूसाठी आणखी काय करावे. एकीकडे सचिन गुरूसाठी स्मारक उभारत असताना विनोद कांबळी आयुष्याची शर्यत कशीतरी पूर्ण करत आहे. या स्मारकाचे अनावरण मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर आणि स्मारकाचे सल्लागार मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी केले. राज ठाकरे आणि सचिनने उपस्थितांना संबोधित केले. राज ठाकरे यांनी यावेळी आचरेकर सरांचा पुतळा उभारण्याऐवजी स्मृती स्मारकच का उभारले, या मागचे रहस्यही सांगितले. पुतळ्याऐवजी प्रतीकात्मक स्वरूपात बॅट, यष्टी, ग्लोव्हज यावर आचरेकर सरांची ओळख असलेली कॅप ठेवत हे स्मारक आता सर्वांना प्रेरणा देत राहणार आहे. यशाच्या शिखरावर असतानाही सचिन तेंडुलकर आपल्या मित्राला अर्थात विनोद कांबळीला विसरला नाही. त्याने कार्यक्रमात विनोदची विचारपूस केली. असा हा सचिन शिष्योत्तम ठरला.

९८५०७५३२८१

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# कोत्या वृत्तीचे!



महाराष्ट्राला एक मोठा समृद्ध राजकीय वारसा आहे. राजकीय विचारांची संस्कृती आणि संस्कार आहेत. जे यशवंतराव चव्हाणांपासून २०१९ पर्यंत आजचे राजकारणी नेटाने जोपासत आलेत. राजकारणात भूमिकांवर, विकास कामांवर चर्चा व्हायची, वैचारिक मतभेद असले तरी, वैयक्तिक हेवेदावे, शत्रुत्व असे कोणी कधीही केल्याचे ऐकिवात नाही. महाराष्ट्रातील राजकारण हे भारतीय राजकारणावर प्रभाव टाकणारे राजकारण असायचे, किंबहुना आहे. अशा पद्धतीचे 'हेल्दी पॉलिटिक्स' महाराष्ट्राचे होते. पण महाराष्ट्र या अत्यंत प्रगल्भ आणि सुसंस्कृत राजकीय परंपरेला गालबोट लावण्याचं काम यावेळी विरोधकांनी केलं आहे. लोकशाही मार्गानं आलेल्या सरकारच्या सरकारी सोहळ्यावर बहिष्कार टाकण्याचे जाहीर करून, महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आपल्या कोत्या मनोवृत्तीचं दर्शन घडवलं आहे.

संविधान आणि लोकशाही वाचविण्याचे ढोंग करणाऱ्या मविआच्या नेत्यांनी खऱ्या अर्थाने संसदीय लोकशाहीचा पायाच नष्ट करण्याचा घाट घातल्याचे चित्र दिसत आहे. एकीकडे आपणच लोकशाही वाचविण्याचा डांगोरा पिटायचा आणि लोकशाहीतील स्तंभांना खिळखिळे करण्याचं, नष्ट करण्याचं षडयंत्र रचायचं. बरं हे सगळं कशासाठी तर आपला राजकीय उल्लू सिधा करण्यासाठी. लोकशाही मार्गानं जनतेनं निवडून दिलेल्या सरकारच्या समारंभावर बहिष्कार म्हणजे, लोकशाहीवर अविश्वास दर्शविण्याचा प्रकार विरोधकांनी केला. यापूर्वी विरोधकांनी न्यायालये आणि निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक संस्थांवर सातत्याने अविश्वास दर्शविला. कारण काय तर, केवळ निवडणुकांमध्ये पराभव झाला म्हणून. पराभव पचवता न येणाऱ्या या विरोधी पक्षांच्या नेत्यांनी मग आपल्या अपयशाचं खापर ईव्हीएम, संवैधानिक संस्थांवर फोडून या संस्थांना बदनाम करण्याचा प्रयत्न चालवला. मात्र, त्याचवेळी उद्धव ठाकरेंचे पुत्र आदित्य, या रणसंग्रामात नवखा असलेला मावसभाऊ वरुण सरदेसाई, संजय राऊत यांचे बंधू सुनील राऊत यांच्यासह २० लोक निवडून आले आहेत. दुसरीकडे शरद पवारांचे १० आणि काँग्रेसचे १६ आमदार निवडून आले आहेत. तेदेखील याच ईव्हीएमद्वारे घेण्यात आलेल्या निवडणुकीच्या माध्यमातून. महाराष्ट्रासोबत झारखंडची सुद्धा निवडणूक ईव्हीएमद्वारेच झाली. तेथे भाजपा चांगलीच माघारली. पाहिजे तसे यश मिळवू शकली नाही. आणि स्थानिक पार्टी असलेली झारखंड मुक्ती मोर्चाने दणदणीत विजय मिळविला. अर्थात हे जेथे जेथे जिंकतील तेथील ईव्हीएम योग्य आणि हरले की ईव्हीएम खराब असा ढोंगीपणा चालत नाही.

लोकसभेत महाराष्ट्रात महायुतीला अपेक्षित यश मिळाले नाही. त्यावेळी भाजपाचे समर्थक प्रचंड नाराज झाले आणि चिडले देखील. त्यामुळे एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करायला सुरुवात केली. समाजमाध्यमांवरून या नेत्याला जबाबदार, त्या नेत्याला जबाबदार, धोरण चुकलं, अजित पवारांना घ्यायला पाहिजे नव्हतं, जागावाटपाचा घोळ केला, उशीर केला. असे अनेक आरोप सामान्य कार्यकर्त्यांपासून, पदाधिकाऱ्यांनी एकमेकांवर केले. पण ईव्हीएम किंवा संवैधानिक संस्थांवर कधी आरोप केला नाही. पराजय स्वीकारला आणि नव्या जोमानं कामाला लागले. त्याचवेळी महाविकास आघाडीने मात्र लोकसभेत धमाकेदार यश मिळवलं होतं. तेव्हा ईव्हीएम ठीक होतं. आता दोन लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणुका झाल्या. एक नांदेड आणि दुसरे वायनाड. नांदेड येथे काँग्रेसचे रवींद्र चव्हाण आणि वायनाडमध्ये प्रियांका वाढ्रा जिंकल्या तर, झारखंड झामुमोनं जिंकलं. त्यावर काही आक्षेप नाही. आक्षेप हरलेल्या जागांवर आहे. आणि भाजपाने मशीन हॅक करून वायनाडमध्ये प्रियांका यांना हरवून काँग्रेसचे नाक कापले असते. आता पृथ्वीराज चव्हाण आणि बाळासाहेब थोरातांसारखे पडले आणि प्रदेशाध्यक्ष नाना पटोले २०० मतांनी निवडून आले. ईव्हीएम हॅक करून पाडायचंच होतं तर, थेट काँग्रेस प्रदेशाध्यक्षाला पाडून तोंड दाखवायला जागा ठेवली नसती ना. चव्हाण आणि थोरातांसारख्या मवाळ नेत्यांना पाडून भाजपाला मिळणार तरी काय?

महाराष्ट्र हे उत्तरप्रदेशनंतर सर्वांत मोठं राज्य आहे. सोबतच आर्थिक राजधानीदेखील आहे. त्यामुळे महाराष्ट्रात सत्ता आणण्यात मोदी-शाहांचं स्वारस्य असेलच, यात शंका नाही. पण ते ईव्हीएम हॅक करून आणण्यात काय स्वारस्य? खरं स्वारस्य तर या दोघांना आपली सत्ता आणि पदं टिकविण्यात असेल. हा मानवी स्वभाव आहे. त्यासाठी केंद्रात सत्ता आणण्यासाठी ते शर्थीचे प्रयत्न करतील ना. मग बदनामी सहनच करायची असेल तर ते स्वतःसाठी बदनाम होतील. आपलं पंतप्रधान पद टिकलं पाहिजे यासाठी लोकसभा निवडणुकीत ईव्हीएम हॅक करून, भाजपाचं सरकार बनेल एवढं संख्याबळ आणतील ना मोदी-शाह. ईव्हीएम हॅक करण्यासारखी सवलत उपलब्ध असताना, स्वतः अल्पमतातलं सरकार तारेवरची कसरत करत चालवण्याइतके मूर्ख आहेत हे दोघं असं विरोधकांना वाटत असेल, तर बुद्धीची दिवाळखोरी निघालेले यांच्यासारखे दुसरे या भूतलावर आढळणार नाही, हे निश्चित.

नुसतं ईव्हीएम ईव्हीएम ओरडून काहीही एक साध्य होणार नाही. यांच्या पक्षाला कुठलाही फायदा होणार नाही. जनतेच्या प्रश्नावरून सुदृढ राजकारण करण्याऐवजी, पराभवाचे आत्मचिंतन करण्याऐवजी संवैधानिक संस्थांना आणि लोकशाहीला नष्ट करण्याचा घातक प्रयत्न विरोधकांनी चालवला आहे. संविधान आणि लोकशाही वाचविण्याच्या गप्पा मारणाऱ्यांचं पितळ कालच्या शपथविधी समारंभावर बहिष्कारावरून उघडं पडलं आहे. खरंच ईव्हीएमवर आक्षेप असेल तर, मग अवॉर्ड परत करून आपला विरोध साहित्यिकांनी जसा नोंदविला होता. (हा प्रकार मोदींना बदनाम करण्यासाठीचं षडयंत्र होतं, तो भाग वेगळा) पण त्याचप्रमाणे, ईव्हीएमला विरोध असणाऱ्यांनी आपला निषेध विधानसभा आणि लोकसभा सदस्यत्वाचा राजीनामा देऊन नोंदवावा. आणि माझ्या मतदारसंघात बॅलेटवर निवडणूक घ्यावी असं आवाहन आयोगाला करावे. पण तसं हे करणार नाहीत. कारण आरोप केवळ जनतेत संभ्रम निर्माण करून, समाजात विष कालवून राजकीय स्वार्थ साधण्यासाठी केल्याचे यांच्या स्वतःच्या मनाला माहिती आहे.

राजकारणात जय-पराजय हा चालतच असतो. हरलं तर लाजायचं नाही आणि जिंकलं तर माजायचं नाही... अशी मानसिकता असली पाहिजे. आणि अशा पद्धतीची वाईट मानसिकता ठेवली तर, राजकारणात परत कधी उभं राहता येईल असे वाटत नाही. त्यामुळे किमान आधी संविधानानं दिलेल्या आपल्या संवैधानिक संस्थांना बदनाम करण्याचा प्रकार बंद केला पाहिजे. तेव्हाच खऱ्या अर्थाने संविधानाचा आदर राखला जाईल आणि लोकशाहीला वाळवी लागणार नाही.

९२७०३३३८८६

## डिजिटल अरेस्टचा वाढता धोका

गेल्या दहा वर्षांत भारताने सगळ्याच क्षेत्रांत झपाट्याने प्रगती केली आहे. नवनवीन योजना अमलात आणल्यामुळे सर्वसामान्य जनतेला पुरेपूर फायदा झाला आहे. सगळ्यात मेक इन इंडियाचा मंत्र प्रभावी ठरला आणि उद्योगधंदे वाढीला लागले.



स्टार्टअपसाठी अनेक तरुणांना उद्युक्त केले गेले आणि आता भारत देश जगातील तिसऱ्या नंबरचा स्टार्टअपचा देश आहे. ही प्रगती लक्षणीय आहे. अनेक माध्यमे डिजिटल करण्यावर मुख्यत्वे भर देण्यात आला त्यामुळे सर्वसामान्य जनता डिजिटली शिक्षित झाली. असे असताना त्याचे धोकेही वाढले आहेत. कारण गुन्हेगार टपून बसले असतात. लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन अनेकांची फसवणूक झाल्याचे दिसून येते. आपल्याला देखील अनेकदा फ्रॉड कॉल्स येतात. कोण कसे पैसे हडपतील याचा नेम नाही. जादा पैशाचे आमिष दाखवून फार मोठी आर्थिक फसवणूक केली जाते. प्रत्येकाने एक गोष्ट लक्षात ठेवावी की कोणीही फुकट पैसे वाटत नाही त्यामुळे या भूलथापांना बळी पडू नये.

नुकताच पंतप्रधानांनी 'मन की बात' या कार्यक्रमात अशा प्रकारच्या फसवणुकीपासून सावध असावे असा सल्ला दिला आहे. कोणतीही सरकारी, निमसरकारी संस्था एखाद्या व्यक्तीची फोन किंवा व्हिडीओ कॉलच्या माध्यमातून चौकशी करत नाही असे स्पष्ट केले होते. यात स्टॉक ट्रेडिंगमध्ये झालेल्या फसवणुकीचा आकडा सर्वाधिक असल्याचे दिसून आले. रोज अशा बातम्या वरचेवर वाचण्यात अथवा ऐकिवात येत आहेत. जन्मभर मेहनतीने कमावलेल्या पैशाचे असे नुकसान होऊ नये यासाठी आपण जागरूक होऊया आणि कुठल्याही भूलथापांना बळी न पडणे हे ध्यानात ठेऊया.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

## वाचक पत्रे

### ज्येष्ठ दाम्पत्यांच्या समस्या

भारतामध्ये सध्या ज्येष्ठ नागरिकांची संख्या ८ टक्के आहे. ती सन २०५० पर्यंत २० टक्के होणार आहे. विदर्भात नोकरी मिळत नसल्यामुळे मुले मुंबई, पुणे, नाशिक अशा मोठ्या शहरात किंवा परदेशात नोकरीसाठी गेलेली आहेत. त्यामुळे नागपुरात बहुतेक घरांमध्ये दोन ज्येष्ठ नवरा-बायको किंवा काही घरांमध्ये एकटा पुरुष किंवा एकटी ज्येष्ठ स्त्री राहताना दिसते. असे एकाकी ज्येष्ठ नागरिक हे त्यांच्या वयाच्या ७५ वर्षापर्यंत मुलांच्या आधाराशिवाय राहू शकतात. ७५ नंतर अशा ज्येष्ठ आई-वडिलांना मुलांच्या मदतीची गरज भासते. परंतु परगावी अथवा परदेशी असलेली मुले त्यांची नोकरी व संसार सोडून या वृद्ध आई-वडिलांची सेवा करण्याकरिता सतत येऊ शकत नाहीत.

जसं जसं वय वाढतं तशी मृत्यूची भीती जास्त वाटायला लागते, कारण मृत्यूचीच १०० टक्के गॅरंटी आहे. मृत्यूची भीती न बाळगता ज्येष्ठांनी मनाची शक्ती व आपल्यामधील आनंदी हार्मोन्स वाढवायला पाहिजे. सैरोटीनिन, डोपोमाईन, एन्ड्रोर्फीन आणि ऑक्सिटोसिन यांच्यासारखे संप्रेषण आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवतात. आणि म्हणून त्यांना आनंदी संप्रेषक असे म्हणतात. आनंदी संप्रेषण वाढवणारे काही घटक असे आहेत. पहिला म्हणजे दिवसाच्या २४ तासांपैकी किमान एक तास तरी आपण व्यायामासाठी रोज दिला पाहिजे. शक्य तेवढा वेळ निसर्गामध्ये घालवणे योग्य आहे. शक्य तेवढे लोकांना मदत करणे, कामे करणे हे आवर्जून केलं पाहिजे. आनंदी राहण्याकरिता हसणे आवश्यक आहे. दिवसातून किमान पंधरा मिनिटे सकाळी आणि पंधरा मिनिटे संध्याकाळी अशी ध्यानधारणा करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे आपण आपला चोवीस तासांचा दिवस आपल्या वेळ घालवणे योग्य आहे. हे जरी सर्व उपाय असले, तरी जेव्हा प्रकृती बिघडते, तेव्हा लक्ष फक्त आपल्या शरीराकडे जातं व आपण हतबल होऊन जातो. ही वेळ प्रत्येक ज्येष्ठ नागरिक आपल्या परिस्थितीनुसार ठरवायची आहे, असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

### संघ संस्कारांच्या दिव्यत्वाची प्रचीती



संघाचे संस्कार किती श्रेष्ठ आहेत, दिव्यत्वाकडे नेणारे आहेत याचा साक्षात्कार महाराष्ट्र राज्याला दिसणार आहे. देवेंद्र फडणवीस यांचे वडील संघाचे निष्ठावान स्वयंसेवक होते. संघात गंगाधररावांसोबत कबड्डी खेळण्याचा मलाही योग आला होता. संघासाठी ते कारावासामध्येही गेले. त्यांचा मुलगा म्हणजे आजचे मुख्यमंत्री देवेंद्र यांना बालपणीच संघाचे बाळकडू मिळाले होते. ते वकील आहेत, अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक आहेत आणि समाजसेवा म्हणजे राष्ट्रकार्य हे त्यांचे ब्रीद आहे. शांत, संयमी व सदैव स्मितहास्य असणारे ते लोकप्रिय मुख्यमंत्री आहेत. संघाच्या शतकी वर्षात संघ स्वयंसेवक मुख्यमंत्री बनतो हा योगायोग आहे.

**मधुकर अमृत डबीर**/९८२२६१५३३१

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

# बुलेटवरील दंड माफ करण्यासाठी पोलिस शिपायाने घेतली लाच

## लाचखोरास रविवारपर्यंत पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर. दि. ६ डिसेंबर -**

बुलेट दुचाकीवरील पूर्वीचा दंड माफ करतो अन् कंपनीचा सायलेन्सर नाही अशी सबब सांगून दीड हजाराची लाच स्वीकारल्याप्रकरणी शहर वाहतूक शाखा उत्तर विभागातील पोलीस अंमलदार बसप्पा शिवाजी साखरे (वय ३४, रा. १४८, प्रतिक नगर, मुरारजी पेठ, विलास गिराम यांच्या घरी भाड्याने, सोलापूर ब. नं. ५५५, नेमणूक - शहर वाहतूक शाखा, उत्तर विभाग, सोलापूर शहर) यास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. गुरुवारी ५ डिसेंबर रोजी ही कारवाई करण्यात आली. शुक्रवारी पोलिस शिपायास न्यायालयात हजर करण्यात आले असता त्यास विशेष न्यायाधीश यांनी रविवार पर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला.

पोलीस शिपाई बसप्पा साखरे हे शहर वाहतूक शाखा उत्तर विभागात कार्यरत आहेत. गुरुवारी ते ड्यूटीवर असताना त्यांनी तक्रारदार हे त्यांच्या बुलेट दुचाकीस्वारास थांबवून बुलेटचा सायलेंसर हा कंपनीचा नाही तसेच बुलेटवर यापुर्वीचा तीन हजार रुपये दंड पेंडिंग असल्याचे सांगून तक्रारदाराची बुलेट ताब्यात घेतली. त्यानंतर साखरे यांनी स्वतः दुचाकी चालवत तक्रारदारास पाठीमागे बसवून जेलरोड पोलीस स्टेशन जवळील ट्रॅफिक डंपयार्ड येथे बुलेट आणून लावली. त्यांनतर साखरे यांनी तक्रारदाराला बुलेटवरील यापूर्वीचा दंड ३ हजार रुपये माफ करतो, असे सांगून २ हजार रुपयाची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना पावतीची मागण केली. त्यावेळी पावती नसते असे सांगून तातडीने पैसे आणून देण्याची मागणी केली. दरम्यान तडजोडीअंती १५०० रुपयांची मागणी अंमलदाराने केली.

त्यानंतर तक्रारदाराने लाचलूचपत विभागाच्या पथकास संपर्क साधून तक्रार दिली. यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सापळा लावून लाच स्वीकारताना पकडले. याबाबत जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस उपअधीक्षक गणेश कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गणेश पिंगुवाले, हवालदार शिरषकुमार सोनवणे, सचिन राठोड, शाम सुरवसे यांच्या पथकाने केली.

### घरझडतीमध्ये काही नाही मिळाले

पोलिस शिपाई साखरे यांना लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर पकडल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने त्यांच्या घराची रात्री उशिरापर्यंत झडती घेतली. या तपासणीमध्ये साखरे यांच्या घरातून काहीही आक्षेपार्ह मिळाले नाही.

### पोलिस आयुक्तांनी वाहतूक शाखेत लक्ष घालण्याची गरज

सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयामध्ये सोलापूर शहर आणि सोलापूर दक्षिण वाहतूक शाखा असे दोन विभाग आहेत. या दोन विभागामध्ये शहरातील वाहतूक व्यवस्थेचे नियोजन विभागून करण्यात येते. शहर वाहतूक शाखेत रायटर या पदाला (हे शासन नियुक्त पद नाही) खूप महत्व आहे. उत्तर आणि दक्षिण शाखेत मिळून सुमारे १६० कर्मचारी हे वाहतूक शाखेकडे कार्यरत आहेत. वाहतूक शाखेतील प्रत्येक शाखेकडील सुमारे ३०-३५ कर्मचारी हे रायटर म्हणून काम करतात. हे रायटर जर वाहतूक सुरळीत करण्याचे काम करीत असतील तर शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारली पाहिजे. परंतु, हे रायटर दिवसभरात काय काम करताता, याकडे कोणताही अधिकारी पाहात नाही. त्यामुळे रायडर म्हणून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कामाचे मोजमाप वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून होणे गरजेचे आहे. याशिवाय शहरात येणाऱ्या प्रत्येक रस्त्यावरील नाक्यावर (जे की आता बंद आहेत) तीन ते चार कर्मचारी हे टोळक्याने थांबलेले दिसतात. हे कर्मचारी कोणते काम करतात, याकडेही वरिष्ठांनी पाहणे गरजेचे आहे. वाहतूक शाखेत चौकात थांबून वाहतूक नियमनाचे काम करणारे कर्मचारी आणि रायटर यांच्यात अधिकाऱ्यांकडूनच दुजाभाव केला जात असल्याची चर्चा कर्मचाऱ्यांमधून होत आहे. त्यामुळे शहर वाहतूक शाखेकडे पोलिस आयुक्तांनी लक्ष देऊन वाहतूक शाखा सुधारण्याची गरज असल्याचे मत अनेक अधिकाऱ्यांमधून नाव न सांगण्याच्या अटीवर व्यक्त केले जात आहे.

# खून प्रकरणातील महिला आरोपीचा जामीन फेटाळला

## पंजाब तालीम घर जागेचा वाद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

घर जागेच्या वादासंबंधी झालेल्या तक्रारीमध्ये आरोपी नातेवाईकांनी संगणमत करून शहाजहान गुलहमीद शेख यांना लाकडी दांड्याने मारहाण करून जीवे ठार मारल्या प्रकरणी दाखल गुन्ह्यामध्ये अटकेत असलेली महिला आरोपी रेहाना समीर शेख हिचा जामीन अर्ज सोलापूर येथील सत्र न्यायाधीश योगेश राणे यांनी फेटाळून लावला.



९ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी साडे नऊच्या वाजण्याच्या सुमारास घरजागेच्या वादा संबंधी चर्चा करीत असताना आरोपींनी संगणमत करून शहाजहान गुलहमीद शेख यांना लाकडी दांडक्याने ठिक ठिकाणी मारून जखमी करून त्यांचा खून केल्याप्रकरणी त्यांचा मुलगा सलीम शहाजहान शेख, (वय- ३० वर्ष, राहणार- पंजाब तालीम, सोलापूर) यांनी फौजदार चावडी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने सदर गुन्हातील आरोपी साबीर शेख, समीर शेख, साकिब शेख, सुफियान शेख, रेहाना शेख, मेहरुन शेख अशा आरोपींच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०३ व इतर कलमांतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हामध्ये पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली व त्यांना पोलीस कस्टडीनंतर न्यायालयीन कोठडीमध्ये रवानगी झालेली आहे. सदर घटने मधील महिला आरोपी रेहाना समीर शेख यांनी सोलापूर येथील सत्र न्यायालयामध्ये जामीन अर्ज सादर केला होता. सदर जामीन अर्जावर सुनावणी वेळी वकीलांचा युक्तिवाद ग्राह्य धरून सोलापूर येथील सत्र न्यायाधीश राणे यांनी आरोपी महिला रेहाना समीर शेख हिचा जामीन अर्ज फेटाळून लावला. सदर प्रकरणांमध्ये सरकार पक्षा तर्फे दत्ता पवार यांनी फिर्यादीतर्फे ॲड. रियाज एन. शेख एन तर महिला आरोपी तर्फे लोक अभिरेक्षक शिवकुमार झुरळे यांनी काम पाहिले.

## संक्षिप्त वृत्त



### जिल्ह्यातील १ लाख ३२ हजार शेतकऱ्यांनी भरला पीकविमा

**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

केंद्र सरकारने समावेशक पीक विमा योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. ही योजना गहू (बागायती), ज्वारी (जि) व हरभरा या तीन पिकांसाठी लागू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत सहभागी होण्यासाठी हरभरा व गहू या पिकासाठी ता. १५ डिसेंबर मदुत असून, तर ज्वारीसाठी ३० नोव्हेंबर अंतिम मुदत होती. यामध्ये आजतागायत १ लाख ३१ हजार ८७६ शेतकऱ्यांनी ९८०१४ हेक्टर क्षेत्रावर पीकविमा उतरला असल्याची माहिती कृषी विभागाकडून मिळाली. कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी ही विमा योजना ऐच्छिक आहे. पीक पेरणीपासून काढणीपर्यंतचा कालावधी नैसर्गिक आग, वीज कोसळणे, गारपीट, वादळ, चक्रीवादळ, पूर, क्षेत्र जलमय होणे, आदी जोखीम यामध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहे. सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी यामध्ये मोठा सहभाग दर्शविला असून, याची तालुकानिहाय आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे. (क्षेत्र हेक्टरमध्ये आहे) अक्कलकोट ५ हजार २४५ शेतकऱ्यांनी ४ हजार ४८९ क्षेत्रावर विमा उतरला आहे. तर बार्शी ३५५६३ शेतकरी तर क्षेत्र ३०७२२, करमाळा १०९१८ शेतकरी तर ६ हजार २४७ क्षेत्र, माढा २१६०२ शेतकरी तर १३२८३ क्षेत्र, माळशिरस ४१६२ शेतकरी तर २३२० शेतकरी, मंगळवेढा १६६९२ शेतकरी तर १३७७८ क्षेत्र, मोहोळ ४६६२ शेतकरी तर ४५९६ क्षेत्र, पंढरपूर ७४० शेतकरी तर ५०२ क्षेत्र, सांगोला २६४५८ शेतकरी तर १६८६६ क्षेत्र, उत्तर सोलापूर ३०९२ शेतकरी तर २८१७ शेतकरी, दक्षिण सोलापूर २७३६ शेतकरी तर २३९६ हे. क्षेत्र आहे. तर पूर्ण ११ तालुक्यातील १ लाख ३१ हजार ८७६ शेतकऱ्यांनी ९८ हजार ०१४ हेक्टरवर पिकविमा उतरला आहे. यामध्ये हरभरा पिकासाठी जिल्ह्यातील २१ हजार ६३८ शेतकऱ्यांनी १४ हजार ०३९ हे. क्षेत्रावर पिकविमा उतरला तर भुईमूगासाठी ६ हजार २२२ शेतकऱ्यांनी ३४२५ हे. वर पीकविमा उतरला आहे. कांदा पिकासाठी २१७६६ शेतकरी तर संरक्षित क्षेत्र १४२८४, रब्बी ज्वारी बागायत २९७९५ शेतकरी तर संरक्षित क्षेत्र २४६५६ हे., जिरायत ज्वारी ३६७३१ शेतकरी तर ३२५१३ संरक्षित क्षेत्र, गहू या पिकासाठी १५ हजार ७२४ शेतकऱ्यांनी ९०९७ हे. क्षेत्रासाठी पिकविमा उतरला आहे.

## निधन वृत्त...

### छगन जाधव



**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

सेटलमेंट फ्री कॉलनी, डोणगाव रोड, सोलापूर येथील रहिवासी छगन तुळजाराम जाधव (वय ८५) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, दोन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. मंगळवेढ्याचे निवृत्त गटविकास अधिकारी राजेंद्र जाधव यांचे ते चुलते होत.

### सुरेखा शिंदे



**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

बैरागवाडी (ता. माढा) येथील रहिवासी सुरेखा रामदास शिंदे (वय ८५) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. जिल्हा कोषागार कार्यालयातील उपलेखापाल मंगेश शिंदे यांच्या त्या आई होत.

### रत्नाबाई गुब्याडकर



**सोलापर, दि. ६ डिसेंबर-**

रत्नाबाई सिद्राम गुब्याडकर (वय ६८ ) यांचे ५ डिसेंबर रोजी रात्री ११:३० वाजता हृदयविकाराच्या तिव्र झटक्याने आकस्मित निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी तुळजापूर वेस येथील लिंगायत रुद्रभूमी, अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते रवी गुब्याडकर यांचे त्या मातोश्री होते.

### सुभाष पाटील



**सांगोला,दि.६ डिसेंबर-**

सरमकुंडी (ता.वाशी) येथील रहिवासी सुभाष गोविंद पाटील (वय-७०) यांचे अल्पशा आजाराने गुरुवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, पुतणे, भाचे असा परिवार आहे. पत्रकार दिपक भाकरे यांचे ते मामा होत.

### गायत्री वीर



**करमाळा, दि. ६ डिसेंबर-**

शहरातील सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. चंद्रकांत वीर यांच्या कन्या गायत्री वीर (वय २५) यांचे बुधवारी रात्री ११ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. गेल्या दहा दिवसांपासून त्यांच्यावर मुंबई येथील रुग्णालयात उपचार सुरु होते. गायत्री या बी. ई. कॉम्प्युटर सायन्सचे शिक्षण घेत होत्या.

### शांताबाई पाटोळे



**अक्कलकोट, दि. ६ डिसेंबर-**

येथील हन्नूर नाका, ढाले वस्तीमधील शांताबाई तुकाराम पाटोळे (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. सोलापूर जिल्हा मोची समाजाचे उपाध्यक्ष राजू पाटोळे यांचे त्या मातोश्री होत.




# जिल्हा युवासेना संपर्क प्रमुख सागर पाटील यांच्या गाडीची तोडफोड

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ६ डिसेंबर-**

सांगोल्याचे माजी आ. शहाजीबापू पाटील यांचे पुतणे व शिवसेनेचे सोलापूर जिल्हा युवासेना संपर्क प्रमुख सागर पाटील यांच्या गाडीची शुक्रवारी दुपारी अज्ञात व्यक्तीने तोडफोड केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, सांगोल्याचे माजी आ. शहाजीबापू पाटील यांचे पुतणे व शिवसेनेचे सोलापूर जिल्हा युवासेना संपर्क प्रमुख सागर पाटील हे शुक्रवारी माजी आ. शहाजीबापू पाटील यांच्या कार्यालया समोर (क्र. एम. एच. ४५/ ए. यू.१९२९) या नंबरची पांढऱ्या रंगाची गाडी लावून कार्यालयात आपल्या कार्यकर्त्यांसोबत बसले होते. त्याचवेळी दुपारी दोन ते अडीचच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने गाडीच्या पाठीमागील बाजूस तोडफोड केली आहे. सदर घडलेल्या प्रकारानंतर शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी व बापूप्रेमींनी सोशल मीडियाद्वारे निषेध व्यक्त करत शांत व संयमी असलेल्या सागर पाटील यांच्या गाडीची तोडफोड करणाऱ्यांवर पोलिसांनी लवकरात लवकर कठोर कारवाई करावी. अन्यथा शिवसेनेच्या वतीने हल्लेखोरांना शिवसेना स्टाईलने उत्तर दिले जाईल असा इशारा दिला आहे.

# पतंग उडविताना विजेचा शॉक लागून सख्खे भाऊ जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

शहरातील शास्त्रीनगर परिसरात पतंग उडवत असताना शुक्रवारी सायंकाळी विजेचा शॉक लागून दोघे सख्खे भाऊ जखमी झाल्याची घटना घडली.

रेहान बख्तियार फुलारी (वय १८) आणि अमन बख्तियार फुलारी अशी जखमींची नावे आहेत. त्यांच्यावर सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. शुक्रवारी सायंकाळी पाचच्या सुमारास रेहान आणि अमन हे दोघेही घराच्या गच्चीवर पतंग उडवीत होते. त्यावेळी विद्युत तारेला स्पर्श होऊन दोघे भाऊ गंभीररित्या जखमी झाली. त्यामुळे त्यांना तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत करण्यात आली आहे

Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project
**E-TENDER NOTICE NO :2024_DOAWB_1121887**
**Supply, Installation, Commissioning and Testing of Fully Automatic Rice Mill 4 TPH**
The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. Yekodi Farmer Producer Company Ltd. Yekodi, Tal. - Sakoli, Dist. -Bhandara is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned Machinery. The bid document is also available on the project website **www.smart-mh.org,** in tender and procurement section. The last date for submission of online bid is **26/12/2024 up to 12 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned websites only.
**District Implementation Unit, SMART Project, Dist. Bhandara**

## जाहीर प्रकटन

अपर्णा संदेश गोडसे, संदेश दत्तात्रय गोडसे व दादासाहेब गणपत गोडसे रा केम, तालुका करमाळा जिल्हा सोलापूर यांनी दिनांक ०५/१२/२०२४ रोजी ईक्विटास स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड शाखा बार्शी यांचे हक्कात मौजे केम, तालुका करमाळा जिल्हा सोलापूर येथील सि स नं ४३७ याचा ग्रामपंचायत मिळकत नंबर ४६९ याचे क्षेत्र २०५६ चौरस फूट यामध्ये २००० चौरस फूट आर सी सी बांधकाम या मिळकतीचे नोटीस ऑफ इन्टिमेशन गहाणखत (इक्विटेबल मॉर्गेज) दस्त क्रमांक ११०/२०२४ करून दिले असून सदरील गहाणखत (इक्विटेबल मॉर्गेज) बद्दल कोणासही काही आक्षेप असल्यास जाहीर प्रकटनच्या तारखेपासून सात दिवसाच्या आत खालील विधीज्ञांची संपर्क करावा दिनांक ०६/१२/२०२४

**जाहीर नोटीस देणार**
**सही/-**
**ॲड. प्रवीण करंजकर**
**रघु वंश पाटील प्लॉट्स, बार्शी ४१३४११**
**९८२२०६५६६१**

# डॉ. दरेकर यांना 'एमिनेन्स एक्सलन्स अवॉर्ड' प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**




वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स, वर्ल्ड सेंट्रल एक्झिक्युटिव्ह कमिटी इंग्लंडने डॉ. संदीप व्ही. दरेकर यांची "एमिनेन्स एक्सलन्स अवॉर्ड-२०२४" अत्यंत प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय पुरस्कार निवड केली आहे.

मुंबई मेरिट इंटरनॅशनल येथे करंडक, आंतरराष्ट्रीय सन्मान पत्र आणि पदक मेडल देऊन त्यांना प्रख्यात शास्त्रज्ञ एच.ई. प्रो. डॉ. मधु कृष्णन, अल-फराबी कझाक नॅशनल युनिव्हर्सिटी कुलपती प्रा. डॉ. डेम तात्याना मौल, मेडिसीना अल्टरनेटिव्हा, श्रीलंकाचे विश्वस्त संचालक रोशन मद्दुमागे यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मानित केले.

डॉ. दरेकर हे कॉर्पोरेट फायनान्स, ट्रेड फायनान्स, बँकिंग, ट्रेझरी आणि वर्किंग कॅपिटल मॅनेजमेंटमध्ये १५ वर्षांपेक्षा जास्त कौशल्य असलेले डायनॅमिक व्यावसायिक आहेत. मुंबई विद्यापीठातून फायनान्समध्ये एमबीए केलेले, त्यांनी बजाज ग्रुप, शापूरजी पालोनजी ग्रुप, तायल ग्रुप आणि गॅमन इंडिया यांसारख्या नामांकित संस्थांमध्ये प्रमुख पदे भूषवून कॉर्पोरेट जगतात स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. संदीपचे योगदान मोठ्या प्रमाणावर ओळखले गेले आहे. त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मान मिळाले आहेत.

कॉर्पोरेट व्हिजनरी, कॉर्पोरेट उत्कृष्टता, सामाजिक परोपकारी आणि सामाजिक प्रभावाचा प्रवास, सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी लोकांशी संपर्क साधण्याची उत्कट इच्छा, त्याच्या कॉर्पोरेट प्रशंसापलीकडे, संदीपचे जीवन समाजाला परत देण्याच्या त्याच्या विश्वासाचा पुरावा आहे. त्यांचे कार्य वंचित विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहाय्य, महिला सक्षमीकरण, ज्येष्ठ नागरिक काळजी, वैद्यकीय सहाय्य आणि सामुदायिक प्रतिबद्धता कार्यक्रमांसह सामाजिक कल्याणाच्या विविध आयामांमध्ये पसरलेले आहे. सामाजिक जबाबदारीसह कॉर्पोरेट यशाचा समतोल कसा साधावा याचे उदाहरण देतात, इतरांना समाजावर अर्थपूर्ण प्रभाव पाडण्यासाठी प्रेरणा देतात. विद्यार्थ्यांसाठी शिक्षण आणि शाळांमध्ये पायाभूत सुविधांचा विकास करणे. ग्रामीण भागात महिला सक्षमीकरण कार्यक्रम आयोजित करणे. गरजूंना वैद्यकीय सहाय्य प्रदान करणे आणि आरोग्य सेवा जागरूकता वाढवणे. लायन्स क्लबसह शाश्वततेला चालना देण्यासाठी प्रमुख जलसंधारण प्रकल्प. स्वच्छ भारत अभियानात सक्रिय सहभाग. सर्वांसाठी उज्वल भविष्य निर्माण करण्यासाठी शिक्षण, सामुदायिक सहभाग आणि शाश्वत पद्धतींद्वारे व्यक्तींचे सक्षमीकरण करण्यावर त्यांचा विश्वास आहे.

## जाहीर समन्स

नि. नं. २४
रे.मु.नं.२१८/२०२४
पु.ने.ता.११/१२/२०२४

**बार्शी येथील मे. ३ रे सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर (श्रीमती गायत्री एस. पाटील मॅडम सो. यांचे कोर्टात**

**वसुधा दिनकर सुलाखे** - वादी
विरुद्ध
**अमोल भास्कर सुलाखे वगैरे** - प्र.वादी

प्रति,
प्रतिवादी क्र.१-अमोल भास्कर सुलाखे वय ६५ वर्षे धंदा-व्यवसाय रा. ८२२/२अ कर्मवीर हाऊसिंग सोसायटी अलीपुर रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

ज्याअर्थी यातील वादीने तुमचेविरुद्ध व इतरांविरुद्ध बार्शी येथील कोर्टात हिशेब होवून मिळणेचा दावा दाखल केलेला आहे व तो वर नमूद कोर्टात न्यायप्रविष्ठ आहे. त्या दाव्यातील नि. २१ च्या आदेशानुसार आपणांस सदरचे जाहीर समन्स देण्यात येत आहे की,

त्याअर्थी, तुम्हास या जाहीर समन्स द्वारे कळविण्यात येते की, सदर दाव्याच्या कामी पुढील तारीख ११/१२/२०२४ अशी नेमण्यात आलेली आहे. तरी तुम्ही सदर तारखेदिवशी स्वतः अगर तुमचे प्रतिनिधीमार्फत दाव्याच्या कामी हजर राहुन, आपले रितसर कैफियत व म्हणणे मांडावे याउपरही आपण हजर न राहिल्यास मे. कोर्ट तुमचेविरुद्ध पुढील एकतर्फा आदेश पारीत करतील. पुढे होणाऱ्या परीणांमास आपण व्यक्तिशः सर्वस्वी जबाबदार रहाल याची आपण नोंद घ्यावी.

हे जाहीर समन्स दिले असे ता.०६/१२/२०२४

**सही/-** **लिपीक**
कोर्टाचा शिक्का
**सही/-**
**सह. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**कनिष्ठ स्तर, बार्शी**

## जाहीर नोटीस

दिवाणी किरकोळ अर्ज नंबर ५०/२०२४

**सांगोला येथील मे. सि. ज. ज्यु. डी यांचे कोर्टात**

**श्री. संतोष गणपत सोनवणे**
वय - ३९, धंदा - पेंटीग
रा. सुकेवाडी, ता. संगमनेर
जि. अहमदनगर, हल्ली मु खांडगांव
ता. संगमनेर जि. अहमदनगर, - **अर्जदार**
विरूध्द
**कोणीही नाही** - **सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार यांचे वडील कै. गणपत बाळकृष्ण सोनवणे यांची सख्खी बहीण कै. शारदा बाळकृष्ण सोनावणे हिचे अल्पशा आजाराने दिनांक २८/०६/२०२४ रोजी मौजे खांडगांव, ता. संगमनेर, जि. अहमदनगर येथे निधन झाले. अर्जदार यांचे वडील कै. गणपत बाळकृष्ण सोनवणे यांची सख्खी बहीण कै. शारदा बाळकृष्ण सोनावणे यांची मौजे सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापुर येथे खालीलप्रमाणे स्थावर मालमत्ता आहे. त्याचा सिटी सर्व्हे नंबर २४४३ एकुण क्षेत्र १८९ चौरस मिटर पैकी ३७.८ चौरस मिटर (पत्रा खोली.) या मिळकतीस अर्जदार यांचेशिवाय त्यांचे पश्चात त्यांना अन्य कोणतेही कायदेशिर वारस नाहीत. म्हणुन वारस सर्टिफिकेट मिळणेकामी सदरचा अर्ज अर्जदारांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी ज्या कोणाची, त्याबाबत हरकत असेल त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसांचे आत अथवा नेमलेली तारीख १८/१२/२०२४ रोजी स्वतः अगर वकीलामार्फत लेखी हरकत द्यावी. अन्यथा अर्जदार यांचे शिवाय वर नमुद मिळकतीस अर्जदार यांना वारस म्हणुन वारस दाखला देणेबाबत मे. कोर्ट योग्य ते हुकुम करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली. ता. ०३/१२/२०२४

**सही/-** **लिपीक**
कोर्टाचा शिक्का
**हुकूमावरून**
**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, सांगोला**

**मध्य रेल्वे**
**दुरुस्त करणे**
अध्यक्ष, रेल्वे भर्ती सेल, मध्य रेल्वे, यांनी निविदा सूचना क्रमांक RRCCR-EC-GDCE-2024 जारी केली आहे. https://Ireps.gov.in या वेबसाइटवर दिनांक 13/11/2024 आणि वरील निविदेसाठी शुद्धीपत्र 03/12/2024 रोजी जारी केले आहे. तपशिलांसाठी, कृपया https://ireps.gov.in वर शुद्धिपत्र सूचना पहा 583
अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है

**मध्य रेल्वे**
**मुख्य प्रशासकीय कार्यालय**
**बांधकाम रस्ता सुरक्षा प्रकल्प**
**लेव्हल क्रॉसिंगच्या एलमिनेशनशी संबंधित काम**
**खुल्या निविदा सूचना क्रमांकः Cons-RSP-01 दिनांक 04/12/2023**
कामाचे नावः व्यवहार्यता अभ्यास हाती घेण्याचे काम, तपशीलवार प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे काम, मध्य रेल्वेवरील ग्रेड सेपरेटर्स बांधून लेव्हल क्रॉसिंगचे निर्मूलन / रस्त्यांचे विलीनीकरण / वळवणे इत्यादी संदर्भात बोली व्यवस्थापनासह तपशीलवार डिझाइन. अंदाजे खर्चः रु. 15,69,72168.00/- कमाईः रु. 9,34,900.00/- पूर्ण कालावधीः 12 महिने समावेश. पावसाळा निविदेची किंमतः रु. 0.00. निविदा दस्तऐवजांची उपलब्धताः निविदा दस्तऐवज IREPS वेबसाइट www.Ireps.gov.in वर 11:00 वाजेपर्यंत उपलब्ध असतील. 06.01.2025 चा. कार्यालयाचा पत्ताः मुख्य प्रशासकीय अधिकारी (बाधक) / रस्ता सुरक्षा प्रकल्पाचे कार्यालय, दुसरा मजला, जीएमची इमारत C.S.M.T., मेल आयडीः dycecrspcrgmall.com निविदा सादर करण्याची आणि उघडण्याची तारीख आणि वेळः ई-निविदा सर्व बाबतीत रीतसर पूर्ण झाली पाहिजे 11.00 तासांपर्यंत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अपलोड केले जाईल. 06.01.2025 रोजी वर नमूद केलेल्या वेबसाइटवर. निविदाकारांसाठी महत्त्वाची सूचनाः A) संभाव्य निविदाकार/ना सल्ला दिला जातो की त्यांची ऑफर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने टेंडर करण्यापूर्वी, त्यांनी अटी व शर्ती, एचऊ आणि निविदा दस्तऐवजाची किंमत सादर करण्याचा पात्रता निकष मोड यासंबंधीच्या निविदा तपशीलांचा संदर्भ घ्यावा. (B) वेळोवेळी जारी केलेली निविदा कागदपत्रे आणि शुद्धीपत्र वरील वेबसाइटवर निविदा उघडण्याच्या किमान 15 दिवस अगोदर उपलब्ध आहेत आणि या वेबसाइटवर पाहता येतील. 590
खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है

## CHANGE IN NAME

I hereby declare that my old name Ms. NAHID BEGUM A MAJEED ADTE has been changed to New Name **Mrs. NAHID SALAHUDDIN SHAIKH** and residing At 111, Mantri Chandak State, Hotgi Road, Solapur, Maharashtra - 413003 . Kindly Note The Same

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः खांडवी व ता बार्शी, जि. सोलापूर येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, मिळकतीचे वर्णन डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे खांडवी येथील हद्दीतील जिरायत शेतजमीन याचा तपशील:- गट नं. ४३५/३, याचे एकूण क्षेत्रफळ हे. ०१- ४४, आर आहे याचा आकार रु. ०१-२७ पैसे आहे., यासी चतुःसिमा पुर्वेस :- जमीन गट नं. ४३५/१ आणि ४३५/२, दक्षिणेस जमीन गट नं. ४३९ आणि ४४०., पश्चिमेस जमीन गट नं. ४३६, उत्तरेस जमीन गट नं. ४२१ आणि ४२२, अशी चतुःसीमापूर्वक जिरायत शेतजमीन.

सदर जिरायत शेतजमीन हि १) श्रीमती. आशाबाई बापू कुदळे, २) श्री. संतोष बापू कुदळे, ३) श्री. पंकज बापू कुदळे, आणि ४) सौ. शोभा दिपक भोसले यांचे वारस हक्काने प्राप्त झालेली असून प्रत्यक्ष मालकी कब्जे वाहिवाटीस आहे व सदर जिरायत शेतजमीनीच्या ७/१२ हक्कपत्रकी त्यांच्या नावाची नोंद आहे. सदरची जिरायत शेतजमीन ते विक्री करू इच्छितात, जिरायत शेतजमीन विक्री निघाले बाबत आमचे अशिलास समजलेने आमच्या अशिलाने योग्य ती किंमत देऊ केलेने १) श्रीमती. आशाबाई बापू कुदळे, २) श्री. संतोष बापू कुदळे, ३) श्री. पंकज बापू कुदळे, आणि ४) सौ. शोभा दिपक भोसले यांनी सदरची जिरायत शेतजमीन विक्री करणेबाबतचा करार आमच्या अशीलाशी केला. त्या व्यवहारापोटी आमच्या अशिलाकडून साक्षीदारासमक्ष इसार रक्कम स्वीकारली आहे व खरेदीखत करून देण्याचा व्यवहार आमच्या अशीला बरोबर ठरविला आहे.

सदर शेतीजमीनीवर कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसाचे आत आमचे वकिलांना खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही असे गृहीत धरून शेती जमीन बिनबोजाची, क्लिअर टायटल आहे असे गृहीत धरून सदर मिळकत / शेती जमीन खरेदी करतील. खरेदी नंतर कोणाची कसलेही हरकत आलेस आमचे अशीलाच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये या करिता खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. दि. ०६/१२/२०२४.

**सही/-**
**ॲड. कुलदिप संजय क्षीरसागर,**
**ऑफिस पत्ता :- ३९४५, भवानी पेठ, सोलापूर रोड,**
**रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर.**
**(अशिलातर्फे ॲडव्होकेट)**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### आता भारताचे लक्ष हॉकी विश्वचषकावर



**बंगळुरू :** कनिष्ठ गट आशिया चषक हॉकी स्पर्धेचे विजेतेपद कायम राखताना आम्हाला काही कठीण सामन्यांना तोंड द्यावे लागले व त्यात आम्ही यशस्वी झालो. आता पुढील वर्षी घरच्या मैदानावर होणाऱ्या विश्वचषकात चांगली कामगिरी करण्याचा आमचा निर्धार आहे, असे भारताचा कनिष्ठ हॉकी संघाचा खेळाडू अरिजीत सिंग म्हणाला. मस्कत, ओमान येथे झालेल्या शानदार मोहिमेनंतर भारतीय संघ बंगळुरूला परतला, त्याप्रसंगी तो माध्यमांशी बोलत होता. आशिया चषकाच्या रोमांचक अंतिम सामन्यात भारताने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा ५-३ असा पराभव केला. मुख्य प्रशिक्षक पी. आर. श्रीजेश यांच्या नेतृत्वाखाली सुलतान ऑफ जोहोर चषक स्पर्धेत भारताच्या कांस्यपदकानंतर हा विजय झाला. आम्हा सर्वांसाठी हा खरोखरच अभिमानाचा क्षण आहे आणि आम्ही चेन्नई येथे होणाऱ्या कनिष्ठ गट हॉकी विश्वचषकाची मोठ्या अपेक्षेने वाट पाहत आहोत, असे उपकर्णधार रोहित म्हणाला. प्रत्येक खेळाडूने या उल्लेखनीय विजयात योगदान दिले. आमचा सामूहिक प्रयत्न खरोखरच प्रेरणादायी ठरला आहे. विशेषत: जपान आणि पाकिस्तानविरुद्धच्या कठीण सामन्यांनी आमच्या कौशल्याची परीक्षा घेतली, असे तो म्हणाला.

### ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये सुमित नागलला थेट प्रवेश



**मुंबई :** भारताचा अव्वल पुरुष एकेरी टेनिसपटू सुमित नागल याने ऑस्ट्रेलिया ओपन २०२५ मध्ये थेट प्रवेश मिळवला आहे. ६ ते २६ जानेवारी दरम्यान मेलबर्न येथे खेळल्या जाणाऱ्या वर्षातील पहिल्या ग्रॅण्ड स्लॅममध्ये त्याने आपला दुसरा सहभाग नोंदवला आहे. जागतिक क्रमवारीत ९८ व्या क्रमांकावर असलेला नागल १२८ खेळाडूंच्या ड्रॉमध्ये थेट प्रवेश निश्चित करणाऱ्या शेवटच्या एकेरी खेळाडूंपैकी एक आहे. २०२४ मध्ये सर्व चार ग्रॅण्ड स्लॅम स्पर्धा खेळलेल्या नागलचा ग्रॅण्ड स्लॅमच्या मुख्य ड्रॉमध्ये थेट पाचवा आणि एकूण आठवा प्रवेश आहे. ग्रॅण्ड स्लॅम स्पर्धेतील त्याचा सर्वोत्तम निकाल ऑस्ट्रेलियन ओपन व अमेरिकन ओपनमध्ये दुसरी गाठणे आहे. हरयाणातील जैतपूर येथे जन्मलेला २७ वर्षीय सुमित नागल तिसऱ्यांदा ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये खेळणार आहे. मेलबर्नमध्ये शुक्रवारी प्रवेश यादी जाहीर करण्यात आली. सुमित २०१५ ज्युनियर विम्बल्डन विजेता असून तो ज्युनियर ग्रँड स्लॅम जिंकणारा सहावा भारतीय खेळाडू आहे.

### प्रो-कबड्डी लीगमध्ये मणिंदर सिंगचे १५०० गुण

**पुणे :** अकाराव्या प्रो-कबड्डी लीगच्या (पीकेएल) हंगामात मनिंदर सिंगने अलीकडेच १५०० गुणांचा उल्लेखनीय टप्पा गाठत अव्वल चढाईपटूंच्या यादीत आपले नाव कोरले आहे. पण मणिंदर सिंगने हे यश केवळ संख्येपेक्षा कितीतरी जास्त आहे व खेळाबद्दलच्या आपल्या अतुलनीय उत्कटतेचा दाखला आहे. मणिंदर आपल्या यशाचे श्रेय केवळ वैयक्तिक कौशल्यालाच नाही तर आपले कुटुंब, मित्र आणि सहकारी यांच्या अतुलनीय पाठिंब्याला देतो. या १५०० गुणांच्या मागे माझे प्रिय लोक आहेत. माझे मित्र आणि कुटुंब हे माझे सतत प्रेरणादायी आहेत, त्यांनी चांगल्या आणि आव्हानात्मक अशा दोन्ही काळात मला प्रोत्साहन दिले, असे त्याने बंगाल वॉरिओजला अव्वल स्थानावर असलेल्या हरयाणा स्टीलर्सवर ११ गुणांनी शानदार विजय मिळवून दिल्यानंतर सांगितले. हा टप्पा गाठणारा एकमेव दुसरा चढाईपटू म्हणजे विक्रमवीर प्रदीप नरवाल असून तो सध्या बंगळुरू बुल्सचा कर्णधार आहे.

### ऑस्ट्रेलियन ओपनसाठी निक किर्गिओस सज्ज

**ब्रिस्बेन :** निक किर्गिओस आपल्या शेवटच्या व्यावसायिक कामगिरीनंतर जवळजवळ दोन वर्षांनी संरक्षित मानांकनाद्वारे ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये बहुप्रतीक्षित पुनरागमन करण्यासाठी सज्ज झाला आहे. २०२२ पासून दुखापतींमुळे टेनिसपासून दूर राहिलेला २०२२ विम्बल्डन उपविजेता निक आता मेलबर्न पार्क येथे मुख्य ड्रॉमध्ये सहभागी होणार आहे. १० ऑस्ट्रेलियन पुरुष टेनिसपटूंच्या तुकडीत त्याचा समावेश करण्यात आला असून यात जागतिक क्रमवारीत नवव्या क्रमांकाचा ॲलेक्स डी मिनौरसुद्धा असणार आहे. ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये कोर्टवर जाण्यापूर्वी अबु धाबीच्या नवीन वर्ल्ड टेनिस लीग प्रदर्शन सामना व ब्रिस्बेन इंटरनॅशनल टेनिस स्पर्धेमध्ये सहभागी होण्याच्या योजनांसह २९ वर्षीय किर्गिओसने आधीच पुनरागमनाची तयारी सुरू केली आहे.

# भारताचा युवा संघ अंतिम फेरीत

## १९ वर्षांखालील आशिया चषक क्रिकेट ● वैभव सूर्यवंशी सामनावीर

◆ **शारजाह, ६ डिसेंबर**

येथे आयोजित १९ वर्षांखालील आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत शुक्रवारी खेळल्या गेलेल्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात भारताच्या युवा संघाने अष्टपैलू कामगिरी करत श्रीलंकेवर १७० चेंडू शिल्लक ठेवून ७ गड्यांनी दणदणीत विजय नोंदविला आणि स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. भारताने नवव्यांदा स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. भारताने आठ वेळा विजेतेपद व एकदा पाकिस्तानसोबत संयुक्त विजेतेपद पटकावले आहे. आता भारताला पुन्हा विजेतेपद जिंकण्यासाठी रविवारी बांगलादेशविरुद्ध अंतिम सामना खेळावा लागणार आहे.

सुरुवातीला श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, मात्र हा निर्णय त्यांच्या अंगलट आला. भारताच्या चेतन शर्मने प्रभावी मारा करत श्रीलंकेच्या फलंदाजीतील हवाच काढून घेतली. श्रीलंकेने चार षटकांतील अवघ्या ८ धावांत आपले तीन महत्त्वपूर्ण फलंदाज गमावले. चेतन शर्मने



वैभव सूर्यवंशी व आयुष म्हात्रेची ९१ धावांची सलामी भागीदारी

सलामीवीर दुलिंथ सिगेराचा (२) त्रिफळा उडवला, तर विमथ दिनसाराला (०) पायचित केले. पुलिनीत परेरा (६) धावबाद झाला. त्यानंतर मात्र शारुजन शन्मुगनाथन व लकवीन अबेयसिंघेने चौथ्या गड्यासाठी ९३ धावांची भागीदारी करत संघाचा डाव सावरला. शन्मुगनाथनने ७८ चेंडूंचा सामना करत २ चौकारांसह ४२ धावा केल्या. पुढे लकवीनने कविजा गमगे (१०), कर्णधार विहास थेवमिका (१४), विरान चामुदिथा (८) व प्रवीण मनीषाच्या (८) सहकार्याने संघाला संघाला सुस्थितीत आणले. चोरमलेने लकवीनला पायचित करून त्याची घोडदौड थांबविली, तोपर्यंत श्रीलंकेने ४३.२ षटकांत ८ बाद १६७ धावांचा टप्पा गाठला होता. लकवीन अबेयसिंघेने ११० चेंडूत ३ चौकार व २ षट्कारच्या मदतीने ६९ धावांची खेळी केली. तळाच्या फळीतील फलंदाज लवकरच बाद झाल्यामुळे श्रीलंकेचा डाव ४६.२ षटकांत १७३ धावांत आटोपला.

भारताकडून चेतन शर्मने ३ बळी, किरण चोरमले व आयुष म्हात्रेने प्रत्येकी २ बळी, तर युधजीत गुहा व हार्दिक राजने प्रत्येकी १ बळी टिपला.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना भारताच्या आयुष म्हात्रे व वैभव सूर्यवंशीने ९१ धावांची सलामी भागीदारी केली. आयुष म्हात्रेने २८ चेंडूंत ७ चौकारांसह ३४ धावांची खेळी केली. पुढे वैभव सूर्यवंशीने सी. आंद्रे सिद्धार्थच्या (२२) साथीने वैयक्तिक अर्धशतक साजरे केले व संघाच्या विजयाचाा मार्ग प्रशस्त केला. १३ वर्षीय वैभव सूर्यवंशीने अवघ्या ३६ चेंडूंत ६७ धावांची देखणी खेळी केली, यात त्याने ६ चौकार व ५ षट्कार खेचलेत. कर्णधार मोहम्मद अमन व केपी कार्तिकेयने नाबाद खेळी करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. भारताने २१.४ षटकांत ३ बाद १७५ धावा केल्या. अमनने २६ चेंडूंत २ चौकार व एका षट्कारसह नाबाद २५ धावांची, तर कार्तिकेयने नाबाद ११ धावांची विजयी खेळी केली. (वृत्तसंस्था)

### पाकिस्तानचा धुव्वा, बांगलादेश अंतिम फेरीत

गत विजेत्या बांगलादेशने पाकिस्तानचा ७ गड्यांनी पराभव करून आशिया चषक १९ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. पाकिस्तान संघाला ३७ षटकांत ११६ धावांत गुंडाळल्यानंतर बांगलादेशने २२.१ षटकांत ३ बाद १२० धावा काढून सामना जिंकला व अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. पाकिस्तानला झटपट गुंडाळताना बांगलादेशच्या इक्बाल हुसेन इमोनने ४ गडी बाद केले,तर बांगलादेशचा विजय निश्चित करताना तिसऱ्या क्रमांकावरील फलंदाज व कर्णधार अझिझुल हकीमने ४२ चेंडूंत ७ चौकार व ३ षट्कारांसह नाबाद ६१ धावांची विजयी खेळी केली.

# जसप्रीत बुमराहचा पराक्रम



उस्मान ख्वाजाला बाद केल्याचा आनंद साजरा करताना जसप्रीत बुमराह

◆ **ॲडिलेड, ६ डिसेंबर**

भारत-ऑस्ट्रेलिया गुलाबी चेंडूच्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी भारताचा पहिला डाव १८० धावांवर आटोपल्यानंतर ऑस्ट्रेलियाने दिवस अखेर १ बाद ८६ धावा केल्या. भारताकडून जसप्रीत बुमराहने एक गडी बाद केला. बुमराहने ऑस्ट्रेलियाचा सलामीवीर उस्मान ख्वाजाला बाद करत एक मोठी कामगिरी आपल्या नावे केली आहे.

बुमराह २०२४ मध्ये ही कामगिरी करणारा पहिला गोलंदाज

जसप्रीत बुमराहने २०२४ सालामध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

याने आपल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर अनेक सामने फिरवून भारताला विजय मिळवून दिला. पण यादरम्यानच बुमराहने कसोटी क्रिकेटमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत या वर्षात आपले ५० कसोटी बळी पूर्ण केले आहेत. कसोटी क्रिकेटमध्ये २०२४ मध्ये ५० बळी पूर्ण करणारा तो पहिला गोलंदाज आहे. बुमराहने ॲडिलेडमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत उस्मान ख्वाजाला बाद करत ५० कसोटी बळींचा टप्पा गाठला आहे. (वृत्तसंस्था)



# शहा-कोठारी प्रशालेत क्रीडा सप्ताह सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

सन्मती ज्ञान प्रसारक मंडळ संचलित श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी हायस्कूल मध्ये क्रीडा सप्ताहास सुरुवात झाली. याचे उद्घाटन ॲथलेटिक्सचे राज्य क्रीडा मार्गदर्शक गणेश पवार व शारीरिक शिक्षण शिक्षक संघटनेचे जिल्हा अध्यक्ष दशरथ गुरव यांच्या हस्ते झाले. त्यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून मशाल प्रज्वलित केली. विद्यार्थ्यांनी मशाल हाती घेऊन प्रभात फेरी काढली. प्रमुख पाहुणे श्री. पवार यांनी क्रीडा क्षेत्राचे महत्त्व व श्री. गुरव यांनी खेळाचे महत्व आपल्या मनोगतात सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष रमेश यादवाड यांनी खेळात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या खेळाडूंची माहिती सांगितली. या क्रीडा स्पर्धा सात दिवस चालणार आहेत. यामध्ये संगीत खुर्ची, रनिंग, दोरी उडी, कबड्डी, क्रिकेट, लिंबू चमचा, तीन पायी शर्यत व स्लो सायकल याविषयी माहिती बी एस पाटील यांनी सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ए. एस. माने यांनी करून उपस्थितांचे आभार मानले.

# भारत सर्वबाद १८०, स्टार्कचे ६ बळी

## ऑस्ट्रेलिया १ बाद ८६

◆ **ॲडिलेड, ६ डिसेंबर**

येथे शुक्रवारपासून ॲडिलेड ओव्हलवर प्रांभ झालेल्या गुलाबी चेंडूच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या पहिल्या दिवशी मिचेल स्टार्कच्या प्रभावी गोलंदाजीमुळे भारताचा पहिला डाव ४४.१ षटकांत १८० धावांतच आटोपला. प्रत्युत्तर देताना ऑस्ट्रेलियाने ३३ षटकांत १ बाद ८६ धावा काढल्या. जसप्रीत बुमराहने प्रकाशझोतात सलामीवीर उस्मान ख्वाजाच्या रुपाने पहिला बळी मिळविला. खेळ थांबला तेव्हा दबावाखाली असलेला मार्नस लॅबुशेन (नाबाद २०) व सलामीवीर नॅथन मॅकस्विनी (नाबाद ३८) खेळपट्टीवर होते. या दोघांनी दिवसअखेरपर्यंत ६२ धावांची अभेद्य भागीदारी केली व ऑस्ट्रेलियाला त्यांची तूट १०० पेक्षा कमी करण्यात मदत केली. एकंदरीत ॲडलेड कसोटी सामन्यातील पहिला दिवस ऑस्ट्रेलियानेच गाजवला.

भारतीय सघाचा कर्णधार रोहित शर्माने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु त्यांना अपेक्षेनुसार फलंदाजी करता आली नाही.



ऑस्ट्रेलियाविरुद्ध षट्कार हाणताना नितीश कुमार रेड्डी

पहिला कसोटी सामना गाजवणारा सलामीवीर यशस्वी जयस्वाल (०) मिचेल स्टार्कच्या गोलंदाजीत अगदी सामन्याच्या पहिल्याच चेंडूवर पायचित झाला. केएल राहुल (३७) व शुभमन गिलने (३१) तेवढी दुसऱ्या गड्यासाठी ६९ धावांची भागीदारी करत संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. स्टार्कने राहुलला मॅकस्विनीकडून झेलबाद केले, तर शुभमनला बोलॅण्डने पायचित केले. विराट कोहलीकडून (७) मोठ्या खेळीची अपेक्षा होती, परंतु तोसुद्धा मिचेल स्टार्कच्या वेगवान गोलंदाजीला लवकरच बळी पडला. बोलॅण्डने रोहित शर्माला (३) पायचित केले. ऋषभ पंतने २१ धावांची खेळी केली असताना पॅट कमिन्सने त्याला लॅबुशेनकडे झेल सोपवण्यास भाग पाडले. त्यामुळे भारताची ३२.५ षटकांत ६ बाद १०९ धावा अशी स्थिती झाली होती. पुढे नितीश कुमार रेड्डी (४२) व रविचंद्रन अश्विनने (२२) ऑस्ट्रेलियन गोलंदाजांचा धैर्याने सामना करत संघाला १८० धावांचा टप्पा गाठून देण्यात मदत केली.



सहावा बळी टिपल्यानंतर चेंडू दाखवताना मिचेल स्टार्क

ऑस्ट्रेलियाकडून मिचेल स्टार्कने ६ बळी, पॅट कमिन्स व स्कॉट बोलण्डने प्रत्येकी २ बळी टिपलेत. पर्थमध्ये केलेल्या २९५ धावांच्या पराभवाला प्रत्युत्तर देताना ऑस्ट्रेलियाने भारताचा डाव १८० धावांत संपुष्टात आणला. मिचेल स्टार्कने कारकिर्दीतील सर्वोत्कृष्ट ४८ धावांत ६ बळी टिपण्याची किमया केली व त्याने ऑस्ट्रेलियातील आपल्या गुलाबी चेंडूनिशी बळींची संख्या ७२ पर्यंत वाढवली. त्याची बळी संख्या पॅट कमिन्स (३६) पेक्षा दुप्पट झाली. स्टार्कचा सर्वात जवळचा स्पर्धक नॅथन लियोनपेक्षा २९ अधिक आहे. (वृत्तसंस्था)

# जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी ३० डिसेंबरपर्यंत अर्ज करा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

सोलापूर जिल्ह्यातील उत्कृष्ट खेळाडू व गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदानाचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा व प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने जिल्हयातील खेळाडू व क्रीडा मार्गदर्शक यांचेकरिता शासनातर्फे जिल्हा क्रीडा पुरस्कार दिला जातो. ३० डिसेंबर २०२४ पर्यत विहित नमुन्यातील परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा क्रीडा संकुल कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

एक गुणवंत क्रीडा मार्गदर्शक आणि प्रत्येकी एक गुणवंत महिला, पुरुष आणि दिव्यांग खेळाडू यांना हा पुरस्कार दिला जाणार आहे. या पुरस्कारासाठी १ जुलै ते ३० जून या कालावधीसाठी मागील खेळाडूंसाठी पाच वर्षाची कामगिरी विचारात घेतली जाईल. तसेच क्रीडा मार्गदर्शकासाठी दहा वर्षाची कामगिरी विचारात घेतली जाईल. जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या अर्जदाराचे त्या जिल्हयात किमान १५ वर्ष वास्तव्य असले पाहिजे. क्रीडा मार्गदर्शक म्हणून सतत दहा वर्ष महाराष्ट्रात क्रीडा मार्गदर्शकाचे कार्य कलेले असले पाहिजे व त्याने वयाची ३५ वर्ष पूर्ण केलेली असणे आवश्यक आहे. खेळाडूंने पुरस्कार वर्षासह लगतपूर्व पाच वर्षापैकी दोन वर्षे त्या जिल्हयाचे मान्यताप्राप्त खेळाच्या अधिकृत स्पर्धेमध्ये प्रतिनिधीत्व केले असले पाहिजे. क्रीडा मार्गदर्शकासाठी गेल्या १० वर्षात किमान वरिष्ठ गटातील राज्य व राष्ट्रीय पदक विजेते तसेच कनिष्ठ शालेय, ग्रामीण व महिला (खेलो इंडिया) मधील राष्ट्रीयस्तरा पर्यंत पदक विजेते खेळाडू तयार केले असतील असे क्रीडा मार्गदर्शक अर्ज करण्यास पात्र राहतील, सांघिक अथवा वैयक्तिक मान्यताप्राप्त क्रीडा प्रकारात नॅशनल गेम्स, वरिष्ठ राष्ट्रीय अंजिक्यपद स्पर्धेत प्रतिनिधीत्व केलेला खेळाडू अथवा राज्य/जिल्हा अजिक्यपद स्पर्धेत प्रथम तीन क्रमांकापर्यत यश मिळविणारे किमान तीन खेळाडू घडविणारा मार्गदर्शक विहीत नमुन्यातील अर्ज संघटनेमार्फत अथवा वैयक्तिक रित्या मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.

### बार्शीचा राजवर्धन तिवारी राज्य टेबल टेनिस स्पर्धेत अजिंक्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**



बार्शीच्या राजवर्धन तिवारी याने पुणे बालेवाडी येथे सुरू असलेल्या राज्य टेबल टेनिस स्पर्धेत अकरा वर्षे वयोगटात अजिंक्यपद पटकाविले. त्याने पुण्याच्या खेळाडूला ३-२ असे हरविले. त्यास श्री गणेश स्वामी याचे मार्गदर्शन लाभले. त्याचे जिल्हा टेबल टेनिस संघटनेचे अध्यक्ष डॉ. राजीव प्रधान व डॉ. नितीन तोष्णीवाल, झेड. एम. पुणेकर, डॉ. नीलकंठ पोतदार, मनीष रावत आदींनी अभिनंदन केले आहे.



# आरोग्यासाठी एक पाऊल खेळाकडे : आरबाळे

## अक्कलकोट बीटस्तरीय क्रीडा स्पर्धेस सुरवात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ६ डिसेंबर-**

खेळात हार जीत गौण आहे. उत्तम आरोग्यासाठी मैदानी खेळाची गरज आहे ज्याप्रमाणे मानसिक भावनिक विकासाबरोबर शारीरिक विकासाची गरज आहे. आधुनिक काळात उत्तम आरोग्यासाठी एक पाऊल खेळाकडे गरज आहे, असे प्रतिपादन गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांनी व्यक्त केले.

गौडगाव पंचाचार्य प्रशालेत अक्कलकोट बीटस्तरीय स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी केंद्रप्रमुख सुरेश शटगार, भीमाशंकर धडके, मुख्याध्यापक कल्याणी देशट्टी, क्रीडाशिक्षक परमेश्वर व्हसुरे आदी मान्यवर उपस्थित होते. या बीटस्तरीय स्पर्धेत कडबगाव, नागणसूर तोळनुर, दुधनी व उडगी अशा पाच केंद्रातील खेळाडू शिक्षक उपस्थित होते. या स्पर्धेला पंच म्हणून नागराज कलबुर्गी, एकनाथ मोसलगी, अनिल इंगळे, रमेश सोनकर, नीलकंठ शिंगे, तानाजी चव्हाण, जितेंद्र जाजु, समीर शेख पवार आदींनी काम पाहिले.

# महिलांची जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धा उद्यापासून

## ओॲसिस सोलापूर ओपन टेनिस स्पर्धा

## सोलापुरातील नववी स्पर्धा : १४ देशातून १९ आंतरराष्ट्रीय खेळाडूंसह ५६ महिलांचा समावेश

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

महाराष्ट्र व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ओॲसिस, प्रिसीजन, इलिझियम-जामश्री व बालाजी अमाईन्स पुरस्कृत महिलांच्या जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धा ८ ते १५ डिसेंबर या कालावधीत कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलातील एम.एस.एल.टी.ए. टेनिस सेंटर येथे होईल. २५ हजार अमेरिकन डॉलरचे बक्षीस असलेल्या या स्पर्धेतील खेळाडूंना जागतिक मानांकन गुण देखील प्राप्त होणार आहेत. अशा प्रकारची अंतरराष्ट्रीय स्पर्धा सोलापूरात नवव्यांदा होत आहे. ही बाब सोलापूरसाठी अत्यंत अभिमानाची व प्रतिष्ठेची आहे. या स्पर्धेसाठी भारतासह १४ देशातुन एकूण ५६ महिला सहभागी होणार असुन यामध्ये १९ परदेशी आहेत.



सोलापूर व लगतच्या जिल्हयामध्ये लॉन टेनिस खेळाचा प्रसार व प्रचार व्हावा व सोलापूरचे नांव जागतिक पातळीवर व्हावे या उद्देशाने या स्पर्धा आयोजित केल्याचे जिल्हा संघटनेचे अध्यक्ष राजेश दमाणी यांनी सांगितले. या स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय टेनीस फेडरेशनने पुण्याच्या नितिन कन्नमवर यांची सामना पर्यवेक्षक तर राज्य संघटनेचे संयुक्त सचिव राजीव देसाई यांची सामना संचालक म्हणून नियुक्ती केलेली आहे.

या स्पर्धेसाठी पंच म्हणून अखिल भारतीय लॉन टेनिस संघटनेने श्रीराम गोखले, अमित देशपांडे, अमोल पुजारी, यश संत (पुणे), सुरजित बंडोपाध्याय (कलकत्ता), पोनुसामी (चेन्नई), (पुणे), यांची नियुक्ती केलेली आहे. या स्पर्धेसाठी फिजीओथेरपीस्ट निकिता चव्हाण (पुणे), श्वेतांबरी चव्हाण (सोलापूर), इव्हेंट मॅनेजर संध्याराणी बंडगर, दळणवळण समन्वयक मोनिका आळंद, भोजन व्यवस्था सुनंदा पवार व संतोष पवार पाहणार आहेत. तर व्हेन्यु इंनचार्ज म्हणून सुधीर सालगुडे व पुजा सालगुडे काम पाहणार आहेत. स्पर्धेचे उदघाटन सोमवारी ९ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक भाग्यश्री जाधव-खेतमाळीस यांच्या हस्ते होणार आहे. या स्पर्धेत उत्कृष्ट बॉल पिकरची सेवा बजावणा-या मुला-मुलींना भेटवस्तु देऊन गौरवण्यात येईल.

या स्पर्धेच्या आयोजनासाठी आली पंजवानी, मेहुल पटेल, ब्रिजेश गांधी, केशव रेडडी, सुहास अदमाने, श्रीधर देवसानी, असिम सिंदगी, राजेश पवार, अभिजित टाकळीकर, सुनिल मदन, डॉ. वैभव मेरु, डॉ साजिद सय्यद, उज्वल कोठारी, डॉ सुरेश कुमार, परेश शहा, संतोष फाटक यांचे सहकार्य लाभले.

### मुख्य फेरीचे सामने १० डिसेंबरपासून

स्पर्धेचे पात्रता फेरीचे सामने ८ व ९ डिसेंबर रोजी तर मुख्य फेरीचे सामने दि. १० डिसेंबर पासुन सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत खेळविले जातील.

# मातोश्री वृद्धाश्रमाचे अनुदान बंद

## एक नाही, दोन नाही तब्बल २३ वर्षांपासून आधार तुटला

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.६ डिसेंबर-**

येथील मातोश्री वृध्दाश्रमास एक नाही, दोन नाही तर तब्बल तेवीस वर्षांपासून शासनाकडून अनुदान मिळालेले नाही. विशेष म्हणजे राज्यात पहिल्यांदाच सत्तेवर आलेल्या युती शासनाच्या काळात हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या पुढाकाराने हा वृद्धाश्रम सुरु करण्यात आला होता. सर्वांत खेदाची बाब म्हणजे (स्व.) बाळासाहेबांचे रक्ताचे वारस असलेले उद्धव ठाकरे यांनी देखील सुमारे अडीच वर्षे राज्याचे मुख्यमंत्रिपद उपभोगले. मात्र त्यांना सुध्दा हे अनुदान देणे जमले नाही. त्या नंतर (स्व.) बाळासाहेबांच्या विचारांचे आम्हीच खरे वारसदार आहोत असे सांगणाऱ्या अनाथांचे नाथ म्हणविणारे माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे देखील या प्रश्नाकडे दुर्लक्षच झाले. त्यामुळे निदान भाजपाचे देवेंद्र फडणवीस यांनी तरी शिवसेना प्रमुखांच्या पुढाकाराने सुरु झालेल्या या वृद्धाश्रमाच्या रखडलेल्या अनुदानाचा प्रश्न निकाली काढावा अशी मागणी या वृद्धाश्रम ात वास्तव्यास असलेल्या मातापित्यांसमान वृद्धांकडून केली जात आहे.



शासनाचे अनुदान २००१ पासून बंद झाले आहे. तरी देखील आम्ही सेवाभावनेने आणि समाजातील दानशूर लोकांच्या सहकार्याने सेवेचे हे काम सुरु ठेवले आहे. शासनाकडे अनेक वर्षे झाली अनुदानासाठी आमचा पाठपुरावा सुरु आहे.
**- धनंजय राक्षे, व्यवस्थापक, मातोश्री वृद्धाश्रम, पंढरपूर**

राज्यातील निराधार वृद्धांना आधार मिळावा म्हणून भाजपा शिवसेना युती शासनाच्या काळात हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या पुढाकाराने त्यांच्या पत्नी (स्व.) मीनाताई ठाकरे यांची आठवण म्हणून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एक या प्रमाणे मातोश्री वृद्धाश्रम सुरु करण्याची घोषणा करण्यात आली. १९९६ मध्ये येथील हभप बद्रीनाथ महाराज तनपुरे यांनी राज्यातील पहिला मातोश्री वृद्धाश्रम येथील गोपाळपूर येथे सुरु केला. शिवसेना प्रमुखांच्या पुढाकाराने सुरु करण्यात आलेल्या या पहिल्या वृद्धाश्रमाचे उद्घाटन तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या हस्ते मोठ्या दिमाखात करण्यात आले. यामुळे निराधारांना आधार मिळाल्यामुळे समाधान व्यक्त होत होते. शासनाच्या योजनेचे नागरिकांकडून कौतुक करण्यात आले.

### विद्यमान मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालावे

रक्ताचा वारस सांगणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री असताना अनुदानाचा प्रश्न मार्गी लावला नाही. उरली सुरली आशा होती ती विचारांचा वारसा सांगणाऱ्यांकडून मात्र एकनाथ शिंदे यांना देखील आपल्या अडीच वर्षाच्या कार्यकालात हे अनुदान देणे जमले नाही. त्यामुळे आता भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी आणि मित्र पक्षाचे सरकार सत्तेवर आलेले आहे. भाजपाचे देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री झालेले आहेत. त्यामुळे त्यांनी तरी या प्रकरणी लक्ष घालून हा अनुदानाचा प्रश्न निकाली काढण्याची मागणी जोर धरीत आहे.

वृद्धाश्रम चालविणाऱ्या संस्थेला युती शासनाच्या काळात ६० टक्के एवढे अनुदान दिले जात होते. त्या वेळी राज्यातील अनेक जिल्ह्यात सुरु झालेल्या अशा प्रकारच्या वृद्धाश्रमातून वृद्धमंडळी मोठ्या संख्येने वास्तव्यास होती. मात्र राज्यात सत्तांतर झाले. काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार सत्तेत आले. या सरकारने २००१ पासून हे अनुदान बंद केले. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शासनाने अनुदान बंद केल्यामुळे राज्यभरातून सुरु झालेल्या अनेक वृद्धाश्रमांना आर्थिक अडचण भासू लागली. आर्थिक गर्तेत सापडल्याने अनेक वृद्धाश्रम बंद झाली. मात्र येथील मातोश्री वृद्धाश्रम अजून देखील तग धरुन आहे. मातोश्री वृद्धाश्रमाचे सर्वे सर्वा ह.भ.प. बद्रीनाथ महाराज तनपुरे यांनी समाजातील दानशूर व्यक्तींचे सहकार्य घेऊन सुरु ठेवले आहे. येथील मातोश्री वृद्धाश्रमात तब्बल ६४ स्त्री,पुरुष वृद्धमंडळी वास्तव्यास आहेत. या मध्ये सोलापूर जिल्ह्यातील २२ आणि राज्याच्या इतर भागातील ४२ वृद्धमंडळींचा समावेश आहे. येथील मातोश्री वृद्धाश्रमात महिला व पुरुषांना राहण्यासाठी स्वतंत्र खोल्यांची सोय आहे. जनरल वार्ड देखील कार्यरत आहे. स्वतंत्र भोजन कक्ष, ग्रंथालये, नामस्मरणासाठी ध्यान कक्ष, दवाखान्याची सुविधा, फिरण्यासाठी मोठी जागा आदी सुविधा येथे उपलब्ध आहेत.

## संक्षिप्त वृत्त



### चांदापुरी विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेच्या चेअरमनपदी कोपनर

**पिलीव, दि. ६ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेच्या चेअरमनपदी सर्जेराव कोपनर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. नरवीर पठाण यांनी राजीनामा दिल्यानंतर रिक्त असणाऱ्या जागेवर नूतन चेअरमन निवडीसाठी सर्व संचालक मंडळाची निवडणूक निर्णय अधिकारी बी. एस. बंडगर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक बोलाविण्यात आली होती. यावेळी सर्वानुमते सर्जेराव कोपनर यांची चेअरमनपदासाठी बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी संचालक सुमन पाटील, बापू लोखंडे, विजय काळे, भीमराव ढेरे, वसंत काळे, बाळासाहेब मदने, इस्लाम पठाण उपस्थित होते. बिनविरोध निवडीसाठी विलास धुलुगडे, तानाजी कोपनर, विजय निकम, अप्पा पाटील, मुन्ना पठाण, विजय निकम, निवृत्ती सूळ, नितीन सरक, शिवाजी पाटील, विजय पाटील, यश पाटील, पुकळे यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी निवडणूककामी सहाय्यक म्हणून सचिव नाईकनवरे, लेखनिक हनुमंत लोखंडे, अजिनाथ कवळे यांनी काम पाहिले. निवडीनंतर नूतन चेअरमन सर्जेराव कोपनर व सर्व संचालकांचा मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. यावेळी फटाक्यांची आतिषबाजी व गुलालाची उधळण करण्यात आली.



### जेऊरमधील इरा पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा महोत्सव साजरा

**करमाळा, दि. ६ डिसेंबर-**

करमाळा तालुक्यातील जेऊरच्या इरा पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा सप्ताहाची सुरुवात करण्यात आली. यावेळी जेऊर गावचे अनेक खेळात पारंगत असणारे ग्रामसेवक यशवंत कुदळे व पोपट माने तसेच संस्थेच्या सचिव सुनिल अवसरे, देवकाते यांच्या हस्ते खेळाच्या मैदानाचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी सर्व मुख्याध्यापक, शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या क्रीडा स्पर्धांसाठी प्रमुख पाहुण्यांनी शुभेच्छा दिल्या आणि नंतर खेळ घेण्यास सुरुवात झाली.

### मारोळी परिसरातून एका महिलेसह दोन लहान मुले बेपत्ता

**मंगळवेढा, दि. ६ डिसेंबर-**

मारोळी परिसरातून एक २३ वर्षीय विवाहित महिला आपल्या दोन लहान मुलांसह सासरी जाते असे सांगून घरातून निघून गेली. ती अद्यापही घरी न आल्याने बेपत्ता झाल्याची तक्रार तिच्या आईने मंगळवेढा पोलिसात केली असून पोलिस त्या महिलेसह मुलांचा कसून शोध घेत आहेत. २० नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वा. खबर देणाऱ्याची मुलगी ही २३ वर्षीय विवाहिता असून तिच्यासोबत पाच वर्षांचा मुलगा व चार वर्षांची मुलगी अशी दोन मुले आहेत. सासरी जाते असे सांगून तिच्या दोन्ही मुलांना घेऊन घरातून निघून गेली. ती अद्यापपर्यंत घरी परत आली नसल्याने तिच्या कुटुंबियांनी सर्वत्र शोध घेतला. मात्र मिळून आली नाही. सदर स्त्री कोणाच्या निदर्शनास आल्यास त्यांनी तपासिक अंमलदार पोलिस हवालदार प्रमोद मोरे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### गुजरात अभ्यास दौऱ्यासाठी अकलूजमध्ये उद्या परीक्षा

**अकलूज, दि. ६ डिसेंबर-**

**खासदार नवउद्योजक विकास कार्यक्रमांतर्गत खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांचा उपक्रम**

माढा मतदारसंघाचे खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी माढा लोकसभा मतदारसंघ व सोलापूर जिल्ह्यातील उद्योजक आणि नवोदित उद्योजकांसाठी गुजरात गांधीनगर येथे शिवरत्न शिक्षण संस्था आणि शिवामृत दूध संघाच्या सहकार्याने एक विशेष अभ्यास दौऱ्याचे आयोजन केले आहे. अभ्यास दौऱ्यात सहभागी होण्यासाठी इच्छुक उद्योजक व्यावसायिकांच्या करीता ८ डिसेंबर रोजी शिवरत्न नॉलेज सिटी अकलूज येथे सकाळी ९.३० वाजता परीक्षेसाठी उपस्थित राहणे आवश्यक आहे. लेखी आणि तोंडी मुलाखतीद्वारे उमेदवारांची निवड करण्यात येईल. निवड झालेल्या उद्योजकांना विविध उद्योगांची पाहणी करण्याची आणि तज्ज्ञांकडून मार्गदर्शन घेण्याची संधी मिळेल. या उपक्रमाचा उद्देश नवीन उद्योजक निर्माण करणे आणि सध्याचे उद्योजक अधिक सक्षम करणे हा आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांबाबत माहिती देणे, बँकांकडून कर्ज मिळवून देण्यात मदत करणे आणि विविध उद्योग संस्थांशी करार करण्याची संधी उपलब्ध करून देणे हा मुख्य उद्देश आहे. गुजरात अभ्यास दौऱ्यात सहभागी होण्यासाठी https://forms.gle/7uHg9cC8oBYEPP6X7 लिंकवर जाऊन नोंदणी करायची आहे.

### विजयपूर जिल्ह्यात अपघात; पाचजण जागीच ठार

**विजयपूर, दि. ६ डिसेंबर-**

विजयपूर जिल्ह्यातील तालिकोट तालुक्यातील बिळेभावी क्रॉसजवळ कार आणि तोगरी कापणी यंत्र वाहन यांच्यात भीषण अपघात झाला आणि कारमधील पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. कार (क्र. के. एम.३७५४) आणि (पी. बी. ८४/३०५३) यांच्यात झालेल्या अपघातात कारमधील निंगाप्पा पाटील (वय ५५), शांतव्वा शंकर पाटील (वय ४५, रा. अलीबाद, ता. विजयपूर), भीमाशी संकनाळ (वय ६५), शशिकला जैनापुर (वय ५०), दिलीप पाटील (वय ४५) यांचा मृत्यू झाला. यादगिरी जिल्ह्यातील अग्नी गावातून सर्वजण कन्या पाहण्यासाठी परतत असताना ही दुर्घटना घडली. कार क्रुझरला ओव्हरटेक करत असताना तालिकोटहून हुनसगीकडे जाणाऱ्या मळणी यंत्राच्या वाहनाची समोरासमोर धडक होऊन ही दुर्घटना घडली.

### इर्ले येथे बेवारस मृतदेहावर अंत्यसंस्कार

**तभा वृत्तसेवा**
**वैराग दि ६ डिसेंबर**

बार्शी तालुक्यातील इर्ले-मानेगाव हद्दीत एका ६५ वर्षीय वयोवृद्ध महिलेचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह इर्ले (ता. बार्शी) येथील मुकंद पाटील यांच्या हरभऱ्याच्या शेतामध्ये शुक्रवार दि ६ डिसेबर रोजी सायंकाळी पाचच्या दरम्यान निदर्शनास आला. अंदाजे चार ते पाच दिवसापासून मृतदेह कुजलेल्या अवस्थेत असावा असा अंदाज ग्रामस्थांनी व्यक्त केला. मुंकुद पाटील यांच्याच शेतामध्येच पोलीसांनी ग्रामस्थांच्या मदतीने अंत्यसंस्कार केले.

दरम्यान मयत महिलेची ओळख पटलेली नसून ग्रामस्थांनी मागील आठवड्यात विस्मयक अवस्थेत एक वयोवृद्ध महिला फिरत असल्याचे पाहिले होते. शुक्रवारी मुंकुद पाटील यांच्या गट क्रमांक ५५ मधील हरभऱ्याच्या शेतात सडलेल्या अवस्थेत एक मृतदेह असल्याची माहिती इर्ले येथील पोलीस पाटलांनी वैराग पोलिसांकडे दिली होती. सदरच्या मयत महिलेची ओळख पटलेली नसून साधारण ६० ते ६५ वयोमर्यादा असलेली ही महिला जटाधारी असल्याचे पोलिसांनी सांगितले असून याबाबत कोणाला माहिती उपलब्ध झाल्यास पोलीस कॉन्स्टेबल सचिन मुंडे यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन वैराग पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे. यावेळी अंत्यविधी क्षणी पोलीस निरीक्षक निवृत्ती मोरे, किरण पाटील, सतीश पाटील, शेतकरी मुकुंद पाटील, सुधीर देवकते यांनी मदत केली.




### सर्वाधिक प्रवेशासाठी पंढरपूरच्या आयआयटीचा एमकेसीएलकडून गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.६ डिसेंबर -**

सन २०२४ मध्ये पंढरपूर येथील आयआयटी कॉम्प्युटर सेंटरला एमएससीआयटी संगणक कोर्ससाठी महाराष्ट्रात सर्वाधिक प्रवेश दिल्याबद्दल महाराष्ट्र ज्ञान महामंडळ म्हणजेच एमकेसीएलकडून राज्यस्तरीय नंबर १ चा दिला जाणारा सर्वोत्कृष्ठ प्रशिक्षण संस्था पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

महाराष्ट्र ज्ञान महामंडळाची विभागीय बैठक सोलापूर येथील निर्मलकुमार फडकुले सभागृहात ३ डिसेंबर रोजी पार पडली. हा पुरस्कार एमकेसीएलच्या मॅनेजिंग डायरेक्टर वीणा कामथ यांच्या हस्ते देण्यात आला. हा पुरस्कार आयआयटी कॉम्प्युटर सेंटरचे संचालक नितीन आसबे व दत्ता कळकुंबे यांनी स्वीकारला. पंढरपूर येथील आयआयटी संगणक प्रशिक्षण संस्था मागील २४ वर्षांपासून पंढरपूर येथे विद्यार्थ्यांना संगणकाचे धडे देत आहे. यापूर्वीही या संस्थेला अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. यावर्षी एमएस-सीआयटी रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण करीत विद्यार्थी हिताचे प्रसिक्षण दिले. शासनाकडून आलेले सारथी, अमृतकलश, यासारखे वेगवेगळे प्रशिक्षण सर्वसामान्य गोरगरीब होतकरू विद्यार्थ्यांना देवून नोकरीला लावले व विद्यार्थांचा विश्वास संपादन केल्या बद्दल सन्मान करण्यात आला.

या यशामागे रोहिणी मांजरे, वैष्णवी पाटील व आयआयटी संगणक प्रशिक्षण संस्थेतील इतर शिक्षकांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. पुरस्कार प्रदान करतेवेळी एमकेसीएलचे विभागीय सरव्यवस्थापक अतुल पतोडी, अमित रानडे, डॉ.दीपक पाटेकर, श्री.कौशल, श्री.कुंभार, श्री.कटकधोंड, विभागीय समन्वयक महेश पत्रीके, लोकल लीड सेंटरचे रोहित जेऊरकर, हारून शेख, मलिक शेख, शिवानंद पाटील व सोलापूर जिल्ह्यातील सर्व संगणक संस्था चालक उपस्थित होते.

### चोखामेळानगर ग्रामपंचायतीच्या सरपंचांना जीवे मारण्याची धमकी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ६ डिसेंबर-**

चोखामेळा नगर ग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच शिवाजी तुकाराम सरगर यांना अज्ञात व्यक्तीने फोनवरून गुरुवारी दुपारी १२.०० वा. जीवे मारण्याची धमकी दिल्याने एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरूध्द अदखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे.दरम्यान आलेल्या नंबरवरून महिला पोलिस हवालदार त्या अज्ञाताचा कसून शोध घेत आहेत.

पोलिस सुत्रांकडून मिळालेली माहिती अशी, यातील फिर्यादी शिवाजी तुकाराम सरगर (वय ४५) हे चोखामेळा नगर ग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच असून दि.५ रोजी दुपारी १२.०० च्या दरम्यान फिर्यादी यांचा मोबाईल क्रमांक ९३७१८९४९७३ या फोनवरून अज्ञात व्यक्तीने काहीएक कारण नसताना जीवे मारण्याची धमकी दिली असल्याचे दिलेल्या तक्रारीत म्हटले असून याचा अधिक कसून तपास महिला पोलिस हवालदार सुनिता चवरे या करीत आहेत.दरम्यान,या धमकीमुळे राजकिय क्षेत्रात खळबळ उडाली असून ही धमकी नेमकी कोणत्या कारणासाठी दिली याचा कसून तपास महिला पोलिस हवालदार करीत आहेत. सदरच्या धमकी आलेल्या नंबरचा छडा लावण्याचा प्रयत्न सुरु असल्याने लवकरच याचा पर्दापाश केला जाणार आहे.

### राज्य शाळा कृती समितीच्या पुरस्कारांचे उद्या वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ६ डिसेंबर-**



पुणे विभागाचे माजी शिक्षक आ. दत्तात्रय सावंत प्रणित महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीचे माढा तालुक्यातील जिल्हास्तरीय शाळा शिक्षक पुरस्कारांचे वितरण माजी आ. दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते रविवारी ८ डिसेंबर रोजी दुपारी १ वाजता सिंहगड कॉलेज कोर्टी (ता. पंढरपूर) येथे करण्यात येणार आहे, अशी माहिती नंदकुमार टोणपे यांनी दिली आहे.

संजयमामा शिंदे माध्यमिक विद्यालय भोगेवाडी, आदर्श पब्लिक स्कूल कुर्डूवाडी अंकुलगाव, बबनराव शिंदे माध्यमिक विद्यालय बैरागवाडी, सुनंदा विद्यानिकेतन टेंभुर्णी, महात्मा फुले विद्यालय अँड ज्युनिअर कॉलेज टेंभुर्णी यांना कृतिशील शाळा, प्रा. हरिचंद्र इंगळे यांना बीएड कॉलेज कृतिशील प्राचार्य, डॉ. सचिन लोंढे, प्रेमचंद गायकवाड यांना सीनियर कॉलेज कृतिशील प्राध्यापक, प्रा. उषा पाटील, प्रा. बाबासाहेब शेळके, प्रा. विजय पाटील यांना ज्युनिअर कॉलेज कृतीशील प्राध्यापक, दत्तू डेपे, शंकर ढावरे, संजय लावंड, रोहिदास सोनवणे, रेश्मा अनंतकळस यांना कृतिशील मुख्याध्यापक, नरेश्वर पाटील यांना कृतिशील आश्रमशाळा मुख्याध्यापक, सागर थोरात व प्रियंका शिंदे यांना कृतिशील इंग्लिश मीडियम स्कूल मुख्याध्यापक, कुबेर गायकवाड, भीमराव जगदाळे, शेखर सुर्वे, गजानन जोकार, उल्हास सोनार, मनीषा सोनवणे, दत्तात्रय देवकर यांना कृतिशील शिक्षक, संतोष कापरे यांना औद्योगिक प्रशिक्षण संस्था कृतिशील शिक्षक, प्रकाश दळवी, विनोद काळे, श्रीकांत सावंत यांना कृतिशील क्रीडा, तुकाराम भाकरे यांना कृतिशील ग्रंथपाल, नवनाथ पिसे यांना कृतिशील लिपिक पुरस्कार, संजय शिंदे यांना कृतिशील शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार अशी एकूण ३३ पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. उपस्थित राहण्याचे आवाहन माढा तालुका महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीचे दत्तात्रय ननवरे, नंदकुमार टोणपे, गणेश कोकाटे, बंडू जाधव, संपर्क प्रमुख महावीर आखाडे, समन्वयक गजानन लावर यांनी केले आहे.

### अनिल पाटील यांच्या 'बकुळ फुले' पुस्तकास राज्यस्तरीय पुरस्कार

**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**



नाट्य श्री साहित्य कला मंच गडचिरोली आयोजित महामृत्युंजय पुरस्कार -२०२४. जाहीर झाले. प्रसिद्ध लेखक आणि सोलापुरातील रेल्वेतील सेवानिवृत्त सेफ्टी कौन्सिलर (ट्रॅफिक) यांच्या ''बकुळ फुले'' या लेखसंग्रहास संकीर्ण विभागातील पुरस्काराने गौरवण्यात आले. दिनांक १५ डिसेंबर २०२४ रोजी गडचिरोली येथील कार्यक्रमात हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात येईल. राज्यस्तरीय पुरस्काराचा सन्मान मिळालेले त्यांचे हे दुसरे पुस्तक आहे.

### अन्नछत्र अक्कलकोट विकासाचा राजमार्ग : विक्रांत देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ६ डिसेंबर-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यास हे श्रीक्षेत्र अक्कलकोटचा विकासाचा महामार्ग असल्याचे मनोगत महामार्ग पोलीस अधीक्षक विक्रांत देशमुख, पुणे यांनी व्यक्त केले.

ते श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहकुटुंब आले असता न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. त्यांच्यासमवेत सहायक पोलीस निरीक्षक महामार्ग आनंद थिटे पाकणी, पोहेकॉ दत्तात्रय घंटे, पोकॉ पांडुरंग केंद्रे, मंडळाचे मनोज निकम, एस. के. स्वामी, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, निखील पाटील, पिंटू धोडमनी, प्रवीण घाडगे, गोटू माने, तानाजी पाटील, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, राजेंद्र पवार, प्रसाद हुल्ले, राहुल इंडे, महांतेश स्वामी, विशाल घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

### व्हाईस ऑफ मीडिया डिजिटल विंगच्या तुळजापूर तालुकाध्यक्षपदी सचिन तोग्गी यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ६ डिसेंबर-**



जय मल्हार पत्रकार संघाचे सदस्य पत्रकार सचिन शशिकांत तोगगी यांची व्हाईस ऑफ मीडिया डिजिटल विंग च्या तुळजापूर तालुकाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन केले जात आहे. अवघ्या पाच एक वर्षात पत्रकारिता क्षेत्रात पदार्पण करून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत केवळ संघाच्या विविध कार्यक्रमात हिरारिने भाग घेऊन स्वतःचे या क्षेत्रात अस्तित्व निर्माण केले. जगभरातील ४७ देशात पत्रकारांचे संघटन करून विविध प्रश्नावर आवाज उठवण्याचे काम या संघटनेच्या माध्यमातून केले जाते. जय मल्हार पत्रकार संघ हा जिल्ह्यात अग्रेसर असून विविध सामाजिक उपक्रम राबवून एक वेगळा आदर्श व पायंडा निर्माण केला असून आगामी काळात हाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून काम करणार असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.



### 'कर्मयोगी'मध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाची कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. ६ डिसेंबर-**

राज्य उत्पादन शुल्क विभाग सोलापूर यांच्या वतीने नवनियुक्त दुय्यम निरीक्षक व जवान संवर्गीय कर्मचारी यांची कार्यशाळा राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षक भाग्यश्री जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यात आयोजित करण्यात आली होती.

यावेळी पंढरपूर विभागाचे निरीक्षक पंकज कुंभार, कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी, प्रोडक्शन मॅनेजर एम. आर. कुलकर्णी, डिस्टीलरी मॅनेजर राजाराम पाटील उपस्थित होते. यावेळी भाग्यश्री जाधव यांनी नवनिर्वाचित नियुक्ती झालेल्या दुय्यम निरीक्षक व जवान संवर्गीय कर्मचारी यांना आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची माहिती देऊन साखर कारखान्याच्या आसवनी प्रकल्पामधील उत्पादनावर कशाप्रकारे कामकाज करावे याबाबत सूचना व मार्गदर्शन केले. यात कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या प्रगतीचा उल्लेख करून कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक व्हा.चेअरमन कैलास खुळे व कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी यांच्या सुयोग्य नियोजनाचा आवर्जुन उल्लेख करून कारखाना केंद्र सरकारच्या सर्व नियम व अटींचे पालन करीत आसवनी प्रकल्पात योग्य पद्धतीने उत्पादन घेत असल्याची बाब स्पष्ट केली तसेच साखर, मळी, मद्यार्क, ईथेनॉल निमिती व वापर या विषयाचे नियमावलीवर मार्गदर्शन केले . याबरोबर कारखान्याच्या डिस्टीलेशन, फरमेंटेशन, अल्कोहोल, स्ट्रेंथ तपासणी, वेअर हाऊस, रिसीव्हर, स्टोरेज व्हॅट, मोलॅसीस टँक याची पहाणी केली.

कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी कारखाना राबवत असलेल्या योजनांचा व शासकीय नियमांची माहिती दिली. यावेळी राज्य उत्पादन शुल्क पंढरपूर विभागाचे निरीक्षक पंकज कुंभार यांनी नवनियुक्त दुय्यम निरीक्षक व जवान संवर्गीय कर्मचारी यांना कारखान्याच्या आसवनी प्रकल्पामध्ये कशाप्रकारे कामकाज करावे याचे प्रेझेंटेशन द्वारे माहिती दिली. सूत्रसंचालन दुय्यम निरीक्षक अजिंक्य गायकवाड, सुशांत हजारे यांनी केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## संक्षिप्त वृत्त



### हरिभाई देवकरण महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिवस साजरा

**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

निद्रित अवस्थेत असलेल्या भारतीय समाजाच्या डोळ्यात अंजन घालणारे, घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन व कार्य अतुलनीय आहे. शिक्षणतज्ञ, अर्थतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, समरसतावादी, लोकशाही मूल्ये देणारे महामानव डॉ. आंबेडकरांचे नाव अजरामर राहील असे मत प्रमुख पाहुणे देवदत्त जोशी यांनी हरिभाई देवकरण महाविद्यालयात आयोजित डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त मांडले. शाला समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमात व्यासपीठावर प्राचार्या दीपा फाटक, पर्यवेक्षक कुंभार एस. एस., बनसोडे बी. डी., राऊत ए. सी., कार्याध्यक्ष डॉ. दिलीप फुटाणे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. धन्यकुमार बिराजदार उपस्थित होते. यावेळी देवदत्त जोशी पुढे म्हणाले, ग्रंथ हेच गुरू मानणारे डॉ आंबेडकर शिक्षणाचे महत्त्व विषद केले. त्यांनी भारतीय समाजातील समस्यांचे समाधान शोधण्यासाठी एकता व संघर्षाचा मंत्र दिला. ईस्ट इंडिया कंपनीचा अभ्यास करून भारताचे शोषण करणाऱ्या इंग्रजांविरोधात बोलण्याचा धाडस करणारे आंबेडकर नदी जोड प्रकल्प, भाषावार प्रांतरचना भारताच्या उज्ज्वल भवितव्यासाठी जीवन व्यतीत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी केले तर प्रा. कदम पी. पी. यांनी आभार प्रदर्शन केले.



### श्री हिराचंद नेमचंद वाचनालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली

**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे द्रष्टे विचारवंत होते. त्यांनी आपल्या अनेक ग्रंथातून व भाषणातून भारताच्या विकासात वाढत्या लोकसंख्येचा अडसर असून त्यासाठी कुटुंबा नियोजनाची आवश्यकता, भारताला चीनपासून धोका अशा अनेक बाबी सांगितल्या. हैद्राबाद विलीनीकरणातील निजामाला शरण आणण्यासाठी पोलिस अँक्शन करण्यासाठी जो घटनात्मक पेच निर्माण झाला होता तो सोडवला. तसेच छोट्या राज्याची संकल्पनेचा त्यांनी पुरस्कार केला. असे विचार श्री. हिराचंद नेमचंद वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर व कार्यवाह डॉ. नभा काकडे यांनी व्यक्त केले. श्री. हिराचंद नेमचंद वाचनालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी कार्यकारिणी सदस्या अँड. नीला मोरे, ग्रंथपाल दत्ता मोरे, कर्मचारीवर्ग वाचक उपस्थित होते.



### डॉ. आंबेडकर उद्यान व संविधान भवन कृती समितीतर्फे अभिवादन

**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान व संविधान भवन कृती समितीतर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास सरचिटणीस राजरत्न फडतरे, कार्याध्यक्ष राजाभाऊ सोनकांबळे यांनी अभिवादन केले. संपर्कप्रमुख गौतम मसलखांब, कोषाध्यक्ष दत्ताजी गायकवाड, उपाध्यक्ष धर्मेंद्र चंदनशिवे, मेजर साबळे यांच्यासह सोलापूर महानगरपालिकेचे माजी उपमहापौर प्रमोद गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान व संविधान भवन कृती समितीमधील पदाधिकारी तसेच महिला वर्ग उपस्थित होते.

# सोलापूर शहरात हेल्मेट सक्तीला विरोध

**संभाजी ब्रिगेडची मागणी**

**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

राज्यात सोलापूर शहरासह ४५ शहरांमध्ये दुचाकी स्वरांसह पाठीमागे बसणाऱ्या सहप्रवाशालाही पुन्हा हेल्मेट सक्तीचे आदेश देण्यात आले आहेत. राष्ट्रीय आणि राज्य महामार्ग येथे सर्वाधिक अपघात होऊन अनेक जण मृत्युमुखी पडले आहेत त्यामुळे तिथे हेल्मेटची सक्ती आवश्यक आहे पण महानगरपालिका हद्दीत हेल्मेट बंधनकारक नाही त्यामुळे सोलापूर शहरात हेल्मेट सक्तीच्या निर्णयाला संभाजी ब्रिगेडच्या वतीने विरोध करण्यात आला आहे.



विना हेल्मेट नसलेल्या दुचाकीचालकांवर कारवाई केली जात होती. मात्र, आता सहप्रवाशावर देखील करवाई केली जाणार आहे. याबाबत नवे बदल करण्यात आले आहे. पोलिसांच्या ई-चलन मशिनमध्ये मोठा बदल करण्यात आला आहे. सोलापूर शहरातील भागात विनाहेल्मेट वाहनचालकांवर सीसीटीव्हीमार्फत कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे विना हेल्मेट नागरिकांवर मोठा दंड आकारण्यात येणार असून हेल्मेट सक्ती विरोधात नागरिकांनी रोष व्यक्त होत आहे.

सोलापूर शहरात गेल्या एक-दोन वर्षापासून जड वाहतुकीस सकाळी सहा ते रात्री १० पर्यंत बंदी घालण्यात आलेली आहे शहरातील वाहनांचा वेग अत्यंत मर्यादित असतो त्यामुळे शहरात अपघाताचे व अपघातातील मृत्यूंचे प्रमाण अत्यल्प असून शहरातील वर्दयीच्या ठिकाणी दोन हेल्मेट वागवणे अवघड आहे त्यामुळे सोलापूर शहरांमध्ये हेल्मेट सक्ती करण्यात येऊ नये अशी मागणी संभाजी ब्रिगेडचे वतीने करण्यात आली आहे

यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, शहराध्यक्ष जगदाळे सिताराम बाबर, प्राजक्ता बागलस, अरविंद शेळके, सोहेल सय्यद, सुलेमान पिरजादे, फिरोज सय्यद, शेखर चौगुले, मल्लिकार्जुन शेवगार, सचिन होनमाने, श्रवण साळुंखे, रुपेश किरसावंगी, गौरीशंकर वरपे, मल्लिकार्जुन शेवगर, सुमित मंजूरकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## आयडल्स बहुद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे महामानवास अभिवादन

**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वान दिनानिमित्त आयडल्स संस्थेतर्फे प्रथमता महामानवाच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले. त्यावेळी संस्थेचे मार्गदर्शक बब्रुवान बाबरे, अनिल शिवशरण, संस्थेचे संस्थापक कुणाल बाबरे, उत्सव अध्यक्ष सुमित शिवशरण, शेरा तुळसे, अमोल जौंजट, अॅड राजकुमार बाबरे, सुमित बाबरे, मंगेश कांबळे, श्रीशैल हिरेमठ, अतुल सोनवणे, बालाजी अंधारे, विशाल कांबळे, नागेश केंगार, चेतन कांबळे, सोहम मस्के, वंशी अडकूल व संस्थेचे सर्व सभासद उपस्थित होते.

## पतसंस्थांच्या सक्षमीकरणासाठी पदाधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाची गरज : दिलीप पतंगे

**चर्चासत्रात प्रतिनिधींचा सहभाग**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

शासनाने पतसंस्थांसाठी प्रशिक्षण अत्यावश्यक केले आहे. संस्थेचे कामकाज सुलभ व्हायचे असेल तर कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. जी पतसंस्था प्रशिक्षण टाळेल त्यांना अडचणींचा सामना करावा लागेल. जोपर्यंत आपल्या मनातील भिती निघून जात नाही तोपर्यंत आपण चांगले काम करू शकत नाही. हे लक्षात घेवून पतसंस्थांचे चेअरमन, संचालक मंडळ अशा प्रत्येकाने प्रशिक्षण घेतलेच पाहिजे. पतसंस्था सक्षम करायच्या असतील तर संस्थेचे संचालक मंडळ व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण घेणे अत्यंत महत्वाचे आहे, असे प्रतिपादन सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष दिलीप पतंगे यांनी केले.



सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, मंगळवेढा व सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित चर्चासत्र व प्रशिक्षण प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंगळवेढ्याचे सहाय्यक निबंधक दत्तात्रय भवर, धनश्री महिला पतसंस्थेच्या अध्यक्षा प्रा. शोभा काळुंगे, तात्यासाहेब चव्हाण, दिगंबर भगरे, मारुती बाबर उपस्थित होते.

दत्तात्रय भवर म्हणाले, कायद्यातील तरतुदींचे ज्ञान सर्वांना असावे, हाच प्रशिक्षणामागचा हेतू आहे. ठेवींना संरक्षण असेल तरच ठेवीदार व संस्था निश्चिंत राहतील. पतसंस्थेचे संचालक व कर्मचाऱ्यांनी संस्थेचा उपविधी वाचला पाहिजे. त्यामुळे दैनंदिन कामकाजामध्ये त्याचा नक्कीच फायदा होईल.

## इंटरस्कूल डान्स फेस्टिव्हल स्पर्धेत सिंहगड पब्लिक स्कूल विजेते

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

दृश्या - २२४'' इंटरस्कूल डान्स फेस्टिव्हल सत्र- २ च्या नृत्य स्पर्धेमध्ये सोलापूरच्या सिंहगड पब्लिक स्कूलने विजेतेपद पटकावले.

बार्शीतील परमप्रसाद चॅरिटेबल सोसायटीच्या सेंट जोसेफ इंग्लिश मिडियम हायस्कूल येथे ''दृश्या २२४'' इंटरस्कूल डान्स फेस्टिवलच्या दुसऱ्या सत्राचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा हब ऑफ लर्निंग अंतर्गत घेण्यात आली. ही नृत्य स्पर्धा दोन विविध गटांमध्ये घेण्यात आली. ज्युनिअर गटाची (इयत्ता चौथी ते सातवी) थीम ''मेरी माटी - मेरा देश'' तसेच सिनियर गटाची (इयत्ता आठवी ते दहावी) थीम ''सिनेमॅटिक'' होती. या स्पर्धेत ज्युनिअर गटामध्ये १५ हून अधिक व सिनियर गटामध्ये १७ हून अधिक शाळांनी भाग घेऊन ५५० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. ज्युनिअर गटामध्ये सोलापूरच्या सिंहगड पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी ''मेरी माटी - मेरा देश'' या थीमवर आपल्या उत्कृष्ट सादरीकरणाने देशाप्रती प्रेम दाखवून प्रथम क्रमांक पटकावत स्मृतिचिन्ह व रोख रक्कम रुपये चाळीस हजार मिळविले. तसेच सिनियर गटातील विद्यार्थ्यांनी ''सिनेमॅटिक'' थीम साठी ''खली बली'' या गाण्यावर रोमांचक कामगिरी दाखवून विशेष प्राविण्यासह रोख रक्कम आठ हजार मिळविले.




संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्या निखहत शेख, उपप्राचार्य प्रकाश नवल यांनी विद्यार्थ्यांचे, पालकांचे, नृत्यप्रशिक्षकाचे व शिक्षकांचे अभिनंदन केले.

# 'त्या' दुष्काळी ५ तालुक्यातील ई-केवायसी पेंडिंग



**५ तालुक्यातील अशी मिळाली मदत**

| तालुक्याचे नाव | बाधित शेतकरी | मिळालेली रक्कम |
|---|---|---|
| बार्शी | २०,०३५ | १३ कोटी १२ लाख ७ हजार ३२३ रुपये |
| माढा | ५५,०२६ | ९१ कोटी २७ लाख ५८ हजार ३० रुपये |
| करमाळा | ५७,१८५ | ८७ कोटी ३७ लाख १६ हजार ५५० रुपये |
| सांगोला | ५४,६९६ | ८४ कोटी ५७ लाख ८५ हजार १७ रुपये |
| माळशिरस | ३६,३९९ | ५४ कोटी ५३ लाख ९ हजार ७८८ रुपये |
| **एकूण रक्कम** | **२,२३,३४१** | **३३ कोटी ७६ लाख ९६ हजार ७०८ रुपये** |

**सर्व शेतकऱ्यांना खात्यावर पैसे झाले जमा**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

खरिप हंगाम २०२३ मध्ये दुष्काळाने झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीचे अहवाल शासनदरबारी पाठविले होते. या अहवालामध्ये जिल्ह्यातील ५ तालुक्यांतील ५ लाख १९ हजार ८४९ बाधित शेतकऱ्यांना ६७९ कोटीची मागणी शासनाकडे करण्यात आली होती. त्यापैकी २ लाख ४६ हजार २३६ बाधित शेतकऱ्यांना ३५६ कोटी ६२ लाख ५७ हजार ८०९ कोटीची मंजुरी मिळाली आणि ही मदत लाभार्थी सर्व शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून गुरूवारी (दि.५) देण्यात आली. २०२३-२४ या सालात जिल्ह्यात अत्यल्प पाऊस झाल्याने जिल्ह्यातील ५ तालुक्यात अती दुष्काळी स्थिती निर्माण झाल्याचा अहवाल शासनाकडे गेल्यानंतर बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात आली होती. सोलापूर जिल्ह्यात राज्यस्तरीय दुष्काळी पाहणी समितीने सर्व्हे करून बार्शी, माढा, करमाळा, सांगोला, माळशिरस या पाच तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला होता. संबंधित तलाठी भाऊसाहेबांनी शेतकऱ्यांना ई-केवासी करण्यासाठी आवाहन केल्याने उर्वरित शेतकऱ्यांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर त्या सर्व शेतकऱ्यांच्या खात्यावर नुकसान भरपाईची रक्कम जमा झाली आहे.



**यंदा मुबलक पाऊस; यंदा पाणी टँकरची गरज नाही**

गतवर्षी जिल्ह्यात दुष्काळी स्थिती निर्माण झाल्याने जवळपास ३०० पर्यंत पाण्याच्या टँकरने काही गावे, वाड्या-वस्त्यांवर पाणीपुरवठा करावा लागला होता. यंदा सरासरीच्या तुलनेत तब्बल दीडपट पाऊस नोंदला गेल्याने जिल्ह्याच्या सर्वच तालुक्यात मुबलक पाणीसाठा आहे. यामुळे यंदा पाणी टँकरची शक्यतो गरज भासणार नाही.

**- अमृत नाटेकर, प्रभारी अप्पर जिल्हाधिकारी**

शेती पिकांच्या नुकसानीबाबत दिलेल्या मदतीमध्ये सुरूवातीला २ लाख २३ हजार ३४१ बाधित शेतकऱ्यांच्या खात्यावर ३३० कोटी ७६ लाख ९६ हजार ७०८ इतकी रक्कम ऑनलाईनने खात्यावर जमा झाली आहे. तर २१ हजार ३२९ बाधित शेतकऱ्यांच्या नावावरील २३ कोटी ५९ लाख ४७ हजार ६२१ इतकी रक्कम केवायसी न केल्याने थकीत होते. यानंतर जसजसे हे शेतकरी केवायसी करुन घेतील, तसतसे त्यांच्या खात्यावर गेल्या ६ महिन्यात सर्व पैसे वर्ग झाले आहेत. यामुळे ५ दुष्काळी तालुक्यातील त्या लाभार्थी सर्व शेतकऱ्यांना प्रशासनाकडून मदत मिळवून दिल्याने शेतकरी बांधवांनीही समाधान व्यक्त केले.

# वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन; १६ हजार दंड वसूल

**मंद्रुपचे सपोनि मनोज पवार यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ६ डिसेंबर-**

ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांसह प्रवासी वाहतूक व दुचाकी वाहन चालवताना वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन व वाहनचालकावर दंडात्मक कारवाई सुरू असून १९ वाहनांवर कारवाई करून १६ हजार रूपये दंड वसूल करण्यात आल्याची माहिती मंद्रुप पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांनी दिली.

सध्या साखर कारखान्यांसाठी ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रक व ट्रॅक्टरना रिप्लेक्टर नसल्याने अपघातांचे प्रमाण वाढत आहेत. शिवाय वाहनचालक मोठ्या आवाजात गाणे लावल्याने अपघाताचे प्रमाण वाढत आहेत. शिवाय अनेक प्रवासी वाहतूक वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून प्रवासी वाहतूक करीत आहेत. दुचाकीचालक वाहतुकीचे नियमांचे पालन करीत असल्याने त्यांच्यावर मंद्रुप पोलिसांनी दंडात्मक कारवाई केली. यावेळी रिप्लेक्टर नसलेल्या ६ हजार रूपये दंड, वाहनांचे कागदपत्र नसलेल्या वाहनांवर ३ हजार रूपये दंड, दुचाकीवर ट्रिपलसीट ४ हजार रूपये दंड, हेल्मेट नसणे ३ हजार रूपये दंड असे एकूण १६ हजार रूपये दंड वसूल करण्यात आले आहे. सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांच्या मार्गदर्शकाखाली वाहतूक शाखा इन्चार्ज पोलीस हेडकॉन्स्टेबल बजरंग जाधव, पोलीस कॉन्स्टेबल चेतन गवंडी व पोलीस कॉन्स्टेबल राहुल दलवाई यांनी कारवाई केली.




**वाहतूक नियमांचे पालन करावे**

ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांसह दुचाकी चालकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे. अन्यथा दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल.

**- मनोज पवार,** सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, मंद्रुप












हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## कटींग न केल्याच्या कारणावरून तरूणास मारहाण

**सोलापूर. दि. ६ डिसेंबर -**
मुलाची कटींग का केली नाहीस असे म्हणून तरूणास प्लास्टीकच्या पाईपने मारहाण करून जखमी करण्यात आले. विकास संतोष चौधरी (वय २८, रा. खंडोबाची वाडी, ता. मोहोळ) असे जखमीचे नाव आहे. ५ डिसेंबर रोजी रात्री दहाच्या सुमारास तु माझ्या मुलाचे कटींग का केले नाही असे म्हणून धनाजी धोंडीराम शिंदे, निलेश बळीराम गुंड व इतर एक जणांनी मिळून विकास चौधरी यास प्लास्टीकच्या पाईपने व लाथाबुक्क्याने जबर मारहाण केली. यामध्ये चौधरी याच्या सर्वांगास मुका मार लागल्याने त्यास अक्षय जाधव याने सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.





https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


**▶▶ क्राईम वृत्त...**




### चपळगीजवळ दुचाकीवरून पडून महिला जखमी

**सोलापूर. दि. ६ डिसेंबर -**
अक्कलकोट ते कासलिंग जेऊर रस्त्यावरील चपळगी वस्तीजवळील गतीरोधकवरून दुचाकी उडाल्याने तोल जाऊन पडून महिला जखमी झाली. सुनंदा नागण्णा चुंगी (वय ३५, रा. सलगर, ता. अक्कलकोट) असे जखमी महिलेचे नाव आहे. ६ डिसेंबर रोजी सकाळी ७ च्या सुमारास सुनंदा चुंगी या अक्कलकोट येथून कासलिंग जेऊन येथे दुचाकीवरून डबलसीट जात होत्या. त्यावेळी चपळगी वस्तीजवळील गतीरोधकवरून दुचाकी उडाल्याने सुनंदा यांचा तोल जाऊन त्या खाली पडून जखमी झाल्याने त्यांना पती नागण्णा चुंगी यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### येडोळा येथील महिलेचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर. दि. ६ डिसेंबर -**
येडोळा (ता. तुळजापूर) येथील महिलेने विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. वैष्णवी पृथ्वीराज जाधव (वय २८) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या महिलेचे नाव आहे. ५ डिसेंबर रोजी दुपारी राहत्या घरी वैष्णवी जाधव यांनी अज्ञात कारणावरून विषारी औषध प्राशन केले. यानंतर त्यांना त्रास होऊ लागल्यावर वैष्णवी यांना पती पृथ्वीराज यांनी उपचारासाठी नळदुर्ग येथून सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### लोखंडी हुकने मारल्याने तरूण जखमी

**सोलापूर. दि. ६ डिसेंबर -**
घरगुती भांडणात भावाने लोखंडी हुकने मारल्याने तरूण जखमी झाला. पिरप्पा शिवशरण घोडके (वय २८, रा. बेगेळ्ळी रोड, समर्थ नगर, अक्कलकोट) असे जखमीचे नाव आहे. ५ डिसेंबर रोजी रात्री दहाच्या सुमारास राहत्या घरी घरगुती वादातून पिरप्पा यास भाऊ हणमंत शिवशरण घोडके याने लोखंडी हुकने मारल्याने पिरप्पा याच्या गळ्यास लागून तो जखमी झाला. त्यामुळे पिरप्पा यास उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात म्हाळप्पा घोडके यांनी दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### बेगमपुरमधील गुरांच्या बाजारात तरूणास मारहाण

**सोलापूर. दि. ६ डिसेंबर -**
बेगमपूर (ता. मोहोळ) येथील गुरांच्या बाजारात तरूणास मारहाण करून जखमी करण्यात आले. अमर सुनिल सोनवणे (वय ३०, रा. बेगमपूर) असे जखमीचे नाव आहे. ४ डिसेंबर रोजी रात्री आठच्या सुमारास गावातील गुरांच्या बाजारात अमर सोनवणे बसला होता. त्यावेळी अज्ञात कारणांने अज्ञात ६ ते ७ जणांनी मिळून लाकडी दांडक्याने व लाथाबुक्क्याने मारहाण करून अमर यास जखमी करण्यात आले. अमर याच्या सर्वांगास जबर मार लागल्याने त्यास किशोर काने यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### वॉचमनकडून गार्डनमध्ये खेळणाऱ्या बालकांना मारहाण

**सोलापूर. दि. ६ डिसेंबर -**
शितलादेवी मंदीर येथील गार्डनमध्ये खेळणाऱ्या बालकांना वॉचमनकडून मारहाण करण्यात आली.राजू राजेश फटफटवाले (वय १२, रा. उत्तर सदर बझार, लष्कर, सोलापूर) असे जखमी बालकाचे नाव आहे. ५ डिसेंबर रोजी रात्री पावणे दहाच्या सुमारास शितला देवी मंदीर येथील गार्डनमध्ये खेळत असताना तुम्ही सारखे येथे का खेळता असे म्हणून तेथील वॉचमन अशोक गोरीवाले व इतर दोन जणांनी मिळून राजू फटफटवाले यास लाथाबुक्क्याने व दागडाने मारहाण केली. यामध्ये राजू याच्या सर्वांगास मार लागल्याने त्यास अभिमन्यू चौधरी यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



# चांदण्याची छाया, कापराची काया माऊलीची माया होता, माझा भीमराया !

## सोलापुरात अभिवादनासाठी लोटला जनसागर !





### विविध पक्ष संघटना व संस्थांच्या वतीने अभिवादन

### महामानवास रक्तदानाने वाहिली आदरांजली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर -**
चांदण्याची छाया, कापराची काया माऊलीची माया होता, माझा भीमराया !! या काव्यपंक्तीप्रमाणेच कृतज्ञतेची भावना व्यक्त करत विविध सामाजिक संस्था, संघटना पक्ष आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास मनोभावे अभिवादन केले. अभिवादनासाठी जनसागर लोटला होता. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्प, पुष्पहार अर्पण करत मेणबत्ती प्रज्वलित करून सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन मनोभावे अबालवृद्धांनी अभिवादन केले. विविध पक्ष, सामाजिक संघटना, संस्था तसेच अधिकाऱ्यांकडून अभिवादन करण्यात आले. भारतीय बौद्ध महासभा समता सैनिक दलाच्या वतीने मानवंदना देण्यात आली.

महापरिनिर्वाण दिनानिमित्त सोलापूर शहरातील पार्क स्टेडियम जवळील भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास आणि मिलिंद नगर येथील अस्थिविहार प्रेरणाभूमी या ठिकाणी अभिवादन करण्यासाठी अलोट गर्दी झाली होती. सकाळपासूनच अभिवादनासाठी मोठी गर्दी झाली होती. पुतळा परिसरात विविध संस्थांच्या वतीने रक्तदान करून महामानवास आदरांजली वाहण्यात आली.

#### समता सैनिक दलाची मानवंदना

प्रज्ञासुर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास समता सैनिक दल शहर जिल्हा, शाक्य संघ, सिद्धनाक ब्रिगेड व महिला ब्रिगेड यांच्या संयुक्त विद्यमाने मानवंदना देण्यात आली. प्रारंभी समता सैनिक दलाचे जीओसी अंबादास कदम, शाक्य संघाचे अध्यक्ष अंगद मुके आणि सिदनाक ब्रिगेडचे प्रमुख मेजर कांबळे यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी समता सैनिक दलाचे ज्येष्ठ सल्लागार अण्णासाहेब भालशंकर, महासचिव अनिल जगझाप, अंगद जेटीथोर, वसिष्ठ सोनकांबळे, संभाजी तळभंडारे, मुकुंद चंदनशिवे, सुधीर चंदनशिवे, चंद्रकांत कोळेकर, शांतिकुमार कांबळे, रत्नदीप कांबळे, कुणाल जानराव,विनोद जाधव, अरूण गायकवाड, सुनिता गायकवाड, सुमित्रा जाधव, चोखा कांबळे, विजय कांबळे, गोपीनाथ कांबळे, शांताराम वाघमारे, शशिकांत बाबरे, गायकवाड, जयानंद कांबळे, प्रकाश घटकांबळे, शिवपुत्र घटकंबळे, मेजर कांबळे, मेजर गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. प्रमोद जाधव यांनी शिस्तबद्ध संचलन केले. महापरिनिर्वाण दिनानिमित्त विश्वभूषण डॉ. आंबेडकर चौक येथे डॉ. आंबेडकर कलाकार समितीच्या वतीने भीम गीत आदरांजली कार्यक्रम पार पडला. डॉ. आंबेडकर कलाकार समितीच्या वतीनेही गीत भीमांजली कार्यक्रम घेण्यात आला. या दोन्ही कलाकार समितीच्या वतीने विविध गीतांच्या माध्यमातून महामानवास अभिवादन करण्यात आले.भारतरत्न डॉ. आंबेडकर चौक येथे पुस्तकांसह फोटो, कॅलेंडर, पूजा साहित्य व इतर साहित्याच्या स्टॉल्सवर मोठ्या प्रमाणात पुस्तकांची विक्री झाल्याचे सांगण्यात आले. महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक व कर्मचारी महासंघाच्या वतीने अभिवादन करण्यात आले. प्रारंभी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महासंघाचे राज्य सरचिटणीस प्राचार्य बोधिप्रकाश गायकवाड, राज्य उपाध्यक्ष रमेश लोखंडे, जिल्हा सचिव रवी देवकर, जिल्हा खजिनदार दाऊत आतार, नागेश सातपुते, गाडे, निर्मला मौळे,आम्रपाली भालशंकर, गायकवाड, सिद्धेश्वर भुरले, दिलीप गायकवाड, दत्तात्रय शिंदे, प्रा. अभिजीत भंडारे, इन्नुस बाळगी, महिबूब तांबोळी, रत्नदीप कांबळे, नागेश सातपुते, एकोराम चौगुले, शिवानंद चौगुले आदी उपस्थित होते.



#### ईव्हीएम मशीन विरोधात स्वाक्षरी मोहीम

वंचित बहुजन आघाडीच्यावतीने डॉ. आंबेडकर चौक येथे ईव्हीएम मशीन विरोधात जन आंदोलन अंतर्गत स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. ईव्हीएम हटवा-देश वाचवा असा नारा यावेळी देण्यात आला.

#### विविध संस्थांच्या वतीने रक्तदान करून अभिवादन

डॉ. आंबेडकर पुतळा परिसरात सोलापूर शासकीय रुग्णालय रक्तपेढी, बुद्धराष्ट्र प्रतिष्ठान ,भीमशक्ती बहुउद्देशीय मागासवर्गीय सामाजिक संस्था व परिवर्तन सामाजिक संस्था यासह विविध संस्थांच्या वतीने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.

#### ब्लड फॉर बाबासाहेब...!!

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनी ब्लड फॉर बाबासाहेब या घोषवाक्यानुसार सोलापूरात छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय शासकिय रक्तपेढीमार्फत हुतात्मा स्मृती मंदिर शेजारी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. यावेळी डॉ. औदुंबर मस्के, रक्तपेढीचे प्रमुख डॉ. सुशील सोनवणे , डॉ. स्मिता शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले. या शिबिरात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती दर्शवत रक्तदान करून अभिवादन केले.

#### महापालिकेच्या वतीने प्रज्ञासूर्यास अभिवादन !

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास व कौन्सिल हॉल येथील आयुक्त यांच्या कार्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस आयुक्त शीतल तेली -.उगले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच बुधवार पेठेतील मिलिंद नगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थीविहार प्रेरणाभूमी येथे आयुक्त शीतल तेली -उगले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त रवि पवार , सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, माजी गटनेते आनंद चंदनशिवे,विभागीय अधिकारी अविनाश अंत्रोळीकर, विभागीय अधिकारी हिदायत मुजावर, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी ओमप्रकाश वाघमारे, उद्यान अधीक्षक किरण जगदाळे, सुभानजी बनसोडे, बी. के. तळभंडारे, सुशील सरवदे, शिवम सोनकांबळे, ब्रम्हा निकंबे, शशी तळमोहिते, एजाज शेख,जगन्नाथ बनसोडे,नितीन गायकवाड, सिद्धू तिमिगार, सचिन पोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

#### एक वही एक पेन उपक्रमाचे आयोजन

डॉ. आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने छत्रपती शाहू राजे प्रतिष्ठान च्या वतीने विश्वरत्न आंबेडकर अस्थीविहार प्रेरणाभूमी ट्रस्ट, रयत शिक्षण संस्था संचलित रावजी सखाराम हायस्कूल, सोमपा शाळा क्र.११ या शैक्षणिक संस्थांना एक वही आणि एक पेन उपक्रमांतर्गत ६८ डझन वह्या व पेन देण्यात आले. यावेळी रेल्वे विभागाचे वरिष्ठ विभागीय व्यवस्थापक योगेश पाटील, संस्थेचे संस्थापक देवा उघडे , पोलीस इन्स्पेक्टर जाधव, रेल्वे विभागाचे जनसंपर्क निरीक्षक निरंजन मोरे ,सकल मराठा समाजाचे समन्वयक माऊली पवार, पत्रकार मनिष केत, रावजी सखाराम हायस्कूलचे मुख्याध्यापक संतोष वालवडकर, संडे धम्म स्कूलच्या स्मिता आबुटे, शिक्षिका पाटील, शशीकांत तळमोहिते, अतिश बनसोडे, अध्यक्ष शिल भोसले, सचिन मामा वाघमारे, कांत उघडे, शिलवंत काळे, अमर साळवे, युवराज बडेकर, महादेव वायदंडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अनुराग सुतकर यांनी केले. यावेळी बहुसंख्येने भिम अनुयायी उपस्थित होते.

सकल मातंग समाज व क्रांतिवीर लहुजी शक्ती सेना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने डॉ. आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी सेनेचे प्रदेशाध्यक्ष सुरेश पाटोळे, प्रविण वाडे, कोमल माचले, गौतम बनसोडे, राजाभाऊ जाधव, योगेश सोनवणे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

महानगरपालिका महामानव डॉ.आंबेडकर ट्रेड युनियनच्या वतीने वंदन करण्यात आले. यावेळी अध्यक्ष बापूसाहेब सदाफुले, विठ्ठल सोनकांबळे, अरुण म्हेत्रे उपस्थित होते.बहुजन समाज पार्टी जिल्हा युनिटच्या वतीने अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित प्रदेश कार्यकारणी सदस्य अॅड. संजीव सदाफुले, प्रशांत लोकरे, जिल्हाध्यक्ष बबलू गायकवाड, जिल्हा प्रभारी तिपन्ना लोहार, सचिव शिलवंत काळे, माजी शहराध्यक्ष देवा उघडे, शहर युवा अध्यक्ष अमर साळवे आदी उपस्थित होते.



## नंदीध्वजधारकांकडून कसून सराव सुरु

**वेध ग्रामदैवत शिवयोगी सिद्धरामेश्वर यात्रेचे**

**बोला...बोला एकदा भक्तरिंग हर्र...बोला**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**
शिवयोगी श्री सिद्धरामेश्वरांची यात्रा अवघ्या एका महिन्यावर आली असल्याने नंदीध्वजधारकांच्या उत्साहाला उधाण आले आहे. नंदीध्वजधारकांकडून सराव करून घेण्यास मास्तर मंडळी व्यस्त झाली आहेत. गेल्या आठवड्यापासून याचा सराव केला जात आहे. श्री ग्रामदैवत यात्रा काही दिवसांवर आल्याच्या पार्श्वभूमीवर नंदीध्वज पेलण्याचा सराव अंतिम टप्प्यात आल्याचे दिसून येते.

दिवाळी संपल्यानंतर सोलापूरकरांच्या मनात ग्रामदैवत शिवयोगी श्री सिद्धरामेश्वरांच्या यात्रेबद्दल ओढ लागलेली असते. या यात्रेचे प्रमुख वैशिष्ट्य असलेल्या नंदीध्वज आणि नंदीध्वजधारकांबद्दल विलक्षण आकर्षण असल्याने भक्तांमध्ये सराव नंदीध्वजांची पूजा करण्याची प्रथा आहे. नंदीध्वज पूजा केल्यानंतर नंदीध्वजधारकांना अधिक ऊर्जा मिळावी म्हणून सेवेकऱ्यांना सुकामेवा खिरीचे जेवण देण्याची परंपरा आहे. खिरीसोबत तूप, केळी आणि दुधाला प्राधान्य दिले जाते. यात्रेत सर्व समाजाचे मिळून मानाचे सात नंदीध्वज असून नंदीध्वज पेलण्याचा कसून सराव मास्तरांकडून करुन घेतला जात आहे. होम मैदान, सम्मती कट्टा, बाळीवेस, मल्लिकार्जुन मंदिर, गांधी नाथा मैदान, सम्राट चौक, चाटी गल्ली, विजापूरवेस ते मधला मारुती, तुळजापूर वेस, रुपाभवानी रोड परिसरात नंदीध्वज सराव सुरु आहे. तीन वेळा नंदीध्वजधारकांना नंदीध्वज पेलण्याचे कौशल्य शिकविले जात आहे.

#### भक्ती अन् शक्तीचा संगम

वजन पेलण्याचा सराव व्हावा, यासाठी सरावादरम्यान सराव काठ्यांना लोखंडी साखळी बांधून तयारी करून घेतली जात आहे. भक्ती आणि शक्तीच्या संगमातूनच यात्रेत काठी पेलणे शक्य होते. नंदीध्वज पेलण्यासाठी कौशल्य लागते. कसून सराव करावा लागतो. यात्रेच्या एक महिना आधी आम्ही सरावाला सुरुवात करत असल्याची माहिती तिसऱ्या नंदीध्वजाचे मास्तर रेवणसिद्ध माळी यांनी दिली.

## महिलेला जातीवाचक शिवीगाळ करून विनयभंग; चौघांवर गुन्हा

**स्लॉटर हाऊस परिसरातील अलकुंटे चौकातील घटना**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ डिसेंबर -**
शहरातील स्लॉटर हाऊस परिसरातील अलकुंटे चौकात महिलेला जातीवाचक शिवीगाळ करून विनयभंग करणाऱ्या चौघांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन गणेश लंबुवाले व त्याचे तीन साथीदारांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील पिडीत महिला ही ४ डिसेंबर रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास घरासमोर अंगणात कुटुंबियासमवेत जेवणाकरीता बसली होती. त्यावेळी गणेश लंबुवाले व त्याचे तीन साथीदार हे अचानकपणे दगडफेक करीत असताना पिडीतेचा दीर हा दगड फेक का करीत आहेत हे पाहण्यासाठी गेला. त्यावेळी गणेश लंबुवाले व त्याच्या साथीदारांनी पिडीतेचे दीरास मारहाण केली. यावेळी पिडीतेची नातेवाईक महिला ही भांडणे सोडविण्यासाठी गेली असता तिला मारहाण करण्यात आली. तसेच जातीवाचक शिवीगाळ करण्यात आली. यावेळी पिडीतेच्या मनास लज्जा वाटेल असे कृत्य करून तिलाही जातीवाचक शिवीगाळ करण्यात आली. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस आयुक्त यवशंत गवारी पुढील तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९६६

**न मिळो खावया न वाढो संतान ।**
**परि हा नारायण कृपा करो ।।**

नियोजन हा ध्येय, उद्दिष्ट साध्य करण्याचा आधारस्तंभ होय. म्हणूनच जवळपास प्रत्येक व्यक्ती आपली ध्येय, धोरणे, उद्दिष्टे साध्य करण्यासाठी नियोजन करीत असतो. प्रसंगानुरूप किंवा आपल्या चुकीमुळे नियोजन चुकले किंवा त्यात बाधा आली तर माणूस ध्येय, उद्दिष्टाच्या साध्यतेपासून दुरावतो. संसारात अडकलेल्या जीवाची ध्येय, उद्दिष्ट व त्यासाठीचे नियोजन हे प्रामुख्याने स्व भोवती फिरते. त्यामुळे स्व ला बाधक ठरणारे घटक निर्माण झाले म्हणजे त्याचे नियोजन फिसकटते व ध्येय, उद्दिष्ट आपोआप संपुष्टात येतात. पण स्व भोवती न फिरणाऱ्या माणसांच्या बाबतीत असे घडत नाही. अशी माणसं दृढनिश्चयी असतात. कसलेही संकट आले किंवा अवघड अशी बाधा निर्माण झाली तरी हे लोक आपल्या ध्येयाच्या मार्गातून ढळत नाहीत. ज्याच्यावर त्यांची श्रध्दा आहे किंवा जे त्यांचे आदर्श आहेत, अशांकडे ते उद्दिष्टापर्यंत जाण्यासाठी मदत न मागता दृढनिश्चयी राहण्याचा आशीर्वाद मागतात. समाजसेवेचे कंकण बांधलेले तुकाराम महाराज तर अशा दृढ निश्चयी लोकांचे शिरोमणीच आहेत. त्यांनी समाजसेवेचा विडाच उचलला होता.



त्यांना समाजसेवेचे ध्येय पूर्णत्वास न्यायचे होते. ह्या ध्येयाकडे जात असतांना खायला मिळाले नाही किंवा संतान वाढली नाही तरी चालेल पण कर्तव्यापासून आपण परावृत्त होता कामा नये. आपला दृढनिश्चय टिकून राहावा, या दृष्टीने त्यांनी नारायणाच्या कृपेची अपेक्षा केली. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, न मिळो खावया न वाढो संतान। परि हा नारायण कृपा करो।।

नारायणाकडील तुकाराम महाराजांची मागणी आणि आपली मागणी यांची तुलना करून पाहिली तर कदाचित आपली आपणालाच लाज वाटू शकण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यांची मागणी जनकल्याणासाठी आहे तर आपली मागणी स्व कल्याणासाठी आहे, हे आपल्या लक्षात येते. इतरांसाठी मागण्यासाठी आपण प्रथम स्वतून बाहेर पडावे लागते. मी म्हणजेच स्व म्हणणाऱ्याला स्व तून बाहेर पडता येणे अवघड असते. मी मध्ये अडकलेला जीव नारायणावर खरी श्रध्दा नसतांनाही त्याच्याकडे मागण्या मात्र खूप करतो. त्याच्या ह्या मागण्या पूर्णतः सत्ता, संपत्ती, सौंदर्य आदी संपणाऱ्या बाबीशी संबंधित असतात. त्याने थोडेफार इतरांसाठी मागीतले तरी त्याचे मागणे इतरांसाठी घातक असते. कारण त्या फलाण्याचे वाटोळे व्हावे, त्याचे नुकसान व्हावे, त्याला अपयश यावे अशा प्रकारची त्याची मागणी असते. दुसऱ्यांच्या भल्यासाठी मागायला मन खूप मोठं लागतं. अशा मोठ्या मनाच्या माणसांची संख्या खूप कमी होत चालली आहे. मानवता हरवणाऱ्या लोकांच्या संख्येत आपला क्रमांक कधीच लागणार नाही, याकडे लक्ष असू द्यावे.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - |
| दि. ७ डिसेंबर २०२४ | ध्वज दिन |
| विक्रम संवत् २०८०-८१ | चंपाषष्ठी |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - मार्गशिर्ष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. षष्ठी (११.०५) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - धनिष्ठा (१६.४९) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - व्याघात (०८.४१) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - गर (२२.२७) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ** : नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन** : जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क** : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह** : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या** : लोकांशी संपर्क वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ** : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक** : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु** : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

**मकर** : व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.

**कुंभ** : सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे.

**मीन** : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल.

# महापालिका राबविणार १०० दिवसांची टीबीमुक्त भारत मोहीम

## सोलापुरात आजपासून मोहिमेस होणार प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

पंतप्रधान यांच्या महत्वकांक्षी योजनेनुसार संपूर्ण भारत देशातून सन २०२५ अखेर पर्यंत क्षयरोगाला हददपार करण्याचे उददीष्ट आहे. त्या अनुषंगाने राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत सोलापूर महापालिका १०० दिवसांची टीबीमुक्त भारत मोहीम राबविणार आहे.

त्या अनुषंगाने राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत देशातील ३४७ उच्च प्राथमिकता असलेल्या जिल्हयांमध्ये १०० दिवसीय क्षयरोग मोहिम, निक्षय शिबीरे आयोजीत करण्याची योजना केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने तयार केली आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील ३० जिल्हयांची निवड करण्यात आलेली आहे. यामध्ये सोलापूर मनपा कार्यक्षेत्राची निवड करण्यात आलेली आहे. केंद्रिय आरोग्यमंत्री यांच्या हस्ते दि.७ डिसेंबर रोजी या मोहिमेचा संपूर्ण देशामध्ये शुभारंभ करण्यात येणार आहे.



### या विविध घटकांची होणार क्षयरोगविषयक तपासणी

या अभियानामध्ये मनपाकडील नागरी आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रातील अतिजोखमीच्या गटामधील झोपडपटटीतील रहिवासी, ६० वर्षापेक्षा जास्त वयोगटातील नागरिक, मधुमेह बाधीत व्यक्ती, धुम्रपान करणाऱ्या व्यक्ती, बी. एम. आय. १८ पेक्षा कमी असलेल्या व्यक्ती, मागील ५ वर्षाचे क्षयरुग्ण व मागील २ वर्षाच्या क्षयरुग्णांच्या सान्नीध्यातील व्यक्ती, विडी कामगार, टॉवेल कामगार, ऊसतोड कामगार व साखर कारखान्यातील कामगार तसेच इतर औद्योगिक कारखान्यामध्ये काम करणारे कामगार आदींची क्षयरोगविषयक तपासणी करण्यात येणार आहे.

सोलापुरात या मोहिमेची सुरुवात दि.७ डिसेंबर रोजी साबळे वाघिरे प्रा. लि. योगेश्वर नगर, जुना विडी घरकूल हैद्राबाद रोड, सोलापूर येथे सकाळी १० वाजता आमदार विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते व मनपा आयुक्त, उपायुक्त, आरोग्याधिकारी, शहर क्षयरोग अधिकारी व शहर क्षयरोग केंद्राकडील कर्मचारी यांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे. या अभियानामध्ये जनभागीदारी महत्वाची असून त्यामध्ये लोकप्रतिनिधींचा सहभागही खूप मोलाचा आहे, असे महापालिकेच्या प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे.



# आयडियल उर्दू शाळेला आदर्श शाळा पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

नज़िर मुन्शी गौरव समितीच्या शैक्षणिक उपक्रमांतर्गत जागतिक उर्दू दिनापासून ते राष्ट्रीय उर्दू दिनापर्यंत सर्व प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील शाळेतील विद्यार्थ्यांसाठी उर्दू सुलेखन, इंग्रजी सुलेखन, आणि चीत्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आला होता. ज्यामध्ये सोलापूरच्या ६० शाळा आणि आठ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यामधे आयडियल उर्दू माध्यमिक शाळेचे सात विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला.

विविध स्पर्धेत जारा इरकल, वानिया शेख, रिदा गदवाल, इंझिला शेख, खतीजतुलकुबरा शेख, फरहान आलंद, शिफा सुभेदार या विद्यार्थ्यांनी जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकाविले. या व्यतिरिक्त शाळेला आदर्श पुरस्कार व चित्रकला स्पर्धेत अलमास पाटील जिल्ह्यात तिसरा, उर्दू लेखन रिदा शेख जिल्ह्यात दुसरा क्रमांक, अफिफा पठाण जिल्ह्यात तिसरा क्रमांक पटकविला. या विद्यार्थ्यांना रिजवान करजगी यांनी मार्गदर्शन केले. संस्थापक आबीद शेख, मुख्याध्यापक इरफान जनवाडकर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी शहर काझी मुफ्ती अमजद अली, समीउद्दीन शेख, अब्दुल बागबान, नजीर मुनशी, पर्यवेक्षक अथर परवेझ दफदार, पर्यवेक्षक दौलत शेख, पर्यवेक्षक निलुफर सय्यद, मुनाफ शेख व इक्बाल अन्सारी, डॉ. शफी चौबदार, मेहमूद जहागिरदार, जावेद काझी, इम्रान जमादार उपस्थित होते.

# सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत मिळणार जमीन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत दारिद्रय रेषेखालील भूमिहिन शेतमजूर अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांना २ एकर बागायत किंवा ४ एकर जिराईत जमीन १०० टक्के अनुदान स्वरुपात खरेदी करुन देण्यात येत असल्याची माहिती समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी दिली आहे.

सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी अनुसुचित जातीचा दारिद्र्य रेषेखालील व कुटुंब प्रमुखाचे वय ६० वर्षापेक्षा जास्त आहे. अशा कुटुंबातील ६० वर्षापेक्षा कमी वय असणाऱ्या कुटुंबा प्रमुखाच्या पत्नीला या योजनेचा लाभ घेता येईल. योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी विक्रिसाठी जमीन उपलब्ध असलेल्या गावाचा रहिवाशी असावा. प्रस्तुत योजनेंतर्गत ज्या गावात जमीन उपलब्ध आहे त्याच गावातील पात्र लाभार्थ्यांची प्रथम निवड करण्यात येईल व त्या गावातील लाभार्थी उपलब्ध नसल्यास लगतच्या इतर गावातील पात्र लाभार्थ्यांना जमीनीच्या उपलब्धतेनुसार चिठ्या टाकून जिल्हा समितीच्या मान्यतेने विहित कार्यपध्दती नुसार पारदर्शक पध्दतीने लाभ देण्यात येईल.

दारिद्र् रेषेखालील भूमीहिन अनुसुचित जाती तथा नवबौध्द प्रवर्गातील परित्यक्ता स्त्रिया , दारिद्र् रेषेखालील भूमीहिन अनुसुचित जाती तथा नवबौध्द विधवा स्त्रिया , अनुसुचित जाती /जमाती कायद्यांतर्गत जातीचे आत्याचारग्रस्त या घटकांना लाभार्थी निवडीमध्ये प्राधान्य देण्यात येईल. महसुल विभागाने गायरान व सिलिंगच्या जमिनीचे वाटप केलेल्या कुटुंबांना लाभ अनुज्ञेय नाही. या योजनेंतर्गत जमीनीचे वाटप झाल्यानंतर संबंधित लाभ धारकाने स्वता: जमीन कसणे आवश्यक आहे.

सदर जमीनीचे अन्य व्यक्तीस, संस्थेस हस्तांतरण व विक्री करता येणार नाही तसेच लीजवर भाडेपट्याने देता येणार नाही. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांना लाभ देण्यासाठी जिल्हा समाज कल्याण कार्यालयास जमीन खरेदी करावयाची आहे. जमीन कसण्यास अयोग्य, डोंगर उताराची, खडकाळ व नदी पात्रा जवळच्या क्षारयुक्त व क्षारपड जमीन असू नये. जमीन सलग असावी, शेत जमीन विना बोजा व कुळ नसलेली असावी तसेच जमीन कोठेही गहाण अथवा वादग्रस्त नसावी.जमीन विक्रीच्या अर्जावर शेतजमीन विक्री करणाऱ्या जमीन मालकाशिवाय संबंधिताच्या कुटुंबातील दोन व्यक्तींची जमीन विक्रीस संमतीबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे. जे जमीन मालक जिरायत जमीन कमाल ५ लाख रुपये प्रती एकर व बागायत जमीन कमाल ८ लाख रुपये प्रती एकर प्रमाणे विक्री करण्यास तयार आहेत अशा जमीन मालकांनी जमीनीच्या ७/१२ व आवश्यक कागदपत्रासह सहाय्यक आयुक्त् समाज कल्याण, कार्यालय, सोलापूर यांचेशी संपर्क साधावा.

# जी.एम. संस्थेच्या रक्तदान शिबिरात १५३ रक्तदात्यांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जी.एम मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने बुधवार पेठ मिलिंद नगर येथील जी.एम सभागृह येथे भव्य रक्तदान शिबिराचा आयोजन करून महामानवास अभिवादन करण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. या रक्तदान शिबिरामध्ये १५३ रक्तदात्यांनी रक्तदान करून महामानवास अभिवादन केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलित करून सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन अभिवादन करून रक्तदान शिबिरात सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून सेंट्रल बँकेचे अधिकारी सारनाथ वाघमारे, जी.एम संस्थेचे संस्थापक बाळासाहेब वाघमारे, उद्योजक पापासेठ दायमा, अशोक गौड, राजाभाऊ हौशेट्टी, शशिकांत गायकवाड, उत्सव अध्यक्ष हर्षवर्धन बाबरे उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दत्ता शिंदे, संजय पोळ, पप्पू लोंढे, पिंटु जेठिथोर, कैलास हटकर, आप्पासाहेब बागले, मुकेश सोनवणे, आकाश जमादार, सोहेल शिरसे, यशपाल वाघमारे, महेश बनसोडे, अभी क्षिरसागर, निहाल शिरसागर, गौरव पात्रे, रघु बनसोडे, संतोष कदम, रवी कांबळे, अनिकेत तळभंडारे, अभिजीत सरवदे, विजय शिंदे, राजू गोरीगल, निशांत वाघमारे आदी पदाधिकारी उपस्थित होते. हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी सोलापूर ब्लड सेंटर व मल्लिकार्जुन ब्लड सेंटर यांचे सहकार्य लाभले.



# जिल्हा सुभाषित पाठांतर स्पर्धेत ७० विद्यार्थ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

संस्कृत भारती पश्चिम महाराष्ट्र प्रांत सुभाषित अभियानांतर्गत सोलापुरामध्ये हरीभाई देवकरण प्रशाला येथे जिल्हा सुभाषित पाठांतर स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत सोलापूर शहर, तसेच मोहोळ आणि अक्कलकोट येथील शाळांमधून एकूण ७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. हे विद्यार्थी शालास्तरावरून निवड प्रक्रिया पार करून आलेले होते.

स्पर्धेत प्रत्येक इयत्तेतून प्रथम क्रमांक प्राप्त आठ विद्यार्थी प्रांत स्पर्धेसाठी निवडले गेले आहेत. विद्यार्थ्यांनी सुभाषितांचे शुद्ध उच्चारण आणि कण्ठस्थीकरण कौशल्य दर्शवून स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली. यावेळी परीक्षक म्हणून संस्कृत शिक्षिका गौरी कुलकर्णी व तेजश्री पगडीमल यांनी परीक्षण केले. स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित हरीभाई देवकरण प्रशालेच्या मुख्याध्यापिका तसेच पर्यवेक्षिका यांनी या प्रकारच्या स्पर्धा विद्यार्थ्यांच्या मानसिक विकासासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. स्पर्धेचे यशस्वी आयोजन सुभाषित अभियान प्रमुख पर्जन्या अंजुटगी यांनी जनपद संयोजक निखिल बडवे यांच्या मार्गदर्शनाखाली केले.



# एका सुखी जोडप्याच्या आयुष्यात प्रकाश नावाने उठलेले वादळ

**गुरुवार दिनांक ५ डिसेंबर रोजी अनघ नाट्य मंदिर सोलापूर या संस्थेने ती रात्र हे नाटक सादर केले. त्याचे लेखक होते हेमंत एदलाबादकर व दिग्दर्शक होत्या अश्विनी तडवळकर.**

---------------------

**नाट्य समीक्षण**
**विद्या काळे**



मानसिक गुंतागुंतीच्या विषयावरील हे नाटक. एक सुखी जोडपं राजन आणि रजनी यांच्या आयुष्यात प्रकाश नावाने उठलेले वादळ.शारीरिक सुखाच्या ऐन परमोच्च क्षणी प्रकाश सोड असे शब्द येतात. राजनच्या मनात संशय निर्माण होतो. प्रकाश कोण? तो रजनीला विचारतोही पण तिला असं कुणी आपल्या आयुष्यात आहे हे आठवतही नाही. राजन एका मानसोपचारतज्ज्ञाकडून यावर उपचार शोधतो. मानसोपचारतज्ज्ञ राजनच्या मदतीने एक प्लॉट रचतो. त्यासाठी अनेक भीषण प्रयोग करतो आणि प्रकाश कोण हे सत्य कळते हा नाटकाचा पूर्ण विषय.

पडदा उघडतो त्यावेळी राजन, रजनी कॅरम खेळत आहेत. घरातील कामं आटोपून रजनीला पार्टीला जायचंय ती तयार होते. इतक्यात स्वयंपाक घराच्या उघड्या खिडकीतून ए सहजकहात, पुष्पगुच्छ, चिठ्ठी येते प्रकाश कडून. ती घाबरते. राजन कामावर जाताना दार उघडण्याआधी काळजी घेण्यास सांगतो. जातो. एक व्हॅक्यूम क्लिनर वाला येतो तिला बोलण्यात गुंगवतो संधी साधून घरातील फोटो काढतो.इंपोर्टेड टॅपिंग मशीन बसवितो. अनेक वेळा धक्का तंत्राचा वापर करून रजनीकडून खरं काय घडलं हे जाणून घेतो. राजनचा संशय फिटतो.

मानवी वर्तन, भावना आणि मानसिक प्रक्रियांचा अभ्यास करून मानसशास्त्रज्ञ जीवनातील मानसिक प्रश्न किंवा आव्हाने सोडवतात. यात अनेक पद्धती वापरल्या जातात. इथे नाटककाराने प्रश्न सोडविण्याचा भयानक मार्ग अवलंबला आहे. सतत धक्कातंत्राचा वापर. कधी खिडकीतून फुले, पत्र देणे तर पहिल्या अंकाच्या शेवटी कपाट उघडल्यावर प्रेत अंगावर येणे. दुसऱ्या अंकात सतत आरडा ओरड, विकट हसणे यातून प्रश्न सुटेल का वाढेल? मानसोपचारतज्ज्ञा बद्दल विश्वास, आधार, धीर वाटेल का दहशत वाटेल? (ही एक थेरपी आहे हे मान्य) पण सामान्य माणसाला यांची भीती वाटेल असाही मेसेज जाऊ शकतो. या ऐवजी करून पेशंटच्या मनातील घटनेची सत्यता जाणून भीती घालवता येते हे दाखवता आले असते पण सतत धक्कातंत्र, आरडा ओरडा, विकट हसणं दाखवाव हे लेखकाला का वाटलं असावं असा प्रश्न निर्माण होतो. म्हणजे एक भीती काढण्यासाठी दुसरी आणखी इतकी भीतीदायक परिस्थिती निर्माण करणं आवश्यक आहे का? का वेगळं काही दाखविण्याचा हा हव्यास अट्टाहास आहे? यामुळे संवेदनशील मनाची सामान्य माणसे शास्त्र, तंत्र, आणि मनसोपचारतज्ज्ञ यांचा डोळसपणे विचार करून निर्णय घेतील? याकडे लक्ष द्यावेसे वाटते.

नेपथ्य-जयप्रकाश कुलकर्णी नेपथ्यात फ्रेंच विंडोचा वापर धक्कातंत्रासाठी केला गेला का? नाटकाचा काळ बघता हल्ली अशा विंडोजचा वापर होत नाही. वापर करायचाच आहे तर संपूर्ण नेपथ्य त्या पद्धतीने का लावले गेले नाही? इतकी प्रेतं सराईतपणे एकाच दिवसात कशी आणली जातात? वेगवेगळ्या दिवशी आणली असतील तर रजनीला राजनजवळ विषय काढावा वाटत नाही? अजब वाटतं.

प्रकाश योजना श्याम चव्हाण यांची. स्पॉटचा वापर योग्य पद्धतीने केला गेला. स्वयंपाकाच्या बाजूच्या खिडकीवरील, कपाटातील प्रेताच्या प्रसंगी, दार उघडल्यावर येणारा प्रकाश छान. योग्य वेळी योग्य प्रकाश योजना होती आणि कलाकार त्याचा वापर करत होते. संगीत जैद हसन, साई प्रसाद नाशिककर यांचे होते.

सुरवातीला कॅरम खेळताना हलकं फुलकं, भीतीदायक प्रसंगात ताण वाढवणारं योग्य. पण नीज माझ्या नौदलाला गाण्याचा शब्दांशिवाय म्यूझिक चार वापर केला पण का? हे स्पष्ट झाले नाही. रंगभूषा, वेशभूषा -प्रसंगानुरूप होती फारसा वाव नव्हता. रजनी आणि दिग्दर्शक अश्विनी तडवळकरनी भूमिकेला न्याय देण्याचा प्रयत्न केला अभिनयात सहजपणा होता. काही खटकलेल्या गोष्टी दुसऱ्या अंकात राजन आणि सेल्समन यांच्या झटापटी वेळी स्वतः मोकळी असताना पोलिसांना फोन करायला राजनला का सांगते? का लेखकाने तसे सूचित केले नाही म्हणून? फोन करण्याचा प्रयत्न करताना राजनवर चाकूचा वार होतो हे पाहून राजनला वाचवायला जाते असं दाखवणं आणखी सयुक्तिक वाटलं असतं, सेल्समनशी झटापट करताना मधेच खुर्ची टाकून परत त्याच्याच बाजूला अनेक वेळा जाते हे फार खटकत होत. अशा हालचाली बसवताना विचार करावा लागतो. बाकी नवऱ्यानं परक्या माणसासमोर बोलल्यावरचा राग, रुसवा तोंड फुगवून बोलण्यातून शोभला.अभिनयातील बारकावे टिपत भूमिका साकारली.

राजन, सागर पवार यांनी रजनीला साथ देत, तिचा रुसवा काढण्यासाठी केलेली धडपड, चलाख, संशयी नवरा छान उभा केला. सेल्समन आणि हवालदार दाखवण्यात श्रीनिवास देशपांडेनी अभिनयाची जुगलबंदी साधली. धूर्त, कावेबाज, सहजता दाखवत घसट करण्याची संधी बघणारा हवालदार उभा केला. सेल्समनच्या भूमिकेतील अजिजी, आपला सेल्समनशिपचा सराव, साधेपणाचा आव आणत आणलेले दडपण हे सगळं करताना मधेच तुम्ही व्यभिचारी नाहीत म्हणत विषयाकडे वळणं. रजनी कडून प्रकाश सोड या शब्द घटनेचा अर्थ कळल्यावर आपण सायकीऍट्रीस्ट आहोत हे सांगून कंपाऊंडर नं १,२सह सामान आटपून निघून जाणं या गोष्टी छान. पण सतत आरडा ओरड करत, विकट हसणं, हे डॉक्टरच्या दृष्टीने किती योग्य यांचा विचार स्वतः कलाकाराने व दिग्दर्शकाने करणे आवश्यक. भूमिकेचा बारकाईने अभ्यास करून, प्रसंगात वाहवत न जाता भडकपणा कमी करून भूमिका साकारता आली असती.

- **आजचे नाटक** : बेकरार
- **वेळ व ठिकाण** : सायं.७ वा. हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर
- **लेखक** : मुकुंद हिंगणे
- **दिग्दर्शक** : किरण लोंढे

# श्वानांच्या मृत्यू निषेधार्थ आज अक्कलकोटमध्ये कँडल मार्च

## राज्यभरातील प्राणी मित्र संघटना आक्रमक; २०-२५ युवकांचाही पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ६ डिसेंबर-**


अक्कलकोटमध्ये विष प्रयोगाद्वारे निरपराध श्वानांचा बळी गेल्याच्या निषेधार्थ राज्यभरातील प्राणी मित्र संघटना आता आक्रमक झाल्या आहेत. अक्कलकोटमध्ये प्राणी मित्र संघटनांना, पाल निमल फाउंडेशनचे मोठे पाठबळ मिळाल्याने अक्कलकोटवासीयही आक्रमक झाले आहेत. या घटनेचा निषेध करण्यासाठी व घटनेतील दोषींना अद्यापही ताब्यात घेतले नाही. तपासाला मोठी गती द्यावी, दोषींवर कारवाई करा, या मागणीसाठी शनिवारी दुपारी ४ वाजता अक्कलकोटमध्ये कँडल मार्च काढण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतची घोषणा त्यांनी समाज माध्यम द्वारे गुरुवारी केली.

### मुंबईची टीम आज पोहोचणार

घटना घडून चार-पाच दिवस झाले. तरी ज्या पद्धतीने प्रशासन आक्रमक किंवा गंभीर होणे गरजेचे होते. त्या पद्धतीने आक्रमक होताना पाहायला मिळत नाही. त्यामुळे या प्रकरणाची धग आणि तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे. शनिवारी आमची टीम येईल. तोपर्यंत यातील दोषींवर थेट कारवाई करावी. अन्यथा आमची सर्व कायदेशीर सल्लागार टीम अक्कलकोटला पोहोचेल आणि यात लक्ष घालेल.

**- रोशन पाठक, पाल निमल फाउंडेशन**

याची माहिती देताना पाल निमल फाउंडेशनचे रोशन पाठक म्हणाले, ही घटना २९ आणि ३० नोव्हेंबर रोजी घडली आहे. त्यानंतर दोन जणांकडून रीतसर फिर्याद देण्यात आली आहे. तरीही पोलीस तपास होत नाही. यावरून प्रशासन किती संवेदनशील आहे हे लक्षात येते. तसेच नगरपरिषद जबाबदारी झटकत आहे. मग या घटनेतील सत्य बाहेर कसे येणार, त्यामुळे आम्ही अक्कलकोटमधील श्वानप्रेमी, प्राणीप्रेमी तसेच पाल निमल फाउंडेशनच्या सर्व टीमने आता मोर्चा काढण्याचा निर्णय घेतलेला आहे. हा मोर्चा शनिवारी ७ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता निघणार आहे. खंडोबा मंदिरापासून या कँडल मार्चला सुरुवात होईल. त्यानंतर तो



बस स्टँड, विजय कामगार चौक, कारंजा चौक, फत्तेसिंह चौक, कमलाराजे चौक, ए-वन चौकमार्गे निघून त्याचा समारोप केला जाणार आहे. या आंदोलनामध्ये अक्कलकोटमधील विविध संवेदनशील सामाजिक संघटना सहभागी होणार आहेत. त्यांनी आम्हाला पाठिंबा दिलेला आहे. ही घटना अक्कलकोट स्वामींच्या नगरीत घडल्यानंतर आम्हाला राज्यभरातून स्वामींच्या भक्तांचेदेखील फोन येत आहेत. या घटनेबाबत ते तीव्र निषेध व्यक्त करत आहेत, असे ते म्हणाले.

घटना घडून पाच दिवस उलटले. अद्याप संशयित किंवा संबंधित आरोपीला पोलीस पकडले नाहीत.नगरपरिषद आम्ही हे केलेले नाही, असे म्हणते. उलट तेच तपासासाठी फिर्याद द्यायला तयार झाले आहेत. मग हे कोणी केले, याचे उत्तर कधी मिळणार? त्यासाठी आम्हाला आंदोलन करावे लागेल आणि याचा तपास करून दोषींवर कारवाई करण्यास भाग पाडावे लागेल. त्यासाठी गेल्या पाच-सहा दिवसांपासून शहरातील २० ते २५ युवक हे एकत्र येऊन या प्रकरणाचा छडा लावत आहेत. न्याय मिळेपर्यंत माघार नाही, असे अक्कलकोट येथील प्राणी मित्र संघटनेचे प्रमुख आतिश कटारे यांनी सांगितले.



# लावणी सम्राज्ञी प्रमिला सूर्यवंशी-लोदगेकर यांना भारत सरकारचा उस्ताद बिस्मिल्ला खान युवारत्न पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ६ डिसेंबर-**

महाराष्ट्राची लोककला लावणी या विभागातील नाट्य अकॅडमी नवी दिल्ली यांच्या उस्ताद बिस्मिल्ला खान युवारत्न पुरस्कार लावणी सम्राज्ञी प्रमिला सूर्यवंशी-लोदगेकर यांना प्रदान करण्यात आला.

डॉ. आंबेडकर आंतरराष्ट्रीय भवन जनपथ रोड दिल्ली येथे केंद्रीय सांस्कृतिक व पर्यटन मंत्री गजेंद्रसिंग शेखावत, सांस्कृतिक मंत्रालयाचे सचिव अरुणीश चावला, संगीत कला अकॅडमीच्या अध्यक्षा डॉ. संध्या पुरेचा, उपाध्यक्ष जोरावरसिंग जाधव यांच्या हस्ते भारत सरकारच्या नाट्यसंगीत अकॅडमीचा सन २०२२-२३ चा उस्ताद बिस्मिल्ला खान युवारत्न पुरस्कार लावणी सम्राज्ञी प्रमिला सूर्यवंशी-लोदगेकर यांना प्रदान करण्यात आला.तसेच या पुरस्काराबरोबर अन्य राज्यातील विविध क्षेत्रातील कलाकारांना भारत सरकारच्या वतीने एकूण ८२ पुरस्कार प्रदान करण्यात आले.

प्रमिला यांनी अकलूज राज्यस्तरीय लावणी स्पर्धेत सलग तीन वर्ष प्रथम क्रमांक मिळवून हॅट्रिक केली. अकलूज लावणी स्पर्धेचा मानाचा सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील लावणी कलावंत पुरस्कार याचबरोबर गोवा येथे भास्कर भूषण यांचा प्राईड ऑफ इंडिया तसेच महाराष्ट्र साहित्य परिषदेचा लावणी कलावंत पुरस्कार, अखिल भारतीय नाट्य परिषदेचाही मानाचा पुरस्कार मिळाला. याचबरोबर अनेक पुरस्काराने प्रमिला लोदगेकर यांना सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना भारत सरकारच्या वतीने चीन व दुबई येथे महाराष्ट्राची लोक कला या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्राची पारंपारिक लावणी सादर करण्याचा मान मिळाला होता. आजही लावणी प्रशिक्षक व नवीन कलावंतांना मार्गदर्शन करण्याचे काम त्या करीत आहेत. प्रमिला लोदगेकर यांना पुरस्कार प्रदान झाल्याबद्दल अकलूज लावणी स्पर्धेचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांनी त्यांचे विशेष कौतुक व अभिनंदन केले आहे.

# कमलादेवी मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या कुलपतींची देणगी




**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ६ डिसेंबर-**

करमाळा शहरातील स्थापत्यशास्त्रचा उत्कृष्ट नमुना असलेल्या कमलाभवानी मंदिराच्या जीर्णोद्धार कामाला पिंपरी, पुणे येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांनी पाच लाखांची देणगी दिली. डॉ. पाटील यांनी गेल्या आठवड्यात या मंदिराला भेट दिली. त्यावेळी मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या सुरू असलेल्या कामाची माहिती त्यांना ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी दिली होती. या कामासाठी देणगी देण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते. आश्वासनाची पूर्तता डॉ. पाटील यांनी आठ दिवसांतच केली.

डॉ. पाटील यांचे प्रतिनिधी मनोज नायडू यांनी पाच लाखांचा धनादेश कमलादेवी देवस्थान ट्रस्टच्या सुपूर्त केला. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष सोमनाथ चिवटे, सचिव अनिल पाटील व सर्व विश्वस्त उपस्थित होते. यावेळी नायडू यांनी डॉ. पाटील यांच्यावतीने ट्रस्टचा सत्कार स्वीकारला. डॉ. पाटील यांनी आपल्या भेटीत मंदिर परिसराची पाहणी केली. त्यावेळी ते म्हणाले, पुरातन मंदिरं ही आपला सांस्कृतिक, धार्मिक आणि स्थापत्यकलेच्या वारसा आहेत. त्याचे जतन व संवर्धन करणे ही सामाजिक जबाबदारी आहे. त्याच उद्देशाने या कामासाठी मदत केली. मंदिराचे पुरातन दगडी स्वरूपातील मूळ दर्शन भाविकांना मिळणार आहे, ही फार मोठी गोष्ट आहे. समाजातील घटकांनी अशा कामात योगदान देणे गरजेचे आहे.

### हेमाडपंथी मंदिर

कमलाभवानी मंदिर हेमाडपंथी शैलीतील असून मंदिरातील बांधकामावर दाक्षिणात्य बांधकाम शैलीचाही प्रभाव असल्याचे दिसते. या मंदिराचे प्रवेशद्वार दक्षिण पूर्व आणि उत्तर दिशेला आहे. या मंदिराची आखणी ४८ एकर परिसरात केली असून या मंदिराला एकूण ५ दरवाजे आहेत तर दारावर गोपुरे आहेत. श्रीकमला देवी मंदिर जतन व संवर्धन कामास गेल्या वर्षभरापासून सुरुवात करण्यात आली आहे.

यावेळी विश्वस्त सुशील राठोड, अ‍ॅड. शिरीषकुमार लोणकर, पुरोहित शाम पुराणीक पुजारी, बापू पुजारी, रोहित पुजारी, तुषार सोरटे, सहदेव सोरटे, सरपंच सिद्धेश्वर सोरटे, हनुमंत पवार, अ‍ॅड. बीभिषण सोरटे, शिवाजी पकाले ,खंडू थोरबोले, यात्रा कमिटीचे आकाश सोरटे, रत्नदीप पुजारी, शंभू पवार, महेश पवार, आदित्य पवार, मानकरी, सेवेकरी भक्तगण उपस्थित होते.

# बार्शीतील सोजर इंग्लिश स्कूलमध्ये हिवाळी क्रीडा स्पर्धा सुरु

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ५ डिसेंबर**

येथील यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित सोजर इंग्लिश स्कूल प्राथमिक विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या हिवाळी स्पर्धांचे उद्घाटन श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाचे क्रीडा प्रशिक्षक प्रा. गणेश नाकाडे यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी स्पर्धेतील चारही गटाच्या संघनायकांनी बँड विभागाचे तुषार गदगी आणि सोनाली नष्टे यांच्या सहकार्याने सुंदर पदलालित्याद्वारे तालबद्ध संचलन करताना सलामी देत मुख्य अतिथींना कार्यक्रमस्थळी पाचारण केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते खेळ साहित्याचे पूजन करुन क्रीडा ज्योत प्रज्वलित करण्यात आली. तद्नंतर प्रमुख पाहुणे आणि सर्व संघनायक यांच्या हस्ते मैदानावार क्रीडा ज्योतीची परिक्रमा करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापिका रिटा नेटके उपस्थित होत्या.पाहुण्यांची ओळख शिक्षक प्रसाद सहस्त्रबुद्धे यांनी करुन दिली तर मुख्याध्यापिका नेटके आणि सहशिक्षक तुषार गदगी यांच्या हस्ते नाकाडे यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांचा शारीरिक, बौद्धिक विकास व्हावा या हेतूने हिवाळी क्रीडा स्पर्धा होणार असून यात धावणे, अडथळ्याची शर्यत, बास्केट बॉल, बॉल पासिंग, थ्रो बॉल, क्रिकेट यासह अनेकविध मैदानी खेळांचा समावेश करण्यात आला असून उद्घाटनासमयी प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत धावण्याच्या शर्यतीचा शुभारंभ करण्यात आला. सूत्रसंचालन शिक्षिका अस्मा मुलाणी आणि अमृता मुनोत यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकामी क्रीडा विभाग प्रमुख किरण जगताप आणि प्रसाद सहस्त्रबुद्धे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या सर्व शिक्षक बंधू-भगिनी आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# नागनाथ जळकोटे यांना आदर्श सेवानिवृत्त शिक्षक पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ६ डिसेंबर-**

येथील दत्तात्रय अणदूरकर सामाजिक संस्थेचा आदर्श सेवानिवृत्त शिक्षक पुरस्कार या वर्षी केशेगाव येथील सेवानिवृत्त शिक्षक नागनाथ जळकोटे यांना जाहीर झाला असून रविवारी ८ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता केशेगाव (ता. तुळजापूर) येथे मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना प्रदान करण्यात येणार आहे. शिक्षणप्रेमी नागरिक, बंधू-भगिनींनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन संस्थाध्यक्ष पत्रकार श्रीकांत अणदूरकर यांनी केले आहे.



दत्तात्रय अणदूरकर सामाजिक संस्थेच्या वतीने दरवर्षी हाडाचे शिक्षक दत्तात्रय अणदूरकर गुरुजी यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार दिला जातो. यंदाचे हे ८ वे वर्ष असून शिक्षक हा कधीच सेवानिवृत्त होत नसतो. त्याच्यातील ऊर्जा ही सेवानिवृत्तीनंतरही समाजाच्या उपयोगी पडावी, प्रत्येक सेवानिवृत्त शिक्षकाने आपण सेवानिवृत्त झाल्यानंतरही विद्यार्थी घडवण्याचे पवित्र कार्य वेगवेगळ्या प्रकारे तसेच पुढे चालू ठेवावे, जेणेकरून समाजातील विद्यार्थी घडतील या उदात्त हेतूने संस्था प्रतिवर्षी हा पुरस्कार सेवानिवृत्त शिक्षकाला प्रदान करते. यंदाचा पुरस्कार कडक शिस्तीचे शिक्षक नागनाथ जळकोटे यांना देण्यात येणार आहे.

# ऊस वाहतूक ट्रॅक्टरमधील गाण्यांचा आवाज होईना सहन

## बंदी घालण्याची विद्यार्थी, पालकांसह नागरिकांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ६ डिसेंबर-**

महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात सध्या उसाचा गळीत हंगाम जोरात सुरू आहे. ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरमध्ये कर्णकर्कश आवाजात गाणी लावली जात आहेत. या गाण्याचा आवाज त्रासदायक ठरत असून, यावर तात्काळ कारवाई करुन बंदी घालण्याची मागणी विद्यार्थी, पालक, नागरिक करत आहेत.



पिलीव येथून चांदापुरी, सदाशिवनगर, अकलूज, जरंडेश्वर तसेच राजेवाडी येथील श्री श्री सद्गुरु साखर कारखान्याला मोठ्या प्रमाणावर ट्रॅक्टरने वाहतूक केली जाते. यामध्ये सदरचे चालक पुढे-मागे न पाहता टेपचा कर्णकर्कश आवाज सोडतात. यामुळे अपघाताला आमंत्रणच ते देत आहेत. त्यातच सध्या बसस्थानकावरील शाळेत शौचालय व इतर बांधकाम सुरु असल्याने पाचवी ते बारावीपर्यंतचे वर्ग पेट्रोल पंपावरील शाळेत भरतात. यामुळे सकाळी साडेसातपासून संध्याकाळी पाचवाजेपर्यंत या रस्त्यावर विद्यार्थी व इतर दुचाकी, चारचाकी वाहनांची प्रचंड वर्दळ असते. सकाळी साडेअकरा वाजता तर आठवी ते बारावीपर्यंतचे वर्ग सुटतात व पाचवी ते सातवीचे वर्ग भरतात. यावेळीसुद्धा ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांची प्रचंड वर्दळ असते. तसेच टेपच्या जोरात आवाजामुळे विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. त्यातच बचेरी रस्त्यावर जवाहरलाल शेतकी विद्यालय आहे. या रस्त्यावरुनसुद्धा विद्यार्थी व इतर नागरिकांची मोठी वर्दळ असते. पण या ऊस वाहतूक करणाऱ्या बेशिस्त वाहनचालकांना वेळीच वठणीवर आणणे आवश्यक आहे. सद्गुरु कारखान्याने याबाबत पेट्रोल पंपावरील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय ते बचेरी रस्त्यावरील जवाहरलाल शेतकी विद्यालयापर्यंत ऊस नेणारी वाहने तसेच कारखान्याकडून येणारी मोकळी वाहनांनी टेप सुरु ठेवू नये तसेच वाहने सावकाश चालविण्याची ताकीद द्यावी, अशी मागणी होत आहे. पिलीव येथील पोलीस प्रशासनाने सदरच्या वाहनधारकांना टेपबाबत तसेच शाळा परिसरातून वाहने सावकाश चालविण्याच्या सूचना द्याव्यात सूचनांचे पालन न करणाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी पालक, विद्यार्थी यांच्यामधून होत आहे.

## संक्षिप्त वृत्त



### श्री जगद्गुरू पंचाचार्य प्रशालेत बीटस्तरीय क्रीडा स्पर्धेला प्रारंभ

**अक्कलकोट, दि. ६ डिसेंबर-**

गौडगाव बु। येथील श्री गुरु सिद्धमल्लेश्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगद्गुरु पंचाचार्य प्रशालेच्या क्रीडांगणावर अक्कलकोट बीटस्तरीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबळे यांच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलन करून करण्यात आले. प्रथमतः क्रीडांगणाच पूजन रोटरी क्लब सोलापूरचे असिस्टंट गव्हर्नर जितेंद्रकुमार जाजू, केंद्रप्रमुख सुरेश शटगार यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी होते. प्रास्ताविक व स्वागत केंद्रप्रमुख भीमाशंकर धडके यांनी केले. यावेळी खो-खो, कबड्डी, लंगडी, धावणे आदी स्पर्धांचे संघ सहभागी झाले होते.श्री परमेश्वर व्हसुरे यांनी क्रीडा शपथाची सामुदायिकरित्या वाचन केले. यावेळी पर्यवेक्षक लाडप्पा शिंदे, सुभाष घोडके, अमरेश ताराके, पोपट सोनकांबळे, तुकाराम जाधव, श्रीशैल सावळतोट तर पंच म्हणून सुतार शिंगे, मोसलगी कलबुर्गी, सोनकर, ज्योती पाटील आदींनी काम पाहिले. सूत्रसंचालन शिवपुत्र चोळळे यांनी केले तर लक्ष्मीपुत्र देशेट्टी यांनी आभार मानले.



### टेंभुर्णी पोलिस ठाण्यात शहिदांना अभिवादन; ७१ जणांचे रक्तदान

**टेंभुर्णी, दि. ६ डिसेंबर-**

टेंभुर्णी पोलिस ठाण्यात २६/११ शहीद दिनानिमित्त घेतलेल्या रक्तदान शिबिरात ७१ जणांनी रक्तदान केले. प्रारंभी पोनि दीपक पाटील यांनी शहीद जवानांच्या प्रतिमांना पुष्पचक्र अर्पण करुन आदरांजली वाहिली. यावेळी रावसाहेब देशमुख, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप, प्रहार संघटनेचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ मस्के-पाटील, शिवसेनेचे शहर प्रमुख सुरेश लोंढे, बाळासाहेब ढगे, आरपीआयचे जयवंत पोळ, अ‍ॅड. संतोष कानडे, एपीआय गिरीश जोग, अजित मोरे, कुलदीप सोनटक्के, पोलिस उपनिरीक्षक सुरवसे यांच्यासह पोलिस कर्मचारी, विविध संस्था, संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.



### पोलिस क्रीडा स्पर्धेत चंद्रकांत सुतार यांना वेटलिफ्टिंगमध्ये सुवर्णपदक

**मंद्रुप, दि. ६ डिसेंबर-**

कोल्हापूर येथे कोल्हापूर परिक्षेत्र पोलीस क्रीडा स्पर्धेत वेटलिफ्टिंग १६० किलोग्रॅम व पॉवर लिफ्टिंग प्रकार ३७० किलोग्रॅम या क्रीड स्पर्धेत मंद्रुपचे पोलीस चंद्रकांत सुतार यांनी सुवर्णपदक पटकाविले. पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपअधीक्षक संकेत देवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुतार यांनी पोलीस क्रीडा स्पर्धेत सहधाग घेतला होता. यावेळी सुतार यांनी दोन सुवर्णपदक पटकाविले. मंद्रुप पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांच्या हस्ते मंद्रुप पोलीस ठाण्यात त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पोलीस उपनिरीक्षक राजू डांगे, सचिन मसलखांब, दिनेश पवार, अंकुश मोरे, सागर चव्हाण, कृष्णा पवार, संदिप काळे, प्रमोद असादे आदी उपस्थित होते.



### सांगोला नगरपरिषदेतर्फे जागतिक दिव्यांग दिन उत्साहात साजरा

**सांगोला, दि. ६ डिसेंबर-**

सांगोला नगरपरिषदेमार्फत जागतिक दिव्यांग दिनानिमित्त पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृह येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सांगोला नगरपरिषदेतर्फे शहरातील १४० दिव्यांगांना सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा दुसरा हफ्ता प्रत्येकी ६ हजार याप्रमाणे एकूण ८ लाख ४० हजार रुपये धनादेशाचे वाटप डॉ. निकिता देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. निकिता देशमुख, नंदकुमार दुपडे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी रमेश जाधव, नगरपरिषद अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन कार्यालयीन अधिक्षक सचिन पाडे यांनी केले.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## श्री महादेव विद्या मंदिरात डॉ. बाबासाहेबांना अभिवादन




**अक्कलकोट :** तालुक्यातील बोरगाव येथील श्री महादेव महादेव विद्या मंदिर प्रशालेत ६८ वा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्रभाकर बंदिछोडे होते. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून सामूहिक अभिवादन करण्यात आले. यावेळी विजयकुमार चव्हाण यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली. या कार्यक्रमास मुख्याध्यापक प्रभाकर बंदिछोडे, पांडुरंग पवार, रशिद पठाण, शाम देशेट्टी, संजीवकुमार हत्तरके, विजयकुमार चव्हाण, अमोल फुलारी, आनंद सुतके, अनिल देशेट्टी, गुरूनाथ धनशेट्टी, दत्तात्रय मोरे, दरेप्पा बिराजदार यांच्यासह प्रशालेतील विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन विजयकुमार चव्हाण यांनी केले तर आभार रशीद पठाण यांनी मानले.

# महामानवाच्या अभिवादनासाठी लोटला भीमसागर

### जिल्ह्यात ठिकठिकाणी बुद्धवंदना, व्याख्याने, विविध उपक्रमांनी वाहिली आदरांजली; शाळा, महाविद्यालये, विविध संस्था, संघटनांच्यावतीनेही अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

**घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जिल्ह्यात विविध ठिकाणी व्याख्याने, बुद्धवंदना यासह विविध उपक्रम राबविण्यात आले. शाळा, महाविद्यालये, विविध संस्था, संघटनांनी आदरांजली वाहून अभिवादन केले. यासाठी पहाटेपासूनच भीमसागर लोटला होता.**

## ⏩ डॉ. बाबासाहेबांना अभिवादन




## पंढरपूर अधिवक्ता संघ

**पंढरपूर, दि.६ डिसेंबर-**

पंढरपूर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पंढरपूर अधिवक्ता संघाच्या वतीने अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठविधीज्ञ एम. आर. देशमुख होते. याप्रसंगी पंढरपूर अधिवक्ता संघाचे अध्यक्ष राजेश चौगुले यांनी बाबासाहेबांबद्दल पुढील माहिती सांगितलीशिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा. हा मूलमंत्र बहुजनांना ठणकावून सांगणारे तसेच शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे, ते जो कोणी प्राशन करेल तो अन्यायाविरुद्ध गुरगूरल्याशिवाय राहणार नाही. हे तत्व सर्वसामान्य जनतेच्या मनात बिंबवणारे. समस्त पददलितांचे भाग्यविधाते व झुंजार नेते, ज्ञानाचे अथांग महासागर असे व्यक्तिमत्व असणारे, जगभरातील करोडो लोकांच्या मनावर ज्यांनी आपल्या विचाराने, कार्याने, कतृत्वाने, बुध्दीने आणि ज्ञानाने आधिराज्य प्रस्थापित केले अशा युगपुरुष, बोधिसत्व, भारतरत्न, विश्वरत्न, महामानव, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार बॅरिस्टर, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांना अभिवादन केले. याप्रसंगी पंढरपूर अधिवक्ता संघातील जेष्ठविधीज्ञ एडवोकेट एस आर कुलकर्णी यांनी संविधानाचे महत्त्व सांगून अभिवादन केले. याप्रसंगी पंढरपूर अधिवक्ता संघातील उपाध्यक्ष अॅड महेश कसबे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खडतर परिश्रम घेऊन समाजातील दिन दलित, तसेच महिला व समाजातील सर्व घटकांना न्याय व समानतेची वागणूक मिळण्यासाठी वेगवेगळे कायदे केले व समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी खूप मोठे असे योगदान दिले असल्याचे सांगितले.



## कल्याणशेट्टी महाविद्यालय, अक्कलकोट

**अक्कलकोट, दि.६ डिसेंबर-**

अक्कलकोट : महर्षी विवेकानंद समाज कल्याण संस्थेच्या मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, इतिहास अभ्यास मंडळ व राज्यशास्त्र अभ्यास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी होते. यावेळी इतिहास अभ्यासक प्रा. नामदेवराव गरड, प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, प्रा. मधुबाला लोणारी, प्रा. राजशेखर पवार उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. आर. लोखंडे यांनी केले. सूत्रसंचलन प्रा. शितल झिंगाडे यांनी केले तर आभार प्रा. राजशेखर पवार यांनी मानले. कार्यक्रमास प्रा. मनीषा शिंदे, प्रा. शितल फुटाणे, प्रा. जनाबाई चौधरी उपस्थित होते.



## नगरपरिषद, पंढरपूर

पंढरपूर : पंढरपूर नगर परिषदेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पंढरपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ प्रशांत जाधव यांच्या हस्ते पूर्णकृती पुतळ्याचे पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी उपमुख्याधिकारी अँड.सुनील वाळुजकर आरोग्य अधिकारी शरद वाघमारे, नागनाथ तोडकर, विजय शहाणे हे उपस्थित होते.

## डॉ. आंबेडकर जयंती उत्सव मंडळ, पंढरपूर

येथील मध्यवर्ती डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळाचे वतीने आयोजित केलेल्या अभिवादन सभेमध्ये पंढरपूर विधानसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार अनिल सावंत यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन केले. यावेळेस पंढरपुरातील मध्यवर्तीचे अध्यक्ष अमित कसबे,सुनील सर्वगोड, जितेंद्र बनसोडे ,बाळासाहेब कसबे , डी राज सर्वगोड, रवी सर्वगोड, युवा नेते संकेत ढवळे, वकील संघाचे अध्यक्ष महेश कसबे, समाधान लोखंडे, पत्रकार अभिराज उबाळे तसेच सर्व भीमसैनिक यावेळेस उपस्थित होते.

## महाराष्ट्र नवनिर्माण सेना

विश्वरत्न परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांनी पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन करून पुष्पहार अर्पण केला. यावेळी गणेश पिंपळनेरकर, बाबा चव्हाण, सुरज राठी, विनायक वनारे, सचिन बंदपट्टे,विकी चव्हाण,रवी शिंदे, प्रदीप खिलारे, रवी खिलारे, मच्छिंद्र वाघमारे इत्यादी उपस्थित होते.



## महामानव बहुउद्देशीय सामाजिक संस्था, गुळपोळी

**बार्शी :** तालुक्यातील गुळपोळी येथे महामानव बहुउद्देशीय सामाजिक संस्थेकडून विश्वरत्न, क्रांतीसूर्य, महामानव, बोधिसत्व, भारतरत्न, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. महामानव बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भैरवनाथ चौधरी यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालण्यात आला. महामानवाचे विचार घरोघरी पोहोचले पाहिजे, आपल्याला चांगली राज्यघटना दिली आहे. जगात सर्वांत श्रेष्ठ राज्यघटना देशाला दिली. महामानवाचे विचार आत्मसात करण्याची गरज आहे. डॉ. बाबासाहेबांचे विचार तळागळात पोहोचले पाहिजे, शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा अशा संदेश दिला. उपाशी राहून समाजासाठी झटले. डॉ. बाबासाहेबांनी सर्व घटकांसाठी कार्य केले. महिलांसाठी कार्य केले. गुलामाला गुलामगिरीची जाणिव करुन दिली, असे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भैरवनाथ चौधरी यांनी सांगितले. यावेळी किरण खुरंगळे, रंजना खुरंगळे, सुभद्रा चौधरी, दीपाली चौधरी, आधिरा चौधरी, स्वाती गायकवाड, भैरवनाथ चौधरी, अमित काळे व संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन किरण खुरंगळे यांनी केले तर आभार दीपाली चौधरी यांनी मानले.



## आर्या पब्लिक स्कूल, माढा

**माढा :** विठ्ठल प्रतिष्ठान निमगाव (टें) संचलित, आर्या पब्लिक स्कूल, माढा या सीबीएसई मान्यताप्राप्त स्कूलमध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त बुद्ध वंदना घेऊन आदरांजली वाहण्यात आली. प्रारंभी प्राचार्य सागर थोरात यांच्या हस्ते बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी आदिती साखळे हिने बुद्ध वंदना सादर केली. काव्या रोकडे, आदिती साखळे, कार्तिकी वाळके या विद्यार्थ्यांसह प्रा. दत्तात्रय चव्हाण, प्रा. कृष्णा जठार, प्रा. प्रियंका काशीद, प्राचार्य सागर थोरात यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रा. मनोज नाटिळक, प्रा. जयदेव गायकवाड, प्रा. शुभम पुरवत, प्रा. वंदना गोसावी, प्रा. संध्या सरडे, प्रा. सारिका यादव, प्रा. मेघा भांगे, प्रा. माधुरी पाटील, प्रा. संजीवनी ढोबळे, प्रा. रागिणी शिंदे, प्रा. तेजस्विनी कवठे उपस्थित होते. सूत्रसंचालन मानसी नाईकवडे व तेजस्विनी चव्हाण यांनी केले व आभार श्रेया तांबिले या विद्यार्थिनीने मानले.

## जिल्हा परिषद मराठी शाळा, वागदरी



**अक्कलकोट :** वागदरी (ता. अक्कलकोट) येथील जि. प. प्राथमिक मराठी शाळेत महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी शाम बाबर होते. प्रतिमेचे पूजन शाम बनसोडे यांनी केले. मुख्याध्यापिका रेखा सोनकवडे, महादेव सोनकवडे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी अनुसया कलशेट्टी, मनिषा कुनाळे, अर्चना गिरी यांच्यासह माजी विद्यार्थी अभिवादन करण्यासाठी उपस्थित होते. बागवान यांनी आभार मानले.



## श्री रामलिंगेश्वर शिक्षण संकुल, तीर्थ

**सोलापूर :** विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त श्री रामलिंगेश्वर शिक्षण संकुलातर्फे अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील खडतर प्रसंगाचे व त्यांनी केलेल्या संघर्षाचे प्रसंग विषद करून आज खऱ्या अर्थाने महामानव डॉ. बाबासाहेब यांच्या वैचारिक तत्त्वावर आधारलेल्या विचारसरणीची गरज असल्याचे प्रतिपादन केले. आज वाचन संस्कृती लोप पावत चालली असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे घर ग्रंथालय होते. याची जाणीव समाजाने ठेऊन वाचनाची आवड रुजावण्याची गरज आहे. यावेळी अमोल तिकुटे, माजी नगरसेवक राजकुमार हंचाटे, अविनाश शिंदे, दिनेश गायकवाड उपस्थित होते.



## श्री. राजेश्वर विद्यालय, राजुरी

**करमाळा :** भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राजुरी येथील श्री. राजेश्वर विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. डॉ. आंबेडकर हे समाजसुधारक, अर्थतज्ज्ञ, विचारवंत, राजकारणी आणि स्वतंत्र भारताचे पहिले कायदा मंत्री होते. यावेळी मुख्याध्यापक अनिल झोळ, जगन्नाथ अवघडे, रत्नाकर तळेकर, वैशाली कोल्हे, मारुती साखरे, अमोल कोल्हे, धनंजय साखरे, विजय गरड आणि गंगाराम वाघमोडे आदी मान्यवर उपस्थित होते.



## श्री शंकरलिंग प्रशाला, वळसंग

**वळसंग :** वळसंग ( ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन संपन्न झाला. याप्रसंगी सर्वप्रथम विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य वीरेश थळंगे व पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांच्या हस्ते करून त्यांना प्रशालेतर्फे विनम्र अभिवादन करण्यात आले. पूजनानंतर प्रशालेतील काही विद्यार्थी व विद्यार्थिनींनी आपल्या भाषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी माहिती सांगितली तर काहींनी त्यांच्या जीवनावर आधारित भीमगीतांचे मराठी व कन्नड भाषेत वैयक्तिक व सामुहिक गीत गायन केले. शिक्षक मल्लिनाथ गौडगाव यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी उत्कृष्ट भाषण व गीत गायन केलेल्या विद्यार्थ्यांना लेखन साहित्य देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमासाठी सिध्दाराम भैरामडगी, बाळकृष्ण गुंड, नीलकंठ कवटगी, श्रीमंत भोसले, सिद्धारूढ हिरेमठ, बसवराज दुधगी, विरेश थळंगे, प्रा. संतोष शिंदे, गंगाधर बिराजदार, संतोष कस्तुरे, विजय प्याटी, शिवराज अष्टगी, अजय माणकोजी, प्रा. शरणय्या मसुती, विजयालक्ष्मी थळंगे, गंगा बागलकोटी, रुपाली कलशेट्टी, प्रा. प्रतिभा तांडुरे, शकुंतला राठोड, लिपिका राजश्री दुधगी, लिपिक गौरीशंकर चनशेट्टी, कर्मचारी विनोद दुधगी आदींचे सहकार्य लाभले.सूत्रसंचालन संजयकुमार धनशेट्टी यांनी केले तर आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार यांनी मानले.




## स्वेरी, पंढरपूर

**पंढरपूर :** येथील स्वेरी महाविद्यालयात महामानव व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या 'महापरिनिर्वाण दिना' निमित्त त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. यशपाल खेडकर, प्रा. अविनाश मोटे, डॉ. ए.पी. केने, डॉ. संदीप वांगीकर, डॉ. एस.बी. भोसले, डॉ. एस. पी. पवार, डॉ. डी. ए. तंबोळी, डॉ. आर. एन. हरिदास, डॉ. एस. एस. वांगीकर, डॉ. डी. एस. चौधरी, प्रा. मनसब शेख, प्रा. जी. के. कोष्टी, प्रा. पी. बी. आसबे, प्रा. जे. एस. हल्लूर, मिलिंद कोकणे, एस. डी. मोरे, अमोल चंदनशिवे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



## बालसभा घेऊन बार्शीतील विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांना वाहिली आदरांजली

**बार्शी :** बार्शी येथील सुयश विद्यालयामध्ये महापरिनिर्वाण दिनानिमित्त तिसरी, चौथी, सहावीच्या विद्यार्थ्यांनी बालसभा घेऊन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आदरांजली वाहिली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दहावीचे विद्यार्थी कृतिका यादव, श्रुती खाडे, ओम आटोळे व हर्षवर्धन, प्रेम चाटे, संस्थापक नलवडे, मार्गदर्शिका प्रतिभा नलवडे, मुख्याध्यापक सागर मंडलिक उपस्थित होते. अध्यक्षस्थानी संजना तोंडले, सोहम साखरे, मिताली गुडे व उपाध्यक्ष संस्कृती बसवंत होते. सूत्रसंचालन श्रुती साठे, वैभवी भोंग आणि स्वागता जगताप यांनी केले. आभार प्रदर्शन अरोही महाडिक या विद्यार्थिनीने अतिशय उत्कृष्टपणे केले. चौथीच्या विद्यार्थ्यांची हस्ताक्षर, सहावीसाठी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. यशवंत विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. बालसभा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संदीप मुंढे, जयराम अडगळे, पर्यवेक्षिका गवळी, मोरे, जगताप यांनी परिश्रम घेतले.

## ग्रामपंचायत, वैराग



**वैराग :** वैराग नगरपंचायत कार्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेचे पूजन उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर व सामाजिक कार्यकर्ते चांगदेव भालशंकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष संगमेश्वर डोळसे, सभापती अजय काळोखे, सतीश सुरवसे, नगरसेवक पटू लांडगे, नागनाथ वाघ, तसेच सामाजिक कार्यकर्ते महमद अनसर, माजी ग्रा. पं. सदस्य किशोर सोनवणे, कर निर्धारण अधिकारी प्रियांका चव्हाण, मनिषा कदम, बांधकाम अभियंता योगीराज खुस्पे, किरण वाघमारे, सचिन पानबुडे, लेखापरीक्षक ध्रुव साबळे उपस्थित होते.




## वखारिया विद्यालय, उपळे दुमाला

**बार्शी :** तालुक्यातील उपळे दुमाला येथील श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित वखारिया विद्यालयात ६ डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा स्मृतिदिन महापरिनिर्वाहण दिन म्हणून साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. शंकर शिंदे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख तवले, सहाय्यक राऊत, रोहिणी डोईफोडे यांनी केले. यावेळी आर. आर. लंकेश्वर, एस. ए. सोनके, व्ही. व्ही. शिंदे, ए. आर. वैद्य, एन. एन. महाले, एम. एस. जगदाळे, वाघ, सुरवसे, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# धाराशिवात 'महामानवास' महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ डिसेंबर -**

भारतरत्न, बोधिसत्व, महामानव बाबासाहेब डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अनाथ व गरीब विद्यार्थ्यांना वही, पेन व पुस्तकांचे संकलन, रक्तदान करुन भिमाच्या लेकरांनी व भीम अनुयायांनी शहरातील पूर्णाकृती पुतळ्यास दि.६ डिसेंबर रोजी अभिवादन केले.

धाराशिव शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हाध्यक्षा राजश्री कदम यांच्या उपस्थितीत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर डॉ आंबेडकर यांना महासभेच्यावतीने सामूहिक त्रिशरण, पंचशील गाथा कथन व अभिवादन केले. तर समता सैनिक दलाच्यावतीने सैनिक दलाचे असिस्टंट युनिट लीडर सचिन दिलपाक यांच्या मार्गदर्शनाखाली सलामी देत मानवंदना देण्यात आली. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे धाराशिव तालुकाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, जिल्हा संस्कार उपाध्यक्ष विजय बनसोडे, सपोनि घाडगे, दादासाहेब जेटीथोर, सिद्धार्थ बनसोडे, धनंजय वाघमारे, रणजीत गायकवाड, अतुल लष्करे, स्वप्नील शिंगाडे, मीनाताई लगाडे, डॉ सुनील माळाळे, सुनील वाघमारे, डॉ शिवाजी ओमन, सोमनाथ गायकवाड, स्वामीराव चंदनशिवे, बाबासाहेब कांबळे, राजाराम बनसोडे, विजयमाला धावारे, राकेश जानराव, मुकेश मोटे, बाबासाहेब जानराव, किरण बिडवाल, आनंद गाडे, सचिन गायकवाड, शीलाताई चंदनशिवे, सुरेखा सरवदे, जयश्री चव्हाण, मनोरमा काटे, स्वराज जानराव, सुगत सोनवणे, नितीन लांडगे, लक्ष्मण सोनवणे, अमोल लांडगे, प्रतीक चंदनशिवे, सौरभ शिंगाडे, यशवंत शिंगाडे, रोहिणी बर्वे, विद्यानंद वाघमारे, दत्तात्रय लोखंडे आदींसह भीम आणि आई सकाळपासूनच अभिवादनासाठी पुतळा स्थळी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**सामाजिक समरसता मंचच्यावतीने रक्तदानाने अभिवादन :** सामाजिक समरसता मंचच्यावतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सामाजिक समरसता मंचच्यावतीने डॉ आंबेडकर पुतळा चौकात रक्तदान शिबिर घेण्यात आले. या रक्त संकलन सह्याद्री ब्लड बँकेच्यावतीने करण्यात आले. यावेळी सचिन सुर्यवंशी, प्रा सोमनाथ लांडगे, राजेंद्र कापसे, अभिजीत लष्करे, गणेश वाघमारे, सिद्धार्थ बनसोडे, सह्याद्री ब्लड बँकेचे रक्त संकलन प्रमुख शशिकांत करंजकर, अल्केश बोरेगावकर, महेश तोडकरी, डिन मुलकू नाईक, साक्षी वाळके, शुभांगी वाघमारे आदी उपस्थित होते.

यावेळी ५० रक्तदात्यांनी रक्तदान करून डॉ आंबेडकर यांना अभिवादन केले.

**रांगोळीतून चित्र साकारुन अनोखे अभिवादन :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना रमाई फाउंडेशनच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विविध हृदयस्पर्शी व मोहक चित्रे रांगोळीतून साकारून अनोखे अभिवादन करण्यात आले. येरमाळा येथील मूकबधिर असलेले कलाकार रविशंकर बारस्कर यांनी ही कलाकृती १२.१५ फुट आकारात साकारली. या रांगोळीच्या माध्यमातून लोकशाहीला घातक असणाऱ्या दोन गोष्टी म्हणजे हुकूमशाही आणि माणसा माणसांमध्ये भेद मानणारी संस्कृती हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अतिशय महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला.

रमाई फाउंडेशनचे अध्यक्ष व माजी नगरसेवक पृथ्वीराज चिलवंत यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. हे रांगोळीतील साकारलेले शिल्प पाहण्यासाठी दिवसभर भीम अनुयायांनी गर्दी केली होती.



## क्राईम वृत्त...



### बोरमन शाळेत महापरिनिर्वाण दिनानिमित्त व्याख्यान

**जळकोट, दि.६ डिसेंबर -**

जि.प.प्रा. शाळा, बोरमन (तांडा) येथे महामानव, विश्वरत्न, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अरुण लोखंडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अरूण लोखंडे यांनी आपल्या व्याख्यानातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांशी हितगुज साधताना लोखंडे यांनी मोबाईल संस्कृतीमुळे ऱ्हास पावत चाललेल्या वाचन संस्कृतीविषयी चिंता व्यक्त केली. वाचनाचे महत्त्व पटवून देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वाचलेल्या ५०,००० पुस्तकांचा संदर्भ दिला. पुस्तकांसाठी घर बांधणारे आंबेडकर कदाचित एकमेव असतील, असेही त्यांनी सांगितले. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून माजी जि.प. सदस्य गणेश सोनटक्के हे उपस्थित होते. सविता राजू राठोड, कविता चव्हाण, अंगणवाडी सेविका विमल राठोड, तेजा लोखंडे, पनुबाई राठोड, जयश्री चव्हाण, सखी सावित्री समितीचे सदस्य मोहन चव्हाण, माजी सैनिक राम राव राठोड, व्यवस्थापन समितीचे सदस्य अनिल राठोड, रूपचंद राठोड, मंगेश सुरवसे उपस्थित होते.



### छत्रपती हायस्कूलमध्ये महावाचनाने डॉ. आंबेडकरांना मानवंदना

**धाराशिव, दि.६ डिसेंबर -**

येथील छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्रशालेतील पंधराशे विद्यार्थ्यांनी महावाचन अभियान राबवत मानवंदना देण्यात आली. यावेळी प्रशालेचे प्राचार्य बाळासाहेब मुंडे, उपप्राचार्य विक्रमसिंह देशमुख, सहशिक्षक एम.एस. कुंभार, प्रा. संभाजी भोसले यांचे हस्ते भारतरत्न डॉं. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रसंगी प्रा. रवी सुरवसे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन परिचयाची माहिती करून देत विद्यार्थ्यांनी त्यांचे गुण अंगी करावे असे सांगितले. तर महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधत महावाचन अभियान प्रशालेमध्ये राबविण्यात आले. सदर महावाचन अभियानामध्ये प्रशालेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. सदर कार्यक्रमास प्रशालेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### कळंबमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन


**कळंब, दि.६ डिसेंबर -**

६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कळंब शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. तसेच भीम नगर कल्पना नगर इंदिरानगर समता नगर पुनर्वसन आंबेडकर चौक या ठिकाणीही बुद्ध वंदना घेऊन विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी आमदार दयानंद गायकवाड, पोलीस निरीक्षक सानप, सतपाल बनसोडे, सुनील गायकवाड, बंडू बनसोडे, शिवाजी शिरसाट, प्रमोद ताटे, सुमित रणदिवे, मारुती गायकवाड, सी.आर. घाडगे, सचिन गायकवाड, संतोष भांडे, शहाजान शिकलकर, राजाभाऊ गायकवाड, सचिन तिरकर, भाऊ कुचेकर ,सुदीप देवकर, राऊत मेजर, महावीर गायकवाड, बाळासाहेब हौसलमल, बुवा वाघमारे, मुकेश गायकवाड, बजरंग बचुटे, दयानंद झेंडे, मारुती हौसलमल, धनंजय चिलवंत, नितीन कसबे असंख्य बौद्ध बांधव व कळंब शहरातील नागरिक उपस्थित होते.

### नळदुर्ग जि.प. प्रशालेत महापरिनिर्वाण दिन साजरा

**नळदुर्ग, दि.६ डिसेंबर -**

जि.प.प्रशाला नळदुर्ग येथे भारतीय संविधानाचे शिल्पकार, महामानव डॉ .बाबासाहेब आंबेडक यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. महापरिनिर्वाण



दिन तथा घर घर संविधान अंतर्गत प्रशालेत व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक इनामदार निजामोद्दीन हे होते. तर घर घर संविधान अंतर्गत प्रमुख व्याख्याता म्हणुन परीवर्तन सामाजिक संस्थेचे मारुती बनसोडे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सय्यद तसनीम यांनी केले तर प्रमुख पाहुण्यांचा परीचय पुदाले कविता यांनी करून दिला. सर्वांचे आभार जाधव संजय सखाराम यांनी मानले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन दुगम अरुणा यांनी केले. या कार्यक्रमास प्रशालेचे मुख्याध्यापक, शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## गोवा येथे होणाऱ्या ५ व्या राष्ट्रीय लाठी अजिंक्य पद स्पर्धेसाठी पाच मुलींची निवड



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.६ डिसेंबर -**

उमरगा येथील जिल्हा परिषद हायस्कूल च्या पाच मुलींची गोवा येथील जवाहरलाल नेहरू इंडोर स्टेडियम मडगाव येथे होणाऱ्या पाचव्या राष्ट्रीय लाठी अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. राज्यस्तरीय लाठी स्पर्धेत मुलींनी धाराशिव जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले होते. अफसाना नदाफ ईश्वरी माने श्रुती जाधव श्रेयसी शिंदे स्नेहल कांबळे या मुलींनी राज्यस्तरीय स्पर्धेत यश मिळवले आणि त्यांना राष्ट्रीय स्तरावर खेळण्याची संधी प्राप्त झाली आहे.

शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शकुंतला मोरे, मुख्याध्यापक पद्माकर मोरे, सुजाता मोरे शिक्षणतज्ञ सदानंद शिवदे पाटील, अशोक पतगे यांच्या मार्गदर्शनाखाली लाठी प्रशिक्षण मोहम्मद रफी शेख यांच्याकडून या मुलींना योग्य आणि मोलाचे मार्गदर्शन मिळाल्याने एवढी मोठी संधी प्राप्त झाली आहे. या मुलींना राज्यस्तरावर संधी मिळण्यासाठी ज्ञानज्योती सामाजिक संस्थेच्या सचिव व सामाजिक कार्यकर्त्या अँड. आकांक्षा चौगुले यांच्या संकल्पनेतून गेल्या तीन महिन्यापासून जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये १०० मुलींना स्वसंरक्षणासाठी लाठीकाठी व कराटे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

यशस्वी विद्यार्थिनींना युवा नेते किरण गायकवाड, अँड आकांक्षा चौगुले, आमदार प्रवीण स्वामी, गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार, केंद्रप्रमुख शिला मुदगडे, विस्तार अधिकारी काकासाहेब साळुंके यांनी शुभेच्छा दिल्या. जिल्हा परिषद मधील मुलींना राष्ट्रीय स्तरावर खेळण्याचे स्वप्न पूर्ण होत असल्याने शिक्षक पालक व विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## कत्तलीसाठी नेण्यात येणाऱ्या १९ गाईंची आंबी पोलिसांकडून सुटका

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.६ डिसेंबर -**

कत्तलीच्या उद्देशाने दोन टेम्पोतून १९ गोवंशीय जनावरांची वाहतूक होत असताना अंबी पोलिसांच्या पथकाने कारवाई करून गाईंची सुटका केली. तसेच दोन टॅम्पोसह तब्बल १७ लाख ८० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, अंबी पोलिसांचे पथक दिनांक ३ डिसेंबर रोजी रात्री एक वाजता पेट्रोलिंग करत असताना, देवगाव बु. (ता. परंडा) शिवारामध्ये दोन टाटा कंपनीचे पांढऱ्या रंगाचे टेम्पो (क्र एमएच ११/एएल ७०९२) दोन टॅम्पोसह १७ लाख ८० हजारांचा मुद्देमाल जप्त व आयशर टेम्पो (क्र. एमएच १३/ए ३६४०) रस्त्यावरून येत असल्याचे पोलिसांना दिसले. त्या दोन्ही टॅम्पोना थांबवून रस्त्याच्या कडेला घेऊन पाहणी केली असता, त्यामध्ये दाटीवाटीने बांधलेली गोवंशीय जनावरे पोलिसांना आढळून आली. त्या टॅम्पो चालकांची नावे सोहेल राजु कुरेशी, जगन्नाथ पंढरीनाथ साळवे, रिहाण सिराज कुरेशी (सर्व रा. राशीन, ता. कर्जत जि. अहिल्यानगर) असे गाई ८० दोन येथे छळ त्यांनी सांगितले. टॅम्पोमध्ये एकूण १९ गोवंशीय जातीच्या आढळून आल्या. यावेळी पथकाने ३ लाख हजार रुपये किंमतीच्या वाहनासह एकुण १७ लाख ८० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. त्यावरुन पोलीस ठाणे आंबी गुन्हा नोंदणी क्रमांक १४४/२०२४ भा.न्या. सं. कलम ३२५ सह प्राण्यांचा प्रतिबंधक अधिनियम १९६० चे कलम ११ (१) (क) (म) (भ), महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम चे कलम ५ (अ) (१), ९ (ब) सह कलम ०६ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक, संजय जाधव, अप्पर पोलीस अधीक्षक गौहर हसन, यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी, हिरेमठ, आंबी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक खरड, पोलीस हावलदार खुणे, पोलीस नाईक राउत, पोलीस अंमलदार चौगुले यांच्या पथकांनी केली आहे.

## धाराशिव सायबर पोलिसांची कामगिरी: फसवणुकीत गेलेले ३.७१ लाख रुपये परत

**धाराशिव, दि.६ डिसेंबर -** ऑनलाईन गुंतवणुकीच्या नावाखाली फसवणूक झालेल्या सापनाई येथील रोहित पवार यांना धाराशिव सायबर पोलिसांनी दिलासा दिला आहे. पवार यांची ५.५९ लाख रुपयांची फसवणूक झाली होती, त्यापैकी ३.७१ लाख रुपये पोलिसांनी परत मिळवले आहेत.

पवार यांनी धाराशिव सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण करून आरोपींची बँक खाती गोठवली. बँकांच्या नोडल अधिकाऱ्यांशी संपर्क साधून ३.७१ लाख रुपये पवार यांना परत मिळवून दिले. पोलीस अधीक्षक संजय जाधव, अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सचिन यादव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश कासुळे, सफौ कुलकर्णी यांच्यासह पोलिसांच्या पथकाने ही कामगिरी केली आहे.

## देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधीचा नळदुर्गमध्ये पेढे वाटून जल्लोष



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.६ डिसेंबर -**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणुन देवेंद्र फडणवीस त्याचबरोबर उपमुख्यमंत्री म्हणुन एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी दि. ५ डिसेंबर रोजी सायंकाळी शपथ घेतल्यानंतर नळदुर्ग शहरात भाजपसह महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी फटाक्यांची अतीषबाजी करून तसेच एकमेकांना लाडु भरवुन आनंदोत्सव साजरा केला.

राज्याचे २१ वे मुख्यमंत्री म्हणुन देवेंद्र फडणवीस यांनी दि.५ डिसेंबर रोजी सायंकाळी मुंबई येथील आझाद मैदानावर झालेल्या दिमाखदार कार्यक्रमात शपथ घेतली. त्यांच्यासोबत उपमुख्यमंत्री म्हणुन एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी शपथ घेतली. हा शपथग्रहण सोहळा संपल्यानंतर नळदुर्ग शहरात भाजपसह महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बस स्थानकासमोरील संविधान चौक तसेच चावडी चौकात मोठ्या प्रमाणात फटाक्यांची आतिषबाजी करण्याबरोबरच एकमेकांना लाडु भरवुन आनंदोत्सव साजरा केला.

यावेळी माजी नगरसेवक संजय बताले, बसवराज धरणे, विनायक अहंकारी, दत्तात्रय कोरे, सुधीर हजारे, संजय विठ्ठल जाधव, भाजयुमोचे जिल्हा सरचिटणीस श्रमिक पोटादार, भाजपचे शहर अध्यक्ष धीमाजी घुगे, भाजयुमोचे शहर अध्यक्ष गणेश मोरडे,विजय ठाकुर, पांडु पुदाले, बंडु पुदाले, विलास पुदाले, विशाल डुकरे, अबुअल हसन रजवी, उमेश नाईक, विलास येडगे, सुहास येडगे, अमर भाळे, उत्तम बनजगोळे, अक्षय भोई, व्यापारी मंडळाचे सुभाष कोरे, मुकुंद नाईक, बाहुबली शेटगार, अजय देशपांडे, राजकुमार वैद्य, शिवसेनेचे मनोज मिश्रा, बंडप्पा कसेकर यांच्यासह महायुतीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवाजीराव वडणे यांचे योगदान सांगणे कठीण : कपिल महाजन



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.६ डिसेंबर -**

येथील श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्थेसाठी प्राध्यापक शिवाजीराव वडणे सरांचे योगदान शब्दात सांगणे कठीण आहे. त्यांना आपल्या ८० वर्षाच्या जीवनात प्राध्यापक, भाजपचे नेते, प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळाचे सदस्य, उपप्राचार्य श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक आधी पदावर अत्यंत तळमळीने काम करून आपला वेगळा ठसा समाज मनावर बिंबवला होता. साधी राहणी व उच्च विचारसरणी, अंगीकारलेले वडणे यांचे मार्गदर्शन सर्व समाजासाठी व संस्थेच्या प्रगतीसाठी फार महत्त्वाचे आहेत. त्यांच्या विचाराची शिदोरी घेऊनच आम्हाला यापुढे जगायचे आहे, आणि आपली व आपल्या संस्थेची प्रगती साधायची आहे, असे प्रतिपादन संस्थेचे कार्यवाह डॉ. कपिल महाजन यांनी केले.

प्राध्यापक शिवाजीराव वडणे यांचे वयाच्या ८० व्या वर्षी आकस्मित निधन झाले. त्यानिमित्ताने दि.६ डिसेंबर रोजी स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर व श्री महात्मा बसवेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने प्राध्यापक वडणे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यावेळी कार्यवाह डॉक्टर कपिल महाजन बोलत होते. याप्रसंगी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनाही महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेची अध्यक्ष मल्लिनाथप्पा दंडगे, संचालक विजयकुमार पाटील, प्रवीण कुलकर्णी, प्रवीण अनुदुरकर, अशोक जोशी, धोंडदेव गुरुजी, मुख्याध्यापिका सविता लोहार, मुख्याध्यापक नेताजी गायकवाड आदी सह दोन्ही शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी हजर होते.

## जागतिक दिव्यांग दिन 'स्वआधार' बालगृहामध्ये विविध उपक्रमांनी साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ डिसेंबर -**

दि.३ डिसेंबर २०२४ रोजी जागतिक दिव्यांग दिनानिमित्त तुळजाई प्रतिष्ठान बहुउद्देशीय संस्था पानगाव संचलित स्वआधार मतिमंद मुलींचे बालगृह विमानतळ रोड, आळणी (ता.जि.धाराशिव) येथे डॉ. अभय शहापूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली बालगृहातील बालकांची आरोग्य तपासणी तसेच स्वआधार क्लिनिकच्या उद्घाटनाचा कार्यक्रम पार पडला. आरोग्य तपासणी शिबिराची सुरुवात कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ. अभय तसेच सर्व मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन तसेच मतिमंदत्त्वाचे जनक जीन मार्क इटार्ड यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. कौशाली राजगुरू, डॉ. श्रद्धा मुळे, डॉ. स्मिता गवळी (जेष्ठ स्त्रीरोग तज्ञ), डॉ. रेखा टिके, डॉ.राहुल देशमुख, डॉ. विशाल वडगावकर, डॉ. अजीत बुरगुटे, डॉ. सुजित रणदिव, डॉ. मीना जिंतूरकर, सरस्वती खटिंग, बलराम पोतदार, शहाजी चव्हाण, स्वआधार मतिमंद मुलींच्या बालगृहाचे मुख्याध्यापक गुरूनाथ थोडसरे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या शिबिरामध्ये बालगृहातील ११९ मुलींच्या आरोग्याची तपासणी करून परिचारिका तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना बालगृहातील बालकांच्या आरोग्य बाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच दिव्यांग दिनानिमित्त डॉ. अजित बुरगुटे यांनी बालगृहातील मुलींना टूथपेस्ट व ब्रशचे वाटप केले. तसेच मान्यवरांच्या हस्ते बालगृहातील मुलींना दिव्यांग विकास आघाडीच्या वतीने फळ वाटप देखील करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षा वर्षा ठाकूर-घुगे मॅडम (भा.प्र.से.) जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र लातूर यांच्या हस्ते तुळजाई प्रतिष्ठानचे सचिव शहाजी चव्हाण यांना प्रदान करण्यात आला.



तुळजाई प्रतिष्ठान या संस्थेकडून दिव्यांग क्षेत्रामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून उल्लेखनीय कार्य होत आहे. विशेषतः अनाथ मतिमंद मुलींचे बालगृह आळणी सारख्या ग्रामीण भागामध्ये उत्कृष्टरित्या चालवले जाते. हे कार्य अवघड असून हे निरंतर चांगल्या पद्धतीने चालवण्याचे कार्य ही संस्था अविरतपणे करत आहे. दिव्यांग व सामाजिक क्षेत्रातील केलेल्या उल्लेखनीय कार्याचा आढावा घेऊन निवड समितीने तुळजाई प्रतिष्ठान या संस्थेस हा पुरस्कार प्रदान केला.

# दूध उत्पादक व सेंद्रिय शेती करणाऱ्यांना जिव्हाळा पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.६ डिसेंबर -**

डॉ. अनिल भिकाने संचालक,विस्तार शिक्षण,माफसू नागपूर व उदगीर येथील प्रसिद्ध व्यापारी, सेवाभावी कार्यकर्ते रामराव मोमले यांचे वाढदिवस जिव्हाळा ग्रुपने अभिनव पद्धतीने साजरे केले.

शेतीनिष्ठ शेतकरी अमृतराव देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली, उदयगिरी लॉयन्स नेत्र रुग्णालयाचे अध्यक्ष, डॉ. रामप्रसाद लखोटिया व मुंबई येथील सामाजिक कार्यकर्ते नित्यानंद लोखंडे यांच्या उपस्थितीत व रमेश अण्णा अंबरखाने यांच्या हस्ते, दूध उत्पादक व सेंद्रिय शेती करणारे शेतकरी, शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणारे डॉ. प्रफुल्ल कुमार पाटील इत्यादींना शाल, स्मृतिचिन्हासह जिव्हाळा पुरस्कार प्रदान करण्यात आले. पुरस्काराचे मानकरी, श्याम भाऊ सोनटक्के लोहारा, भागवतराव केंद्रे कुमठा, दिगंबरराव बिरादार माळवाडीकर, शेख अजमत अय्युबमिया उदगीर, चंद्रकांत पांचाळ निडेबन, मेघराज मूडपे गुडसूर.

याप्रसंगी रमेश अण्णा अंबरखाने म्हणाले की, जिव्हाळा ग्रुप त्यांच्या सदस्यांचे वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरे करतो. हे कार्य कौतुकास्पद व अनुकरणीय आहे. डॉ. रामप्रसाद लखोटिया म्हणाले की, निरोगी राहण्यासाठी विषमुक्त अन्नधान्याचे उत्पादन करणे ही काळाची गरज आहे. विश्वनाथराव माळेवाडीकर यांनी कार्यक्रमाचे



प्रास्ताविक केल्यानंतर श्याम भाऊ सोनटक्के, डॉ. प्रफुल्ल कुमार पाटील, देविदासराव नादरगे, दशरथ शिंदे, विश्वनाथ मुडपे, शंकरराव साबणे इत्यादींनी सत्कार मूर्तीचे अभिष्टचिंतन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मीकांत बिडवे यांनी केले तर शंकरराव केंद्रेनी उपस्थितान्चे आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चंद्रकांत रोडगे, अशोक हळ्ळे, विवेकानंद मोमले, वैजनाथ पंचगल्ली, मारुती रोडगे, सच्चिदानंद पुट्टेवाड, मनोहर कुलकर्णी, सुधीर वाडेकर इत्यादींनी परिश्रम घेतले.

क्राईम वृत्त...



## आधारभूत साक्षरता, संख्यात्मकता क्रियाकलाप-प्रपत्राचे विद्यार्थ्यांना वाटप

**चाकुर, दि.६ डिसेंबर -**

चाकूर येथील पीएम श्री केन्द्रीय विद्यालय येथे पीएम श्री कार्यक्रमाअंतर्गत विविध कार्यक्रम राबवले जात आहेत. त्यात प्राथमिक विद्यार्थ्यांच्या मुलभुत संकल्पना त्यात प्रारम्भिक साक्षरता, पठन, लेखन, विद्यार्थ्यां मधील समज विकसित करने, प्रारम्भिक संख्यात्मकता, व्याकरण व शब्दावली, गणितीय विचार, विश्लेषणात्मक विचार, संचार कौशल व सामाजीक आणि भावनात्मक क्षमता विकसीत करणे हा मुलभुत उद्देश्य असून या क्रियाकलाप-प्रपत्र मधे विद्यार्थियाना विविध विषय यामध्ये इंग्लिश, गणित, हिंदी आणी पर्यावरण अभ्यास या विषयांच्या घटकानुसार आशय वर्कशीट व स्वाध्याय-अभ्यास अंतरभुत करण्यात आला आहे. एकूण प्राथमिक विभाग करीता ३८५ वर्कशीट उपलब्ध करण्यात विद्यालयाचे प्राचार्य हरीश कटारिया, मुख्याध्यापक गोविंद सूर्यवंशी, पन्नालाल इंगोले यांनी मेहनत घेतली. यावेळी शिक्षक कुलकुले खुदबोद्दीन, राजेश्वरी इंगले, संतोष नरले व विद्यालयातील शिक्षक वर्ग उपस्थित होते.



## वलांडी येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**वलांडी, दि.६ डिसेंबर -**

तालुक्यातील वलांडी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार समस्त समाज बांधवांच्या वतीने अर्पण करण्यात आले. यावेळी माजी आमदार धर्माजी सोनकवडे, राम भंडारे, दिनेश पाटील, हकीमभाई बौडीवाले, लहु सूर्यवंशी, मूस्ताक कादरी, बालाजी बिरादार, बालाजी सोनकवडे, विलास वाघमारे, धनराज बनसोडे, हसन मोमीन पत्रकार अक्रम शेख, अहेमद पठाण, नितीन वाघमारे, मूकेश कांबळे, विठ्ठल बनसोडे व समस्त समाज बांधव व महीला तरूण उपस्थित होते.



## लालबहादुर शास्त्री प्राथमिक शाळेत महापरिनिर्वाण दिन साजरा

**उदगीर, दि.६ डिसेंबर -**

येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था,अंबाजोगाई द्वारा संचलित लालबहादुर शास्त्री प्राथमिक विद्यालयात भारतीय संविधानाचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे तर, प्रमुख वक्ते म्हणून माधव केंद्रे तसेच, यांनी अतिथी म्हणून सुजाता दिपरत्न. शेल्लाळकर, माता पालक प्रियांका बस्वराज बुक्का व विभाग प्रमुख सुधाकर पोलावार उपस्थित होते. प्रमुख अतिथी व व्यासपीठावरील मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दिपप्रज्वलन करून अहिल्यादेवी होळकर व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात पण देऊन मान्यवर पाहुण्यांचे शाळेच्यावतीने स्वागत करण्यात आले. सुजाताताईंनी बुद्धवंदना घेतली. सर्व विद्यार्थ्यांकडून महावाचन यज्ञ करण्यात आला.

# उदगीरात पत्रकारांची आरोग्य तपासणी



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.६ डिसेंबर -**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद मुंबई ही पत्रकार संघटनांची मातृसंस्था असलेल्या मराठी पत्रकार परिषदेचा वर्धापन दिन पत्रकारांची आरोग्य तपासणी शिबिर घेऊन साजरा करण्यात आला.

मराठी पत्रकार परिषद, मुंबई शाखा उदगीर, इंडीयन मेडीकल असोशिएशन यांचे संयुक्त विद्यम ाने मंगळवारी (ता.३) मातभुमी महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. यावेळी पत्रकार व कुटुंबीयांची आरोग्य तपासणी करण्यात आली. उपविभागीय आधिकारी सुशांत शिंदे यांच्या हस्ते शिबीराचे उदघाटन करण्यात आले.

तहसीलदार राम बोरगावकर, अध्यक्ष इंडीयन मेडीकल असोशियएन अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पाटील, सचिव डॉ. महेश जाधव, कोषाध्यक्ष डॉ. संगमेश्वर दाचावार, डॉ. अनुप चिकमुर्गे, डॉ. संगमेश्वर सिद्धेश्वरे, स्वाती पाटील, डॉ. ज्योती सोमवंशी डॉ.प्रशांत नवटक्के, सतिश उस्तुरे, व्हि.एम.कुलकर्णी, युवराज धोतरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रस्ताविक मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय सचिव सचिन शिवशेट्टे यांनी केले. सुत्रसंचलन विक्रम हलकीकर आभार प्रा. बिभीषन मद्देवाड यांनी केले.

सिद्धार्थ सुर्यवंशी, रविंद्र हसरगुंडे, सुनिल हवा, रामबिलास नावंदर, महादेव घोणे, संदिप निडवदे, ॲड. श्रावण माने, श्रीपाद सिमंतकर, महेश मठपती, विश्वनाथ गायकवाड, निवृती जवळे, बालाजी टाळीकोटे, आशोक तोंडारे, बाबासाहेब मादळे आदी पत्रकार उपस्थित होते.

## कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.६ डिसेंबर -**

दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महाविद्यालयाच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी हणमंत शिंदे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात सुरुवात करण्यात आली. या अभिवादन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी भूषविले होते. कार्यक्रमाला प्रा. महारुद्र बिडवे, डॉ. शाहूराज मुळे, बाळासाहेब देशमुख, बालाजी देशमुख, क्रीडा संचालक डॉ. वैशाली माढेकर, प्रा. संतोष कल्याणकर, नितीन पाटील, देशमुख आर. एल., प्रा. नंदा खरटमल व महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## उदगीर येथे जागतिक दिव्यांग दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.६ डिसेंबर -**

दिव्यांग व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणावे व त्यांना मानाचे स्थान मिळावे यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न केले जात आहेत.

३ डिसेंबर हा जगभरात जागतिक दिव्यांग दिन म्हणून साजरा केला जातो. उदगीर येथील संधी निकेतन शिक्षण संस्था वडगाव संचलित जीवन विकास निवासी मतिमंद कर्मशाळेमध्ये जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत प्राविण्य मिळवलेल्या व सहभाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा बक्षीस देऊन कौतुक करण्यात आला. सर्व प्रवेशितांना थंडीसाठी उलन-टोप्या वाटप करण्यात आले. फळे व बिस्किट वाटप करून उत्साहात हा दिवस साजरा करण्यात आला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष रमेश वडगावकर, प्रेरणा विद्यालयाचे मुख्याध्यापक शशिकांत मोखेडे व कंधार येथील मतिमंद विद्यालयाचे पठाण मेहताब उपस्थित होते.

# आत्मा अंतर्गत रब्बी हंगाम-किसान गोष्टी कार्यक्रमाचे महादेववाडी येथे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.६ डिसेंबर -**

महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या आत्मा योजनेअंतर्गत महादेववाडी येथे रब्बी हंगाम किसान गोष्टी कार्यक्रम आणि डॉ पंजाबराव देशम ुख नैसर्गिक शेती मिशन योजनेअंतर्गत सेंद्रिय गटातील शेतकऱ्यांचे गाव पातळीवरील प्रशिक्षणाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

प्रकल्प संचालक आत्मा एस.व्ही. लाडके आणि उपसंचालक बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली व तालुका कृषी अधिकारी कृष्णा मुंडे यांच्या नियोजनाने रब्बी हंगामातील वेगवेगळ्या पिकांचे व कृषी विभागाच्या वेगवेगळ्या योजना घेऊन यशस्वी योगदान दिलेल्या शेतकऱ्यांच्या यशोगाथा शेतकऱ्यापर्यंत त्यांच्या बांधावर पोहोचाव्यात या हेतूने रब्बी हंगाम किसान गोष्टी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पांडुरंग चामे मुख्य मार्गदर्शक म्हणून रावणगाव येथील प्रगतिशील शेतकरी भीमराव डोंगापुरे हे होते. व्यासपीठावर दुग्ध व्यवसाय व पशुपालन पुरस्कार प्राप्त शेतकरी राजपाल बिरादार, प्रशांत पाटील, जुबेर पठाण, राहुल जाधव, कृषी भूषण सेंद्रिय शेती पुरस्कार विजेते शेतकरी ओमकार मसकल्ले, संगमेश्वर पताळे शरद बिरादार महेश शिरपुरे, इत्यादी शेतकरी उपस्थित होते.

तालुक्यातील पहिले कृषी भूषण सेंद्रिय शेती पुरस्कार प्राप्त विजेता शेतकरी ओमकार मसकले व सुनीता मसकल्ले यांचा महादेव वाडी आणि दवन हिप्परगा ग्रामपंचायतच्या वतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक भिमराव डोणगापुरे यांनी शेतीला पूरक व्यवसाय असावा व शेती तंत्रज्ञानावर आधारित असावी जेणेकरून शेतीचे उत्पन्न दुप्पट होईल याबाबत उपस्थित शेतकऱ्यांना म ार्गदर्शन करून तुर हरभरा सोयाबीन इत्यादी पिकाच्या वेगवेगळ्या अधिक उत्पादन देणाऱ्या प्रजातीचे मार्गदर्शन करून महिला शेतकऱ्यांनी शेतीमध्ये सहभाग वाढवावा जेणेकरून शेती नफ्याची होईल याबाबत मार्गदर्शन केले.

## मातृभूमी नर्सिंग स्कूल सामान्य रुग्णालयाच्या वतीने एड्स निर्मूलन जनजागृती रॅली

**उदगीर, दि.६ डिसेंबर -**

जागतिक एड्स निर्मूलन दिनानिमित्त मातृभूमी प्रतिष्ठान शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित मातृभूमी नर्सिंग स्कूल (एएनएम) व सामान्य रुणालयाच्या वतीने शहरातून जनजागृती रॅली काढली सामान्य रुणालय व नर्सिंग स्कूलच्या वतीने काढली. रॅलीची सुरुवात सामान्य रुणालय येथे करत नगरपरिषद कॉम्प्लेक्स छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून जात समारोप सामान्य रुणालय परिसरात करण्यात आला.

## महाराष्ट्र उदयगिरीत महापरिनिर्वाण दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.६ डिसेंबर -**

येथील महाराष्ट्र उदयगिरी म हाविद्यालयातील दिनविशेष समिती व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. बालाजी होकरणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.

या अभिवादन कार्यक्रमासाठी म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.के. मस्के, उपप्राचार्य डॉ.एस.जी. पाटील, दिनविशेष समिती प्रमुख डॉ.जी.जी. जेवळीकर, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक सचिव प्रा.एस. टी. कांबळे, ग्रंथपाल डॉ. लक्ष्मीकांत पेन्सलवार, कार्यालय प्रमुख दयानंद स्वामी यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# शिवनेरी महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.६ डिसेंबर -**

येथील शिवनेरी महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतिने दि.६ डिसेंबर रोजी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण धालगडे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी मराठी विषयाचे प्रा.डॉ. म ारोती गायकवाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यावर प्रकाश टाकला ते म्हणाले की डॉ. बाबासाहेबांनी आपल्या जीवनात सामान्य माणसांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून दिला आहे. दीनदलित व शोषितांच्या उद्धाराकरिता म्हणून त्यांच्याकडे पाहिले पाहिजे. डॉ. बाबासाहेबांनी जीवनात शिक्षणाला महत्त्व दिले. परदेशात अमेरिका व इंग्लंड या देशात शिक्षण घेऊन बॅरिस्टर ही पदवी मिळवली. बाबासाहेबांच्या जीवनात सयाजीराव गायकवाड व शाहू महाराजांचे योगदान खूप मोठे आहे. बाबासाहेबांचे कार्य व कर्तृत्व समजून घ्यायचे असेल तर संत गाडगेबाबांनी बाबासाहेबाचे निधन झाल्या नंतर अन्न पाण्याविना आपला प्राणत्याग केला. हीच खूप मोठी बाबासाहेबांची जीवनाची किमया आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण विश्वाला मानवतेची शिकवण दिली. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाच्या तत्त्वांची समाजात रुजवण करण्यासाठी संविधानाच्या माध्यमातून म ानव मुक्तीचे महान असे कार्य केले. असे यावेळी मान्यवराने सांगितले.

स्त्री मुक्तीचे मार्ग दाता, सामाजिक समतेचे दूत आणि समस्त मानव जातीच्या कल्याणाचे उद्धार कर्ते असा बाबासाहेबांचा जगभर लौकिक आहे. असेही त्यांनी सांगितले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक , यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

# नामस्मरण हाच सर्वश्रेष्ठ भक्तीमार्ग : रुक्मिणीताई हावरे



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.६ डिसेंबर -**

देवाकडे कांही मागायचे असेल तर कांहीतरी देवाला द्यावे लागते. तरच देव आपल्या इच्छा पुर्ण करतात.आपण ज्या पध्दतीने आपल्या गरजेचे, अत्यंत आवश्यक व आपल्या फायद्याचे मागतो. त्याचप्रमाणे देवालाही आपण आपला प्रिय भक्तीभाव द्यावा लागतो. तेव्हाच आपल्या इच्छा पुर्ण होतात. यासाठी भगवंताचे नामस्मरण हाच सर्वश्रेष्ठ भक्तीमार्ग आहे. असे प्रतिपादन शि.भ. रुक्मिणीताई हावरे यांनी केले.

औसा येथील मुक्तेश्वर मंदीर कलशारोहनच्या ११ व्या वर्धापणदिनानिमित् मंदीर समि तीच्या वतीने राज्यस्तरीय महिला किर्तन महोत्सवाचे आयोजन मंदीर सभागृहात करण्यात आले. त्यावेळी हभप. रुक्मिणीताई हावरे महोत्सवाचे तिसरे पुष्प गुंफताना गुरुवार दि. ५ रोजी रात्री बोलत होत्या. ॲड. मुक्तेश्वर वागदरे, ॲड. विजयकुमार राचट्टे, प्रा. युवराज हालकुडे, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष सुरेश ठेसे, रविशंकर राचट्टे, काशीनाथ सगरे, बालाजी शिंदे, उमाकांत मुरगे, गिरीधर जंगाले यांची उपस्थिती होती.

हभप. हावरे म्हणाल्या, एक दिवस मरण येणार हे प्रत्येकालाच माहिती आहे. तरीपण आपण संत, देव यांच्या भक्तीरसात न राहता दुसऱ्यांची निंदा करतो. ज्यांची निंदा करतो त्याचे पाप आपोआप पुसून जावून आपल्या डोक्यावर पापाचा डोंगर वाढतो. तरीही आपण नींदा करतो. रिकामी काम करतो. अशातच आपण वेळ घालवतो. मग भगवंताचे चिंतन कधी करणार, आपणाला १०० वर्षाचे आयुष्य मिळाले असेल तर यातील ५० वर्षे झोपतच जातात. उर्वरीत ५० वर्षच आपण या देहाचा उपभोग घेऊ शकतो. यामुळे मिळालेला देह हा अर्धाच आपल्या हक्काचा आहे. याचा उपयोग जिवनात कल्याणकारी कामात करा, ईश्वराच्या चिंतनात, नामस्मरणात करा, असे आवाहन हभप रुक्मिणीताई हावरे यांनी केले.

या विठ्ठलाच्या नामस्मरणाचा भक्तीरस प्रत्येकांनी घ्यावा, असे आवाहन हभप रुक्मिणीताई हावरे यांनी केले.

# सामान्य माणसाला जगण्याचा हक्क बाबासाहेबांनी दिला : प्रा. अनिल मगर



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.६ डिसेंबर -**

भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि देश जोखडातून मुक्त झाला असला तरी सामान्य माणसाला जगण्याचा खरा हक्क डॉ. बाबासाहेबांनी दिला, असे मत इतिहास विभाग प्रमुख प्रा. अनिल मगर यांनी व्यक्त केले. ते महापरिनिर्वाण दिनानिमित्त बोलत होते.

वाढवणा येथील श्री. शिवाजी कनिष्ठ म हाविद्यालयात डॉं. बाबासाहेब आंबेडकर म हापरिनिर्वान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजेसंभाजी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक आमगे एस.यु. उपस्थित होते. बाबासाहेबांचे विचार हे कायद्याच्या माध्यमातून आजही लोकशाहीत नांदत असून त्यानी दिलेले सम तेचे मुल्य टिकविणे आजच्या पिढीला मोठे आव्हान ठरणारे आहे असे अध्यक्षीय भाषणात आमगे एस.यु. म्हणाले. यावेळी मुलांनी बाबासाहेबांचा जीवन प्रवास आपल्या मनोगतातून उलगडून दाखवला. प्रास्ताविक रामदास केदार यांनी केले.सुत्रसंचलन दहिफळे एस.पी. यांनी केले. क

ार्यक्रमास प्राचार्य मुंजेवार वाय.के., मुधाळे डी. जी., पठाण आर.एस., मुळे एम.ए., इंद्राळे एम.एम., केंद्रे व्ही.जी., कांबळे एन.एस, रोंगे एन.आर., हाळणे एस.एस., नागरगोजे जी.बी. उपस्थित होते.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## वलांडी शेत शिवारात अवैध गांजा लागवड; एकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.६ डिसेंबर -**

तालुक्यातील वलांडी येथे गांजाचे झाडाचे संवर्धन व अवैध गांजा लागवड प्रकरणी बालाजीवाडी येथे एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, तालुक्यातील बालाजीवाडी येथे आरोपीने त्यांच्या शेतामध्ये तूरीच्या पिकांमध्ये स्वतःहाच्या फायद्यासाठी अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने गांज्याचे ओले व हिरवे झाडे लावली अशी गुप्त माहीती पोलीस प्रशासनाला मिळाली. पोलीसांनी तूरीच्या पिकांमध्ये जाऊन तपासणी केली असताना गांजाचे हिरवे झाड एकुण वजन ३ किलो ५० ग्रॅम वजनाचे किंमत प्रति किलो ग्रॅम ११ हजार ८०३ रू. प्रमाणे एकूण ३६ हजार रुपयाचे गांजाचे झाड शेतात लागवड करून त्याचे संवर्धन व जोपासना करताना मिळुन आले.

पोलीस उपनिरीक्षक प्रदीप गौंड यांच्या फिर्यादीवरून उत्तम रामा गायकवाड (रा बालाजीवाडी ता. देवणी) यांच्या विरोधात गुरनं ३९६/२४ कलम २० गुंगीकारक औषधी व द्रव्ये मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ नूसार गुन्हा नोंद करण्यात आली आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### महापरिनिर्वाण दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना निलंग्यात अभिवादन

**निलंगा, दि.६ डिसेंबर -**

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ वा महापरिनिर्वाण दिनानिमित्त निलंगा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर येथील पुतळ्यास निलंगा शहरातील बौद्ध उपासक-उपासिक, विविध सामाजिक संघटना व राजकीय पक्षाच्या वतीने महामानवास महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी सकाळी येथील महामानव बोध्दीस्त्व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून, त्रिशरण पंचशील ग्रहण करुन महामानवास महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या पावण स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विलास माने, रजनीकांत कांबळे, अंकुश ढेरे, प्रा. रोहित बनसोडे, गोविंद सुर्यवंशी, झंटींग म्हेत्रे, रमेश कांबळे, लहु ढेरे, पवन कांबळे, विनोद सुर्यवंशी यासह आदी संघटना, पक्षांचे कार्यकर्ते, पदाधिकारी, बौद्ध उपासक, उपासिका उपस्थित होते.



### दैठणा येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा स्मृतिदिन साजरा

**शिरूर अनंतपाळ, दि.६ डिसेंबर**

दैठणा येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरीनिर्वाण दिन अर्थात स्मृती दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी दैठणा गावातील बौद्ध नगर मधील अनेक कार्यकत्यांचा याप्रसंगी उत्स्फूर्तपणे सहभाग दिसून आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायाकडून अतिशय उत्स्फूर्तपणे साजरा झाला. आणि याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून दैठणा येथील बौद्ध नगरातील प्रत्येक कार्यकर्त्याकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे प्रत्येकाकडून पूजन करण्यात आले. याप्रसंगी सरपंच शेषराव कांबळे, रमेश कांबळे, पंढरी कांबळे, भीमराव कांबळे, सतीश कांबळे, प्रदीप कांबळे, पंढरी कांबळे, बाबुराव भुरे, मारुती शिंदे, दयानंद चांबर्गे यांच्यासह आदि उपस्थित होते.



### ग्रामीण रुग्णालय, निवासी अपंग विद्यालयात फळे वाटप

**चाकुर, दि.६ डिसेंबर**

चाकुर-अहमदपूर विधानसभेचे आ. बाबासाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त दि.५ डिसेंबर रोजी चाकूर ग्रामीण रुग्णालय व निवासी अपंग विद्यालय येथे रुग्णांना फळे वाटप करण्यात आले. यावेळी रामभाऊ कसबे मित्र मंडळाचे अध्यक्ष रामभाऊ कसबे, बाळू लाटे, वडवळ ग्रां.प. सदस्य कॉमेश कसबे, राष्ट्रवादी शहराध्यक्ष बिलाल पठाण, राजेश अरगडे, अभिषेक मोठेराव, गायके, प्रवीण वाघमारे, सुनील मोठेराव, शिवसांब कांबळे, कार्तिक शिंदे, लक्ष्मण मोठेराव, कार्तिक कांबळे, योगेश वाघमारे, सागर कसबे, सागर गायकवाड, गोविंद घोडके, गणेश वाघमारे, बालाजी लोंढे, प्रीतम वाघमारे, प्रवीण कसबे, सोनेराव लांडगे, महेश वाघमारे, चंदू कांबळे, रोहन कसबे, कृष्णा जाणकर आदींच्या उपस्थितीमध्ये फळे वाटप करण्यात आले.

### ट्रॅक्टरच्या धडकेत मोटारसायकल स्वाराचा मृत्यू

**लातूर, दि.६ डिसेंबर**

तांदुळजा (ता. लातूर) शिवारा कॅनलच्या पुलावर भरधाव ट्रॅक्टरने मोटारसायकलस्वारास समोरून धडक दिल्याने मोटारसायकल वरील चालकाचा मृत्यू झाला आहे. एम.एच. २४- बीटी-९४०६ या मोटारसायकलवर बसून भालचंद्र हरिभाऊ शिंदे (रा. खाडगाव रोड लातूर) हे लातूरकडे येत असताना एम. एच. ३८ व्ही-२७९० या क्रमांकाच्या ट्रॅक्टर चालकाने समोरून जोराची धडक दिली. या धडकेत भालचंद्र शिंदे यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी गातेगाव पोलिसांत गुन्ह करण्यात आला आहे.

### उत्तमराव जाधव यांचे निधन

**लातूर, दि.६ डिसेंबर**



जवाहर प्राथमिक शाळेचे माजी मुख्याध्यापक उत्तम राव अनंतराव जाधव यांचे मंगळवारी (ता.३) रात्री लातूर येथे आकस्मिक निधन झाले. ते ७६ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी (दि.४) अंत्यसंस्कार करण्यात आले. एक विद्यार्थीप्रिय शिक्षक व कडक शिस्तीचे मुख्याध्यापक म्हणून त्यांची ओळख होती. त्यांनी आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत एक निस्पृह शाला प्रशासक म्हणून आपला वेगळा ठसा उमटवला. त्यांच्या मागे पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## हजारो आंबेडकरी अनुयायांची लातूरात महापरिनिर्वाणदिनी महाबुद्ध वंदना



**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.६ डिसेंबर -**

प्रज्ञासूर्य, उपेक्षितांचे नायक, महामानव, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरीनिर्वाण दिनानिमित्त समस्त लातूरकरांच्यावतीने पु. भंतेजी पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली सामूहिक महाबुद्ध वंदना अभिवादन कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महाबुद्ध वंदना अभिवादन कार्यक्रम सुखाणू समितीतर्फे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. भिक्खु संघाच्यावतीने त्रिरत्न वंदना घेण्यात आली.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली बौद्ध धम्माची आचारसंहिता म्हणजे बावीस प्रतिज्ञाचे सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच भारतीय संविधानाची प्रस्तावना वाचण्यात आली.

या प्रसंगी पुढे बोलताना भिक्खु पय्यानंद थेरो म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारताच्या संविधानाचे शिल्पकार नव्हते, तर ते एका सामाजिक क्रांतीचे प्रणेते होते. त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध लढा दिला, समाजातील शेवटच्या माणसाला न्याय मिळवून दिला, आणि शिक्षण हे समाजाच्या उद्धाराचे साधन आहे हे शिकवले. बाबासाहेबांचे विचार आणि तत्वे आपण आपल्या जीवनात रुजवली, तरच त्यांना खरी आदरांजली ठरेल. यावेळी भिक्खू पय्यानंद थेरो, भंते बुद्धशील, भंते बोधिराज, आर्या मेत्ता, समाज कल्याण सहायुक्त एस.एन. चिकुर्ते, एम एन. बलांडे, बापू गायकवाड, सुरेश गायकवाड, एम.एन. गायकवाड, केशव कांबळे, अनिल बनसोडे, भीमराव चौधंते, डॉ. सुधाकर गुळवे, पांडुरंग अंबुलगेकर, विठ्ठल जाधव, पृथ्वीराज शिरसाट, बसवंतप्पा उबाळे, डॉ. विजय अजनीकर, डॉ. अरुण कांबळे, चंद्रसेन भडके, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, प्राचार्य डॉ. संजय गवई, प्रा. देवदत्त सावंत, प्रा. विश्वनाथ आल्टे, संजय सोनकांबळे, ॲड. धम्मदीप बलांडे, राजूभाऊ सूर्यवंशी, डॉ. सदानंद कांबळे, बाबासाहेब गायकवाड, डी.एस. नरसिंगे, विनोद कोल्हे, विनय जाकते, उदय सोनवणे, अनिरुद्ध बनसोडे, ज्योतीराम लामतुरे, निलेश बनसोडे, प्रा. सतीश कांबळे, विशाल वाहुळे, रामराव गवळी, अशोक कांबळे, अंतेश्वर थोटे, पांडुरंग अंबुलगेकर, राहुल शाक्यमुनी, सरिता बनसोडे, सुशील चिकटे, शारदा लामतुरे, संगीता कांबळे, सुजाता आजनिकर, शारदा घोबाळे, त्रिशाला घोडके तसेच महाबुद्ध वंदना अभिवादन कार्यक्रम सुकाणू समितीचे सर्व सदस्य व मोठ्या संख्येने आंबेडकर अनुयायी उपस्थित होते.

यावेळी सेवानिवृत्त महार बटालियन व शाक्यसंघ माता भीमाई सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी संघटना यांच्याद्वारे सलामी देण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुशील सूर्यवंशी यांनी केले तर आभार मिलिंद धावारे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाबुद्ध वंदना सुकानू समितीच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

### दिव्यांग क्रीडा स्पर्धांमध्ये सुमारे ६०० विद्यार्थ्यांचा सहभाग...

## दिव्यांग बांधवांच्या विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन : अनमोल सागर

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.६ डिसेंबर -**

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषदेमार्फत विविध उपक्रम राबविले जात आहेत. या अंतर्गत जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांग विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी, सांस्कृतिक स्पर्धा आणि क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना आपले कला, क्रीडा कौशल्य विकसित करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल, असा विश्वास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी आज येथे व्यक्त केला.

बाभळगाव पोलीस मुख्यालय मैदान येथे आयोजित दिव्यांग विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी श्री. सागर बोलत होते. समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, पुनर्वसन उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, महिला व बालकल्याण उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, संतोषकुमार नाईकवाडी, विलास केंद्रे, व्यंकट लामजाने यावेळी उपस्थित होते.

लातूर जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांनी आजपर्यंत विविध पातळीवर आयोजित क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली असून सुवर्ण, रौप्य व कास्यपदकांची कमाई केली आहे. त्यांनी केलेली कामगिरी अतिशय कौतुकास्पद आहे. या विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्यांचा विकास करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा पातळीवर होणारी क्रीडा स्पर्धा उपयुक्त ठरणार आहे. शासन, प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून जिल्ह्यात दिव्यांग बांधवांसाठी अतिशय चांगले उपक्रम राबविले जात आहेत. या माध्यमातून दिव्यांग बांधवांच्या सर्वसमावेशक विकासासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे सागर म्हणाले.

## अस्थी अभिवादनाकरिता पानगावात उसळला भीमसागर

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जय घोषाने परिसर दुमदुमला...



**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.६ डिसेंबर -**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६ डिसेंबर रोजी पानगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी अभिवादनाला लाखो आंबेडकर अनुयायांनी मोठी गर्दी केली. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो'च्या जयघोषाने पानगांव परिसर दुमदुमून गेला होता.

मुंबई, नागपूर वगळता मराठवाड्यात पानगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी आहेत. दोन वर्षाच्या कालखंडानंतर यावर्षी अस्थी अभिवादनासाठी लाखो आंबेडकरी अनुयायांनी तोबा गर्दी केली होती. ६ डिसेंबरच्या पहिल्या मिनिटाला अस्थी स्थळी भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दलांच्या वतीने मानवंदना दिली.ट्रस्टच्या वतीने पुष्पचक्र अर्पण करून भदंत पय्यांनंद थेरो यांनी उपस्थितांना सामूहिक पंचशील त्रिशरण दिले. महाराष्ट्रात मुंबई, नागपुर वगळता केवळ मराठवाड्यातील पानगांव (ता.रेणापुर जि. लातुर) येथेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी आहेत. यांना महापरिनिर्वाण दिनी मुंबईला जाणे शक्य झाले नाही असे मराठवाड्या सह शेजारील कर्नाटक, तेलंगना, आंध्रप्रदेश राज्यातुनही येथील अस्थीला अभिवादन करण्या करिता लाखो अनुयांयी येथे येतात. यानिमिताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक पानगांव यांच्या वतीने सकाळी रेणापुरच्या तहसीलदार मंजुषा भगत यांच्या हस्ते पंचशील ध्वजवंदन करण्यात आले तर डॉ. आंबेडकर चौकातील ध्वजवंदन पानगांवच्या सरपंच मीनाताई मोटाडे यांनी केले.सकाळी साडेनऊ वाजता परळीकडून येणाऱ्या परळी-मिरज पॅसेंजर रेल्वेने आंबेडक अनुयांयी हजारोच्या संख्येनी स्टेशनवर उतरताल बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असोच्या घोषना देत अस्थी अभिवादना करीता येत होते.


त्याच प्रमाणे, नांदेड-बेंगलोर एक्सप्रेस, पुर्णा-हैद्राबाद, तर दुपारी उदगीर, बीदर, कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेशकडून येणाऱ्या रेल्वे मधुनआणि मोठ्या प्रमाणात मोटरसायकल, चारचाकी वाहतातुन आंबेडकरी आनुयायी पानगांवात दाखल होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो असे, नारे देत अस्थी स्थळाकडे येत असल्याने आंबेडकरी जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता.

चौका-चौकांत अभिवादनाचे बॅनर, विविध पक्ष संघटनेचे मोफत अन्नदानाचे स्टॉल, पुस्तकासह आंबेडकरी साहित्य विक्रीच्या स्टॉल होते. तसेच विविध रक्तपेढीचे रक्त संकलन केंद्र, आरोग्य विभागाकडून जागो जागी भीम गीतांचे कार्यक्रम, पोलिस विभागाकडून पानगावच्या चहूबाजूच्या रस्त्यावर बॅरिकेड्स उभारण्यात आले होते. गावाच्या एक किलोमीटर लांबच वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था केल्याने आणि कमी प्रमाणात पार्किंग ते अभिवादन ठिकाणापर्यंत अनुयायीना पोहचण्या करिता त्रास होत होता. बरेच जण चालत येऊन आपल्या मुक्ती दात्याला अभिवादन करत होते. त्यामुळे पानगांवात आंबेडकरी अनुयांयीचा जणु महासागरच लोटल्याचे चित्र दिसुन येत होते. यावेळी जिल्हयातील सामाजिक, राजकिय, शासकिय, प्रशासकिय मान्यवरांकडून अस्थिना अभिवादन करण्यात आले.

पानगांवचे भदंत पय्यांनंद थेरों, नामदेव आचार्य, विश्वनाथ आचार्य, क्षितीज रोडे, सुकेश भंडारे, सुभाष आचार्य, जे.सी. पानगांवकर, विष्णु आचार्य, गोरोबा आचार्य, नागनाथ चव्हाण, किशोर आचार्य, गौतम आचार्य, पंडीत आचार्य, रमेश तिगोटे, सत्यशिला आचार्य, तुकाराम कांबळे, शिवाजी आचार्य, रत्नराज आचार्य अदि विश्वस्त, शेकडो महिला पुरुष स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.

## शिरूर अनंतपाळ तालुक्यातील दैठणा, शेंद गावचा रस्ता आहे की मृत्यूचा सापळा

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.६ डिसेंबर -**



शिरूर अनंतपाळ तालुक्यातील शेंद हे गाव साकोळ मध्यम प्रकल्पामुळे पुनर्वशीत झालेले आहे. पण पुनर्वशीत गावाच्या गरजा इतर ठिकाणी अतिशय व्यवस्थितपणे सोडवल्या जातात. पण या ठिकाणी मात्र या गावावरती खूपच अन्याय होत असताना दिसत आहे. या गावाला जाण्यासाठी दैठणा ते शेंद असा एकच मार्ग नेहमीसाठी कार्यरत असतो.

पण हा मार्ग एवढा खराब झालेला आहे की या गावाला जाताना आपण गावापर्यंत पोहोचतो किंवा नाही अशी त्या प्रवास करतानाची प्रवाशाची अवस्था असते.

सहा डिसेंबर रोजी झालेल्या थोड्याशा पावसात रस्त्यावर थांबलेल्या पाण्याने मोठमोठे खड्डे भरतात आणि दिवसा जाताना रस्ता कुठे आहे ही शोधायची वेळ त्या प्रवाशावरती येते. मग त्या ठिकाणची संध्याकाळची अवस्था काय असेल हा प्रसंग प्रवासीच वर्णन करू शकतील असा जीव घेणारा रस्ता या रस्त्यावरती अनेकांचे अपघात घडतात.

काही फॅक्चर होतात. कारण समोरून येणाऱ्या भरदाव वाहनाला समोरच्या रस्त्याचा अंदाजच नसतो. मग काही खड्ड्याच्या पलीकडे जातात तर काही खड्ड्यातच पडतात असे या ठिकाणी अनेक वेळा घडलेले आहे.

पण या सर्व गोष्टीकडे शिरूर अनंतपाळ तालुका प्रशासन व्यवस्थेचे फारसे लक्ष असलेले दिसतच नाही. या गावाला कधी लाईट नसते तर कधी रस्ता नसतो या गावचा वनवास मात्र कायमचाच असतो.

यामुळे स्थानिक ग्रामस्थांकडून प्रशासन व्यवस्थेवरती तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे

## राजीव गांधी इन्स्टिट्यूटमध्ये महापरिनिर्वाण दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.६ डिसेंबर -**

राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ पॉलीटेक्निक व लातूर कॉलेज ऑफ औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्राचार्य संतोष मेदगे यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दिपप्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष भिमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, उपप्राचार्या योगिता बावगे, प्राचार्य एम.जी. सोनहिवरे, प्रा.एस.एन. गायकवाड, प्रा.डी.पी. पाटील, प्रा.एस.एम. पंचाक्षरी, प्रा.के. डी. ताडके, आर.एस. सांगवे, बी.आर. गवळी, आर.एस. कोरे, आय एस. इंद्राळे, डी.आर. बावगे, ए.आर. पाटील, सुरज तांदळे, मनदीप सवाई यांची उपस्थिती होती. प्राचार्य संतोष मेदगे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महान विद्वानांपैकी एक होते. त्यांनी विविध ३२ विषयांत पदवी संपादन केली होती. यात मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजमधून बीए पर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर एमएचे शिक्षण अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातून पुर्ण केले. याच विद्यापीठामधून त्यांनी पीएचडी पदवी पुर्ण केली. त्यानंतर बाबासाहेबांनी 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून एमएससी, डीएससी केले. बॅरिस्टर-एट-लॉ म्हणून पदवी प्राप्त केली. स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री व मजूरमंत्री होते. १९५१ मध्ये त्यांनी संसदेत 'हिंदू कोड बिल' सादर केले. जेव्हा महिलांना वडिलोपार्जित संपत्तीत समान वाटा मिळेल आणि पुरुषांप्रमाणे समान अधिकार मिळतील. तेव्हा खरी लोकशाही देशात येईल. असा विश्वास डॉ.आंबेडकरांना वाटत होता. यामुळे हिंदू कोड बिलाचा मांडलेला मसुदा संसदेत रोखण्यात आल्यानंतर आंबेडकरांनी मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला होता. कामाचे आठ तास रविवारी सुट्टी व बोनस कामगारांकरीता लागु केले होते. असे प्रा. मेदगे यांनी यावेळी स्पष्ट केले.

यावेळी प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्याकडून डॉ. नाकाडे कुटुंबाचे सांत्वन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.६ डिसेंबर -**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे माजी संचालक माजी कुलगुरू तथा प्राचार्य डॉ. शिवाजीराव नाकाडे यांचे चार दिवसापूर्वी लातूर येथे वृद्धापकाळाने निधन झाले. त्याबद्दल माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी गुरुवारी डॉ. नाकाडे यांच्या महसूल कॉलनी येथील निवासस्थानी भेट देऊन कुटुंबाचे सांत्वन केले. दिवंगत डॉ. शिवाजीराव नाकाडे यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन केले.

यावेळी जागृती शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मण मोरे, डॉ. महादेव दडगे, हरिराम कुलकर्णी, रामदास पवार, बाळासाहेब कदम, सचिन दाताळ, डॉ. स्वरुपा भुजबळ, सुप्रिया कोरे, युवराज नाकाडे, विनायक कोरे, प्रा. इजारे, चांदपाशा इनामदार, संभाजीराव सुळ तसेच नाकाडे कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

यावेळी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी डॉ. नाकाडे यांच्या सोबत अनेक वेळा चर्चा करत असताना विधी ज्ञान हे शाळेपासून असायला हवे असा त्यांचा आग्रह राहायचा जेणेकरून आपला भारत देश हा सक्षम बनण्यासाठी खुप मदत होईल, असे ते यावेळी म्हणाले.